मराठी चित्रपट

# YZ!

लेखक: क्षितिज पटवर्धन (मेंबरशिप नंबर. ०१५४७९)

डायलॉग्स ३.०

जुनाट पुस्तकांचं एक पान दिसतं. त्यावर लिहीलं आहे.

प्रकरण पहिले. अबब नमन कर. (घंटा वाजल्याचा आवाज येतो.)

1. DAY AND NIGHT MONTAGES

MTG A / EXT / Temple / D

आपल्याला एका मुलाचा हात दिसतो. त्यावर प्रसाद ठेवला जातो. एक तेहतीस वर्षाचा पण चेहऱ्यावरुन पस्तीशीचा वाटणारा ऑकवर्ड मुलगा कम माणूस समोर फिक्या कपडयात उभा आहे. तो प्रसाद खातो. समोर पन्नाशीचे गुरुजी.

*गुरुजीः काय अबब! आता आम्हाला लाडू कधी? आँ?*

*गजानन त्यांच्याकडे पाहून ऑकवर्ड हसतो. पिशवीतून खरोखर एक लाडू काढून देतो.*

*गजाननः हा घ्या. अजून हवाय? घरी पण दया.*

*गुरुजीः असा नाही रे लग्नाचा!*

*गजाननः (ऑकवर्ड नमस्कार करत) येतो.*

*(वळतो. कॅमेऱ्यात नजर खाली करुन पहातो. त्याच्या शेजारच्या भिंतीवर वधू वर सूचक मेळावा,खास प्रौढांसाठी! असं पोस्टर लागलेलं.) लोकांना दुसऱ्यांच्या लग्नातले तुपकट पिशवीतले टणक लाडू खाण्यात एवढा रस का असतो कुणास ठाऊक? आणि मला एकवेळ रव्याचा, बेसनाचा, दाण्याचा, राजगिऱ्याचा कुठलाही लाडू मागा, मी किलो किलो आणून देईन. पण लग्नाचा? शक्य नाही. कारण माझं लग्न होऊच शकत नाही.*

MTG A / EXT / Temple / D

सायकलच्या कॅरीअर ला इतिहासाची पुस्तकं लावली जातात. सीटावर कॉन्फीडन्टली मारलं जातं. स्टँड पायानी खाडकन काढला जातो. तर तो निघून बाजूला पडतो. गजानन उचलून त्याकडे पहातो आणि कॅरीअर ला लावतो.

*गजाननः पोपट होणं म्हणतात हा माझ्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे. लाईट बिल भरायला गेलो की जेवायची वेळ होते, चांगला शर्ट घातला की कावळा शिटतो, आपण अंगाला पूर्ण साबण लावला की मग पाणी जातं, हे सगळं रोज घडतंच माझ्याबाबतीत.*

MTG A / EXT / Temple / D

वाईच्या नदीच्या काठावरुन गजानन सायकलवर जाताना दिसतो.

*गजाननः हे वाई. पुण्या मुंबईहून महाबळेश्वरला जाताना लागतं तेच. आमच्याइकडे सिनेमांची शूटींगपण होतात. वाईची गम्मत ही आहे, की वाई काहीही वाटू शकतं. उत्तर प्रदेश, पंजाब, केरळ, एकदा तर स्वित्झर्लंड म्हणूनही दाखवणार होते म्हणे पण ते राहीलं. (हसतो.) हा माझा वाईतला सगळयात आवडता एरिया.*

MTG A / EXT / College Gate/ D

गजानन सायकलवरुन कॉलेजच्या गेटमध्ये जातो.

*गजाननः आणि हा सगळयात नावडता. इथे मी आणि फँगो सहा महिन्यापूर्वी आलो. पण त्याला माझ्याहून जास्त किंमत आहे.*

शेजारी एक कुत्रा झोपलेला दिसतो.

MTG A / EXT / College Classroom/ D

गजानन वर्गात शिकवतोय. समोर मुलं एकमेकांशी खेळतायत. कुणीही लक्ष देत नाही. फळयावर ‘बिगेस्ट डिफीट इन हिस्टरी’ असं लिहीलंय.

*गजानन व्ही ओः कुणीही बघत नाही माझ्याकडे. मी स्वतः सुध्दा नाही. तसंही बघण्यासारखं, आणि आवडण्यासारखं काय आहे माझ्यात? काहीच नाही! आणि त्यात मला...मला, मुलींची भिती वाटते!*

MTG F/ EXT / College / Canteen / D

कॅण्टीनमध्ये सगळयांचे टेबलाखालून पाय दिसतात. दोन तीन घोळके, एक दोन कपल्स, सगळयात शेवटी एकटया माणसाचे एन्क्झायटीने हलणारे पाय दिसतात. एक मुलगी समोर येते आणि विचारते.

*मुलगीः एक्सक्युजमी. झालंय का?*

*गजानन तिच्याकडे पहात रहातो. घाबरतो.*

*गजाननः दातखिळ. दातखिळ बसते माझी मुलींशी बोलताना. केमिकल बॅलेन्सच जातो माझा.*

INT / CU of Gajanan

A. आवंढा गिळला जाताना दिसतो.

B. कपाळावर घाम आलेला दिसतो.

C. पाय अेन्क्झायटीनं हलताना दिसतात.

D. हात थरथरताना दिसतात.

*मुलगीः युसलेस!!*

म्हणून निघून जाते. गजानन मान खाली घालतो. हळूच वर पहातो.

*गजाननः एककाळ मीही मुलीना आवडेल असं रहायचा प्रयत्न केला होता. कपडे बदलले, गाडी चालवली, डिओही मारला. मग लक्षात आलं, काही कपडे फक्त दुकानातल्या पुतळयांनाच चांगले दिसतात, गाडीवर कितीही स्टाईलमध्ये बसलं तरी आपलं पोट टाकीला लागतंच आणि डिओ मारुन मुली फक्त जाहीरातीत मिळतात. आता एवढया उशीरा कसली आलीये मुलगी माझ्या नशीबात?*

त्यावरच मंत्रविधी ऐकू येतात.

2. Int/ Marriage Hall/ Day

एक आठ वर्षाचा मुलगा दिसतो. त्याची मुंज चालू आहे. कोपऱ्यात आई वडील आणि त्यांच्या मधोमध गजानन उभे आहेत. आई त्या मुलाकडे पहातेय. वडील बीपीच्या गोळया घेतायत. पाणी पितात.

*आईः अबब, शाळेत होता ना रे हा तुझ्या?*

*वडीलः (भांड ठेवत) वर्गात, वर्गात होता गं.*

*गजाननः एका बाकावर बसायचो मी आणि फाटक. बाबांच्या पाठीत काकडी नव्हती का फोडली त्यानी. एक वर्ष लहान आहे माझ्याहून (शेजारुन एक जण गुलाबजाम घेऊन जातो.) अरे व्वा! गुलाबजाम आहेत आज!*

आई वडील दोघेही त्याच्याकडे पहातात.

*आईः तुझ्याहून लहान आहे हा?*

*गजाननः (कॉन्फीडन्टली) हो. तुझी शप्पथ!*

*आईः अरे त्याच्या मुलाची मुंज आहे आज, आणि तू बुफेतले गुलाबजाम कसले बघतोयस!*

*गजाननः आता फाटकनी बालविवाह केलाय यात माझी काय चूके?*

*आईः रविवार. रविवारी मी तुला घेऊन जाणार. बास झालं.*

*गजाननः काय आहे रविवारी?*

*आईः वाईतला सगळयात मोठठा वधू वर सूचक मेळावा. याच कार्यालयात!*

*गजाननः मी येणार नाही.*

*आईः यावच लागेल! मुलगी घरबसल्या मिळत नाही आणि तू काय राजेंद्रकुमार नाहीस. बेबी ताईंनी सांगितलंय यंदा चांगला लॉट आलाय.*

गजानन चक्रावून पहातो. त्याच्या घाबरलेल्या चेहऱ्यावरच त्याचा आवाज येतो.

*गजाननः बेबी मालशे यांच्या वधू वर सूचक मंडळाला मी हॉस्पिटलपेक्षा जास्त घाबरतो, कारण तिथं अपमान करुन घेणं ही पंचवार्षिक योजना झालीये.*

*धप असा आवाज येतो.*

3. Int/Hall/Day

छातीला बिल्ला लावून गजानन उत्साहाने टी शर्ट आणि जीन्सवर स्टेजवर उभा आहे. समोर पंधरा वीस मुली. एक मुलगी आणि तिची लहान बहीण अशा बसलेल्या आहेत.

*बेबी मालशेः (माईकवर उत्साहाने) गजानन कुलकर्णी, वय २६ पूर्ण, शिक्षण एम ए, पगार बारा हजार, टेम्परारी, फोर व्हीलर नाही.*

गजानन उत्साहाने हाय करतो. एक मुलगी आणि तिची फ्रॉकमधली बहीण त्याचाकडे पहातात.

*बेबी मालशेः (त्याच्याकडे पहात) चला पुढे!*

3A. Ext/Road/Day

फ्रेश स्टॉक अशी एका दुकानावरची पाटी दिसते, गजानन शेजारनं जातो,

*गजाननः माझं नाव मुलींना ओल्ड फॅशन्ड वाटतं, असं बेबी ताई म्हणाल्या. हो अहो, पण काय करणार, एकतर ते गणपतीचं नाव आहे, आणि दुसरं माझ्या जन्माच्या वेळेला या नावांबरोबर वक्रतुंड, लंबोदर, आणि शूर्पकर्ण असे तीन ऑप्शन्स होते! पण मावशीनं गजानन सिलेक्ट केलं.*

पुन्हा धप आवाज येतो.

3B. Int/Hall/Day

छातीला बिल्ला लावून पुन्हा एकदा गजानन स्टेजवर उभा आहे. समोर चार मुली आहे. पहिल्यातल्या बहीणी बसल्यात. जी फ्रॉक घालून आलीये ती लग्नाची आहे. आणि जी लग्नाची होती तिचा मुलगा खेळतोय.

*बेबी मालशेः ( वैतागून माईकवर) गजानन कुलकर्णी, वय ३३, शिक्षण एम ए, नेट सेट क्लिअर, पगार वीस हजार, टेम्परारी, फोर व्हीलर नाही.*

मुली काहीच रिॲक्ट करत नाहीत. बेबी मालशे त्याच्याकडे पहातात. गजानन म्हणतो चला पुढे! त्या वैतागून कपाळाला हात लावतात.

3C. Ext/Road/Day

स्टॉक क्लिअरन्स सेल अशी पाटी दिसते. त्या शेजारुन सायकल घेऊन गजानन जाताना दिसतो. कॉलेजमध्ये एन्टर करतो.

*गजानन व्हॉईस ओव्हरः मी लग्नाची अपेक्षा सोडून दिली. जसं गणित सोडलं होतं, मग सायन्स सोडलं होतं, मग क्रिकेटर व्हायचा नाद, सिंगर व्हायची इच्छा, सगळं सोडलं होतं. मला वाटतं, आपलं आयुष्य सॅटेलाईट सारखं असतं, वयानी लहान असताना आपण अपेक्षांचं रॉकेट उंच उडवतो. मग थोडया थोडया वर्षांनी एक एक आवरण निघायला लागतं आणि आपलं आयुष्य एका कक्षेत स्थिर होतं. माझही स्थिर झालंय, वाईत! एकटेपणाच्या कक्षेत!*

गजानन कॉरीडॉर मधून चालत जातो. मध्येच थबकतो. नोटीस बोर्ड वर प्राचार्य वाईकर यांच अभिनंदन!! आपल्या केंद्रात सलग सातव्या वर्षी राज्य नाटय स्पर्धेत अभिनयाचं उत्तेजनार्थ पारितोषिक असं लिहीलंय. गजानन त्याकडे पहातो.

4. Ext-Int/ Principle Cabin/College

प्रिन्सिपल केबिन असं लिहीलंय बाहेर एकप्यून बार लावतोय. गजानन आत डोकावतो. भिंतीवर एकाच माणसाच्या दोनचार ऐतिहासिकव्यक्तीरेखांचे फोटो दिसतात. गजानन ला बुकेदिला जातो.

*गजाननः सर अभिनंदन!*

*सरः हो! थँक यू. (खूश होऊन) बुके!*

*गजाननः एक्स्ट्रा आलाय का?*

*सरः अंह! तुमच्यासाठी.*

*गजाननः (घाबरुन) सर सेंडॉफ नाहीये ना आज माझा?*

*सरः (हसत) एका अर्थानं सेंडॉफच! बसा. कुलकर्णी मला माहीतेय, तुम्हाला आयुष्यात नेमकं कुठे जायचंय!*

*गजाननः माचू पिचू! एकदा सर!*

*सरः आँ? नाही, तुमची कामातली जिदद, कष्ट पाहून मीच नाव रेकमेंड केलं होतं, आणि झालं.*

*गजाननः सर मुददयाला हात घालता?*

*सरः (उठतात खिडकीपाशी जातात. बाहेर पाहून त्याच्याकडे पहात) कुलकर्णी, पुण्याला जायचंय तुम्हाला, पुढचे सहा महिने!*

*(गजाननचे डोळे विस्फारतात. तुतारी वाजायला लागते. तो पहातो त्याला प्रिन्सिपल रामशास्त्री प्रभुण्यांच्या वेशात दिसतात. तो मागे पहातो. बार भरणारा प्यून भाला घेऊन उभा दिसतो.)*

*प्रिन्सिपलः (नाटकीपणे) झालं असं की तिथल्या कॉलेजच्या कॉरीडॉरमध्ये दोन शिक्षक एकमेकांस धडकले. खडू पडले म्हणून उचलण्याचं निमित्त झालं आणि जन्माच्या गाठी जुळल्या. दोघांनीही नोकरीचा त्याग केला. जागा रिकामी. कोण भरणार, मोठा पेच होता. आम्हीच आपलं नाव पुढे केलं. दरबाराची मोहोर उमटली आणि सांगावा आल. शुक्रवारीच कूच करायचंय.*

*गजाननः माफी असावी श्रीमंत, पण दरबारात इतरही सरदार आहेत. आम्ही एकवेळ मस्तवाल हत्तीच्या पायाखाली येऊ, चारशे कोडे अंगावर झेलू परंतु पुण्यास आत्ता जाणे खचितच योग्य नाही.*

*(वाकून मुजरा करतो. त्याला टॅप करुन प्रिन्सिपल हसून पहातात. गजानन घाबरलाय.)*

*गजाननः सर मला माहीतेय माझं शिकवण आवडत नाही इथे. मग मला काढा. पण पाठवू नका.*

*प्रिन्सिपलः तुम्हाला भिती वाटतेय का?*

*(गजानन मान डोलावतो.)*

*प्रिन्सिपलः मग नक्की जा. मी ही तीस वर्ष नाटकंकरतो वाईत. एकदोन सिनेमात कामही केलंय. लोक म्हणतात तुम्ही जर तेव्हा शहरात गेला असतात तर व्यावसायिक रंगभूमी गाजवली असतीत. पण मी अनुभव येण्याआधी त्याच्या कल्पनेनीच घाबरलो. उडी मारण्या आधीच जमीन सोडायला कचरलो. आज वाटतं जाऊन बघायला तर हवं होतं. (खांदयावर हात ठेवत) कुलकर्णी, खूप कमी जणांना मोठया पाण्यात पडण्याची संधी मिळते. तुम्हाला मिळालीये तर आत्ताच उडी मारा!*

5. Ext / River Bridge/Day

कॅमेरा पळत पळत नदीच्या काठापर्यंत येताना दिसतो. वाईच्या नदीत एकामागून एक धपाधप उडया मारताना दोन पोरं दिसतात. शेजारी गजानन शांतपणे सायकल वर चालला आहे.

6. Int / Home/ Day

आई तोंडाला पदर लावताना दिसते.

7. Int / Home/ Day

वडील डोक्याला हात लावतात, आणि ठरलेल्या पुडीतून दोन गोळया घेतात.

8. Int / Home/ Day

***गजाननः*** *जाऊदे मी आठ दिवसांसाठी जातो, किमान बेबीडॉलचा रविवारचा वधू वर मेळावा तरी*

*चुकेल. वाईट शिकवतो आणि येतो परत. दोनच भितीदायक गोष्टी आहेत पुण्यात, आग्रह मावशी आणि मुली. या पुण्यातल्या मुली मांजरीसारख्या आडव्या आल्या तर? त्यांच्या स्कार्फपासून मारामाऱ्यांपर्यंत आणि अॅटीटयूड पासून अॅक्सेंट पर्यंत सगळं प्रसिध्द आहे कारण.*

छोटी छोटी पदकं ठेवलेला एक रॅक दिसतो. त्याच्या वरुन एक बॅग उघडली जाते. त्यात साबण, शेविंग किट. पुस्तकं डायरी. लाडू, चिवडा, भाजणी, लोणंच, मेतकूट, मध, च्यवनप्राश, बदाम, असं सगळं भरलं जाताना दिसतं. चेन लागत नाहीये. बाबा त्याच्याकडे पहातात, त्याला थांबवतात. जवळ येतात आणि बॅगेवर बसतात. गजानन चेन लावतो. बॅग तयार होते.

9. Ext / River Bank/ Day

आता संध्याकाळच्या वेळेला गजानन काठावर एकटाच पाठमोरा बसलेला आहे. मागे मुलांचे आवाज येतात 'डोक्यावर चांदोबा आणि गंगा, जटाधारी देवाचे नाव सांगा!'

*गजाननः वीस वर्षांपूर्वी माझी एक बालमैत्रिण पण पुण्यालाच गेली होती आमच्या इथून. ती एकमेव अशी मुलगी होती हां, जिला मी 'तू किती छान हसतेस' असं म्हणालो, आणि त्यावर मला 'तू   पण' असं उत्तर मिळालं होतं! इथंच!*

हसून शेजारी पहातो. आपल्याला दोन लहान मुलं काठावर बसलेली दिसतात. मुलीच्या चेहऱ्यावर तुळशीचं पान आहे. ती त्याच्याकडे पाहून हसते. पाण्यात दगड टाकते. तरंग उठतात. पुन्हा गजानन एकटा दिसतो.)

*गजाननः दहावीच्या पहिल्या पेपरला हातात कोरी उत्तरपत्रिका आली होती ना तसं वाटतंय आज. मनात भिती, आणि सगळीकडे भरुन राहीलेल रिकामपण. आता आपली परिक्षा आहे, आणि आपण एकटे असणार त्यात.*

(त्याच्या मागून एक किर्तनकार भजन गात गात पास होतो. आणि पहिलं गाणं सुरु होतं.)

# PB SONG 1: MANRANJANA MOHANA

9A. Int / Home/ Day

गजानन तुटलेल्या आरशासमोर स्वतःकडे पहातो. मागून आईचा आवाज येतो.

*आईः (रडवेल्या स्वरात) हो निघालाय. आता तुझ्याच तावडीत आहे. बघ!*

9B. Int / Home/ Day

गजानन जिने उतरुन खाली येतो. समोर पहातो. कोपऱ्यात त्याच्या तीनही सायकली पडलेल्या आहेत. एक बालपण, एक तारुण्य आणि प्रौढत्व. त्यातल्या वरच्या सायकलचा स्टँड कॅरीअरलाच लडकलाय. तो प्रेमाने सायकलवर हात फिरवतो आणि निघतो.

9C. Int / Bus/ Day

बसमध्ये वरती कोंबून बॅग बसवतो. तिकीट पहातो, विंडो सीट दिसतं. तो विंडोसीटला पहातो एक मुलगी लहान बाळाला घेऊन बसलीये. गजानन तिच्याकडे पहात रहातो.

9D. Int / Bus/ Day

गजानन मागच्या सीटावर बसलाय. गाडी बोगदयात जाते तसा त्याच्या चेहऱ्यावर अंधार येतो.

9E. Ext/ Pune/ Day

संगीताचा पॅटर्न बदलतो. पुणं दिसतं. फ्लायओवर्स, शॉपिंग मॉल, आयटी पार्क, कॉफी शॉप्स, जाईंटस, आणि या सगळयात असलेली अत्यंत कॉन्फीडन्ट आनंदी माणसं दिसतात. त्यामध्ये वेगवेगळया मुलीही दिसतायत.

9F. Ext/ Pune/ Day

गजानन आता सामानासह रिक्षात बसलाय. ब्रेकचा करकचून आवाज येतो, रिक्षावाला त्याच्याकडे मागे वळून पहातो. कळतं ती बाई आहे.

*रिक्षावालीः साहेब मध्ये बसा ना, रिक्षाचा बॅलेन्स जातोय!*

गजानन तिच्याकडे पहात आधी घाबरतो. मग ओशाळतो आणि मध्ये सरकतो.

*गजाननः हे मी पुण्यात ऐकलेलं पहिलं वाक्य, ‘साहेब मध्ये बसा रिक्षाचा बॅलेन्स जातो’! मला खात्री आहे, या शहराला मी आणि मला हे शहर फार काळ सहन करु शकणार नाही.*

9G. Int/ Maushi Home/ Evening

मावशी पुस्तक वाचतेय. बाजूला ठेवते. तो आलेला पहाते. तोंडाला पदर लावून खूश होते.

*मावशीः काय रे ढोल्या? कसा आहेस?*

गजानन तिला लाजून नमस्कार करतो. शेजारी कोणतरी येतं तिलाही नमस्कार करतो, वर पहातो. वीस वर्षाची आरती आहे.

*गजाननः हॅलो कशी आहेस?*

*आरतीः मस्त. तू काय कधीपर्यंत आहेस?*

*गजाननः माहीत नाही गं.*

## 9H. Int/ Maushi Home/ Room

बॅग ठेवली जाते.

*आरतीः हा दादाचा बेड आहे. ते दादाचं कपाट. वरचे दोन कप्पे रिकामे आहेत. तेवढे पुरतील.*

आरती त्याच्याकडे पाहून निघून जाते. शकीराचं एक भलं मोठठ पोस्टर दिसतं. तो खिडकीपाशी जातो. बराच वेळ ॲडजस्ट करायची अंडरपँट म्हणून आत हात घालतो. तेवढयात त्याला पुरुषाचे हुंकार ऐकू येतात. हूँ... हूँ... तो दचकून पहातो. समोर एक उघडा तरुण खाली वर करतोय. गजाननच्या चेहऱ्यावर घाम जमा होतो. तो खिडकी लावणार तेवढयात तो समोरचा तरुण उठून उभा रहातो. याला कळतं तो जोर मारतोय.

## 9I. Int/ Maushi Home/ Balcony

तो शहराकडे एकटा पहात उभा आहे. मावशी त्याला मुलाचा आणि सुनेचा स्टॅच्यू ऑफ लिबर्टी जवळचा फोटो दाखवते. तो बघतो. मावशी त्याच्या पाठीत धपाटा घालते. तो ऑकवर्ड होऊन हसतो.

नाईट टू मॉर्निंग ट्रान्झिशन जातं.

## 9J. Int/ Day/ Bathroom

शॉवरचा नळ आणि त्याचे ऑप्शन्स दिसतात. पहिला फिरवला जातो. दुसरा फिरवला जातो. मग दोन्ही उलटेपालटे केले जातात. शॉवर तसाच दिसतो. गजानन वर पहातो. भसकन पाणी येतं. तो हबकतो.

## 9J. Int/ Day/ Room

कपडयाला इस्त्री करतोय. आरती कपाटातनं टॉप्स काढतेय. एक टॉप बाहेर काढते. ओरडते.

*आरतीः आई इस्त्री का नाही केली?*

टॉप तिथेच टाकून जाते. गजानन तो घेतो आणि इस्त्री करतो. आठ घडया घातलेला शर्ट उघडतो हसून तिच्याकडे पहातो. ती आठ घडया घातलेला टी शर्ट उघडते आणि रागाने पहाते. पुन्हा चोळामोळा करते आणि टाकते.

*आरतीः दादा, प्लीज माझ्या कपडयांना हात लावू नकोस.*

9K. Ext/ Road / Day

आरती गाडी घेऊन येते. त्याच्याकडे रागाने पहाते. गजानन मागे कसा बसा बसतो. दोघं निघतात. तो पाय हवेत ठेऊनच बसलाय.

9L. Ext/ Outside Class/ Day

न्यू एज डान्स अकॅडमी समोर गाडी थांबते. आरती तशीच आत निघून जाते. तो वळून निघणार तेवढयात लक्षात येतं ती किल्ली विसरली आहे. तो किल्ली घेतो, गांगरतो, फायनली ती गेलीये त्या दिशेनी जातो.

9M. Int/ Class/ Day

फ्लॅशी टयूबलाईटस मध्ये आरशासमोर अप बीट म्युझिकवर दहा बारा मुली डान्स करताना दिसतात. त्या सगळयांच्या मधोमध बिनधास्त नाचताना एकवीस वर्षांची अंतरा दिसते. गजानन आत येतो. त्याने आयुष्यात पहिल्यांदा या अंतरावरुन इतक्या कमी कपडयातल्या मुली पाहील्यात. अंतरा नाचता नाचता आरतीला हाय करते. शेजारी पहाते, आरती कपाळाला हात लावते बुजरा गजानन किल्ली दाखवतो, ती घेऊन जाना म्हणते.

9N. Ext/ Outside College/ Day

गजानन कॉलेजच्या गेटबाहेर गाडी घेऊन येतो. तेवढयात आतमधून सुसाट गाडया बाहेर पडतात. तो दचकून थांबतो. आणि कॉलेजच्या नावाकडे पहातो.  गाणं संपतं!

10. Int/ Principle Cabin/ Day

एक पन्नाशीच्या प्रिन्सिपल बसलेल्या दिसतात. पदमजा रानडे, प्राचार्य अशी पाटी लागलेली दिसते.
त्या वर पहातात.

*गजाननः मॅडम छान आहे बरं का कॉलेज!*

*मॅडमः (त्याच्याकडे पहात नीरस हसून) अकरावी, बारावीचे वर्ग आहेत. १० ते ३ लेक्चर्स आहेत. आत्ता ११ बी आहे. ग्राउंड फ्लोअर.*

*गजाननः येस. येऊ?*

*मॅडमः ओके.*

## 10A. Int/ College corridor/ Day

गजानन एका कॉरीडॉर मधून चालत जातो. त्याला समोर ११ बी अशी पाटी दिसते. तो हसून त्याकडे पहातो. चालत जाणार एवढयात एक मुलगी पळत पळत आडवी जाते, तिच्या मागे एक मुलगा स्वीटू स्वीटू म्हणत पळत जातो. गजानन वर्गात जाणार एवढयात दोन तीन मुली बाहेर येतात.

*१: मॅकडी? सीसीडी?*

*३: नो यार, चल टी टी यू एल*

*२: आपण नक्की नाही बसायचंय?*

*१: नो यार, हिस्टरी इज सो फकींग बोअरिंग. कुणीतरी नवीन सर येणारेत.*

*२: गजानन कुलकर्णी, मस्ट बी सम फर्स्ट वल्ड वॉर वेट्रन. हू केअर्स?*

(सगळया हसतात. गजानन घाबरतो. त्या निघून जातात. तो वळतो. धीर एकवटतो. पुन्हा वळतो.)

## 10B. Int/ Classroom/Day

गजानन आत डोकावतो. सात आठ मुलं दिसतात. तो शर्टची कॉलर नीट करतो आणि वर्गावर जातो. कोणाकडेही न पहाता वर येऊन उभा रहातो. समोर पहातो. तर आठ मुलं आणि मागे वीस मुली बसल्यात.

तो बुजतो. कॉलर नीट करतो. मुलं एकमेकांकडे कुतूहलानं पहायला लागतात.

*गजाननः (खाकरत) नमस्कार. मी गजानन कुलकर्णी. प्रिन्सिपल मॅडमनी आजपासनं इथं हिस्टरी शिकवायला सांगितलंय. तर आपण आज आता महाराष्ट्राचा इतिहास शिकूया. (ॲन्क्सायटीमध्ये तो खडू तोडतो आणि खाली पडतो तो उचलायला वाकतो. आणि उठताना टेबल लागतं. आख्ख्या वर्गाच्या तोंडून स्स बाहेर येतं.)*

*गजाननः (डोक्याला हात लावत) आज आपण पहाणार आहोत महाराष्ट्रातील समाजसुधारक! महाराष्ट्राला फार मोठी परंपरा आहे. जगन्नाथ शंकरशेट , बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकहितवादी, सार्वजनिक काका, पंडिता रमाबाई, वस्ताद लहुजी साळवे या आणि अशा असंख्य समाजसुधारकांनी या भूमिला मोलाचं योगदान दिलंय.*

(मुलांचे काहीच कळत नाही असे कटस जातात.)

*आपण आज सुरुवात करुया, जगन्नाथ शंकरशेट, ज्यांना मुंबईचे शिल्पकार समजलं जातं. मराठी, इंग्रजी आणि संस्कृतमध्ये प्राविण्य मिळवलेल्या शंकरशेट यांच्या नावानी मोठठी स्कॉलरशिप दिली जायची बरं का! ऐकलं असेल तुम्ही, जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती?*

मुलं नकारार्थी माना डोलावतात.

*गजाननः  असो. जगन्नाथ शंकरशेट यांना नाना असंही म्हणत.*

*(आवाज येतो. क्यों क्यों क्यों? गजानन चमकून पहातो. एक मुलगी त्याच्यासमोर फोन घेते.)*

*मुलगीः हाय! हो लेक्चर मध्ये आहे. ओ ग्रेट ,आलेच!*

*(गजानन समोरच पहातो. मुलगी उठते.) सर मी जाऊ?*

*गजाननः (तिच्याकडे न पहाता) हां अ‍ॅज यू विश.*

*मुलः आ! हा! आ! (गजानन हसून लाजतो.) सोडा ना सर! सोडा! सोडा ना!*

मुलगी निघून जाते. गजानन लाजून वळतो. त्या आवाजावरच फळयावर लिहीतो दिवस पहिला.

मुलांच्या मागून आपल्याला तो शिकवताना दिसतो. मुलांच्या शेजारुन वर एक एक स्टीकर्स पॉप अप  होतात.

कॉमेडी लेक्चर्स विथ गजू

किती चावतोय डेंगू होईल

कुंग फू कुलकर्णी

मोठा भीम!!!!!

वाईचा स्पायडरमॅन!!!

एल ओ एल आर ओ एफएल

हस्तिदंत!!

गजानन वेगळया शर्टमध्ये वळतो आणि दिवस आठवा असं पुसून टाकतो. समोर पहातो. पाच सहाच जण आहेत. त्यातला एक बर्गर खातोय. एक फोनवर आहे. एक झोपलाय.

*गजाननः उठवा त्याला. संपलं लेक्चर.*

*१ः जाऊ दे सर पुढचं इंग्लीशचंच आहे.*

11. Ext/ Classroom corridoe/Day

गजानन पुस्तकं घेऊन बाहेर येतो. पूर्ण खचलाय. बाहेर  दहा पंधरा मुलं दोन्ही बाजूनी उभी आहेत. गजानन त्यांच्यातनं वाट काढत जायचा प्रयत्न करतोय कोणी त्याची दखलही घेत नाहीये. तो पास होतो तशी त्याला हळूच एक टप्पल मारली जाते. तो वैतागून पहातो. चालत जातो त्याला शिव्या दिलेल्या ऐकू येतात. त्यामध्ये बीपचे आवाज ऐकू येतात. ते वाढत जातं आणि बीपचा एक लांबलचक टोन तयार होतो. उदवीग्न गजानन मान खाली घालून चालत जातो, वळतो आणि लेडीज टॉयलेटचं दार ढकलून आत जातो.

12. Int/ Ladies Toilet/ Day

रिकामं टॉयलेट आहे. गजानन आरशासमोर स्वतःच्या चेहऱ्यावर पाणी मारतो. चिडलाय रडवेला झालाय. पुन्हा ओंजळीत पाणी घेतो. एवढयात शेजारच्या कंपार्टमेंटचं दार उघडून एक वीस वर्षाची मुलगी बाहेर पडते. गजानन स्वतःच्या चेहऱ्यावर पाणी मारुन घेतो, आणि जोरात ओरडतो. ती मुलगीही ओरडते तेवढयात तिच्या मागून एक वीस वर्षाचा किडकिडा, अवली दिसणारा, झँकी पँकी कपडे घातलेला मुलगा जीन्स वर करत बाहेर येतो. गजानन दुसऱ्यांदा ओरडतो. एन्क्झायटीने शेजारचा झाडू हातात धरतो.

*मुलगाः आयो मामा! काय झाली का साफसफाई?*

*गजाननः (ओरडत. झाडू बाजूला टाकत) अरे कोण मामा?? काय चाललय काय इथे?*

*मुलगाः (शांतपणे) रिसर्च! तुम्ही मामा नाही? (मुलीकडे) तुझे मामा?*

*मुलगीः माझे मामा यंग आहेत.*

*गजाननः चला, प्रिन्सिपल कडे चला!तुम्हाला दोघांना माहीतेय हे काये? आँ? हे टॉयलेट आहे, टॉयलेट!*

*मुलगाः हे टॉयलेट नाही. हे लेडिज टॉयलेट आहे.*

*गजाननः काय? (बावचळत) हो का? (इकडे तिकडे पहात) सॉरी. मी चुकून आलो.*

*मुलगाः नो प्रॉब्लेम. नेक्स्ट टाईम बी केअरफुल. काय?*

*गजाननः हो!*

*मुलगाः (मोठयानी) काय???*

*गजाननः हो हो!*

*मुलगाः हं! ठीके! चल ग स्वीटू. बाय रे गोटू. (तिला) सेम आहे ना बदाम गोटू? बघ ना! (ती हसते.)*

त्या मुलीचा हात धरतो आणि तिथून निघून जातो. गजानन त्याच्याकडे पहात रहातो. तो निघून गेल्यावर आतल्या कम्पार्टमेंट पाशी जातो. आत पहातो. खाली त्याला आयकार्ड पडलेलं दिसतं. गजानन उचलतो.त्यावर दिसत रहातं. शामसुंदर पारिजातक. ११ बी. गजानन त्याकडे निरखून पहातो. तेवढयात फोन वाजतो.

*मावशीः काय बाळा, कुठायस?*

*गजाननः (जेन्युइनली) मी लेडीज टॉयलेट मध्ये,पण चुकून आलो होतो.*

*मावशीः आँ?*

*गजाननः नाही नाही. तू बोल.*

*मावशीः येताना दोन पुस्तकंआणशील का? नावं पाठवते. आणि तुला फुलोरा हॉटेल माहीतेय ना?*

*गजाननः हो. कॉलेजच्याच जवळ आहे.*

*मावशीः मग पाच वाजता जा तिथे.*

*गजाननः हो! (थांबून) मावशी, कुणाला भेटायचंय गं?*

13. Ext/ Restaurent/ Day

खुर्चीवर बसलेली एक कुत्री दिसते. त्यावर आवाज येतो. मोना महाबळेश्वरकर.

गजानन चमकून शेजारी पहातो, त्या कुत्र्यानेच धरुन आणलीये अशी वाटावी अशी मुलगी बसलीये. तिनं हाफ जर्कीन घातलंय. त्यावर अॅडवेंचर क्लबचे स्टीकर्स, बिल्ले. गजानन घाम पुसतो.

*गजाननः टेल मी युअर हॉबिस ना?*

*मोनाः जेन्टस फर्स्ट!*

*गजाननः रिडींग, रायटींग, लिसनींग टू टू मेनी सॉंग्स, बाथरुम सिंगिंग, आय लाईक वेरीयस लॅंग्वेजेस युअर युअर?*

*मोनाः आय डोन्ट हॅव हॉबिज, आय हॅव पॅशन! हॉर्स रायडिंग.*

गजानन कुत्र्याकडे पहातो. त्याला घोडा खिंकाळण्याचा आवाज येतो. तो तिच्याकडे पहातो. त्याला ती ऐतिहासिक राणीच्या वेशात बसलेली दिसते. समोर तलवार आहे. जी उलटी ठेऊन ती सँडविच कापतेय. गजानन त्या घोडयाकडे प्रेमाने पहातो.

*गजाननः कधी घेतला घोडा?*

ती त्याला हलवते.

*मोनाः हॅलो. इटस अ डॉग!*

*गजाननः सॉरी. प्लीज कंटीन्यू*

*मोनाः रिव्हर राफ्टींग, रायफल शूटींग, रॉक क्लायंबिग, आय हॅव अॅडवेंचरस प्लॅन्स इन माय लाईफ. माझी एक आख्खी बुक आहे मोनाज प्लॅन नावाची.*

*गजाननः (स्वतःत) तो मोना डार्लिंग, प्लॅन के मुताबिक सोना कहॉं आ रहा है?*

हसायला लागतो. ती त्याला फाडकन मारते. उठते आणि निघून जाते. गजानन मागे मागे जातो.

*गजाननः हॅलो सॉरी, हॅलो.*

(ती निघून गेलीये. गजानन डोक्याला हात लावून उभा आहे. तेवढयात त्याच्या शेजारनं तीन चार डिश हातावर घेऊन कोणीतरी जातं. तो त्याकडे पहात रहातो. शामसुंदर पारिजातक एकेका टेबलवर एकेक गोष्ट ठेवतो. सगळयात शेवटी मुलींच्या इथे डोसा ठेवतो. गजानन अवाक होऊन पहातो.

*मुलगाः अजून काही?*

गजानन चक्रावून पहातो. वेटर असं स्वतःशीच म्हणतो.

*मुलगीः चार एसपीडीपी!*

*मुलगाः जा जाऊन घ्यून ये. (सगळया हसतात.)*

*शामसुंदरः अण्णा वेटर या लाईनचे, फ्रेंड आहेत आपले. पायाला लागलंय. चार वर्ष सर्व्हीस दिली. म्हणलं आजच्या दिवस सेल्फ सर्व्हीस घेतो.*

*मुलगी १ः मला चीझ पायजे होता.*

*मुलगाः त्यात काये? (खिशातून एक चीझ क्यूब काढतो. शार्पनर काढतो. चीज फिरवून टाकतो. गजानन ला हसू येतं. )*

*मुलगी २ः झाला का रिसर्च?*

*मुलगाः डिटेल्ड! आख्ख्या कॉलेजमधले बत्तीस परसेंट नळ गळके निघाले. रोजचं आठशे वीस लिटर पाणी वाया जातं होतं. लेडीज टॉयलेटमध्ये तर हॅवॉक! पोरी सनासना पाणी वाया घालवतात.*

*मुलगी २ः आत जाऊन काही वेगळं केलं नाही ना?*

*मुलगाः काय करणार आत जाऊन? नाही नाही तू सांग. नाही नाही सांग ना?*

*मुलगी ३ः आम्हाला काय माहीत?*

सगळया हसतात, एक मुलगी गपकन त्याच्या मांडीवर मारते. त्याच्या गुडघ्यावर बोटं फिरवते. तो हसतो. गजाननही खुदकन हसतो. मुलगी परत करते. मुलगा परत गुदगुल्या झाल्यासारखा हसतो.

*मुलगाः तिथे हॅवॉक झाला हां, काय स्वीटू! आम्ही बाहेर पडणार तेवढयात एक बदाम गोटू आला समोर. (गजाननकडे पहातो.) सेम अस्सा होता!*

*गजाननः (अनाहूतपणे हात करत) अस्सा नाही मीच होतो.*

मुलगा त्याच्याकडे पहातो.

*मुलगाः काय गोटू?*

सगळया मुली हसतात. गजानन ऑकवर्ड होऊन निघतो.

## 14. Ext/ Restaurent/ Day

रेड सिग्नल दिसतो. गजाननची गाडी येऊन थांबते. तो इकडे तिकडे पहातो. शेजारी एका फोर व्हीलर मध्ये एक माणूस आणि एक बाई भांडतायत. तो त्यांच्याकडे हसून पहातो. मग दुसरीकडे स्कूटरवर एक आज्जी आजोबा शांत बसलेत आज्जीनी खांदयावर हात ठेवलाय. पलिकडे रिक्षात एक यंग कपल बसलंय दोघंही मोबाईलमध्ये आहेत,मध्येच ती त्याला दाखवतेय. तो सगळीकडे पहातो त्याला फक्त जोडया दिसतात. तो थोडा खटटू होतो. तेवढयात सायकलवर एक दहा बारा वर्षाचा मुलगा येतो. गजानन त्याच्याकडे हसून पहातो. तेवढयात त्याच्या मागून मुलगी येते. गजाननन त्या दोघांकडे पहात रहातो. त्याला सायली आणि तो आठवतात.

हळूहळू टॉप अँगलने आख्खा सिग्नल दिसतो. सगळया जोडया आहेत गजानन एकटा आहे. तो मान खाली घालतो, मग वर पहातो. त्याच्या डोळयात हलकं पाणी आहे. लाल सिग्नल दिसतो. आवाज येतो नाही? बरं!

## 15. Int/ / Night/ Maushi Home

अर्धवट उजेडात गजानन बसलाय. मावशी त्याच्यासमोर उभी आहे.

*मावशीः जाऊ दे, सोड. तसंही बाप पेताड आहे तिचा. मी महिन्याच्या आत या गजाननाला शारदा आणते का नाही बघ! (थांबून) हे बघ आज शार्दुल आणि मुग्धा नागझराला गेले होते.*

*गजाननः नायगरा. छान आहे. गुडनाईट.*

(मावशी निघून जाते.)

*गजाननः शाळेच्या खो खो च्या टीममध्ये, कॉलेजच्या नाटकाच्या ग्रुपमध्ये, नेटसेट परिक्षेत चारदा आणि एकवीस मुलींकडनं नकार पचवलाय मी. आपण सिलेक्ट नाही झालो या पेक्षा आपली कुणालाच गरज वाटत नाही ही भावना जास्त त्रास देते मला. असो, एकटया माणसाच्या आतलं दुःख हे त्याच्या मनाला आणि उशीलाच कळणार!*

गजानन उशीवर पडतो आणि उशीवर टपाटप थेंब पडताना दिसतात. तो वळतो आणि पांघरुण ओढून झोपतो. अचानक उठतो. बसतो. डोळे पुसतो. आणि शांतपणे गुडघ्यावर हात ठेवतो. त्याकडे चमकून पहातो. सगळी बोटं एकत्र करतो आणि गुडघ्यावरुन फिरवतो. त्याला गुदगुल्या होतात. तो खिन्नपणे हसतो. पुन्हा करतो. पुन्हा गुदगुल्या होतात. तो हसायला लागतो.

लॅपटॉपवर गुगल अशी स्क्रीन दिसते.

फिंगर टच

फिंगर सायन्स

फिंगरींग टेक्नीक असं टाईप होतं. गजानन खूश होऊन सर्च क्लिक करतो.

असंख्य बायकांचे ऑरगॅझमिक चेहरे येतात. गजाननचा चेहरा अवाक झालेला दिसतो.

ठपकन लॅपटॉप बंद केला जातो.

## 16. Int/ / Day/ College Class

गजानन शिकवता शिकवता बाहेर पहातो त्याला शामसुंदर पारिजातक जीन्स वर करत हिंडताना दिसतो. त्याने हेल्मेट घातलंय.

*मुलगाः आपलं काय आहे, लो ऑन जीन्स अ‍ॅण्ड हाय ऑन कॉन्फिडन्स हा मोटो आहे! तुला काय हवंय? लो वेस्टजीन्स आणि हाय हील्स ना?*

*मुलगीः हो रे.*

*मुलगाः सेल चाललाय ना फ्लिपकार्टवर. धर कर ऑर्डर.*

त्याच्या सोबत एक मुलगी आहे. गजानन अवाक होऊन पहात रहातो.

16A. Int/ / Day/ Toilet

शामसुंदर टॉयलेट मध्ये फोनवर आहे. गजानन दोन कम्पार्टमेंट सोडून उभा.

*मुलगाः म्हणले ना तुला चिचुंद्री? तू चमत्कार पावडर आण! हां, शिऱ्यात घालायची. वाटी वाटी ठेवायचा दोन कोपऱ्यात. सकाळी एकतर उंदीर बेशुध्द नायतर काका! (हसतो.) तो काय विषय आहे का? अपमान इज अपमान.*

गजानन त्याच्याकडे बघून प्रचंड घाबरतो.

16B. Ext/ Day/ College Toilet

शामसुंदर बास्केट बॉल कोर्टवरुन चार मुलींसोबत बॉल डॉज करत जाताना दिसतो. गजानन त्याच्या मागे मागे जातो.

*शामसुंदरः (प्रत्येकीला एक कॅडबरी देत.) आज कोच म्हणून नाही मित्र म्हणून सांगतोय, ३ च गोष्टी असतात जगात. चूझ, चॅलेंज अ‍ॅण्ड चेंज! तेवढचं करा आज! चॅम्पियनशीप आपलीच आहे.*

सगळयांच्या डोक्यावरुन प्रेमाने हात फिरवतो. गजानन लांबून हे पाहूनच गार झालाय. शामसुंदर वळतो. गजानन घाबरुन उलटा चालायला लागतो. शामसुंदर त्याच्या मागे जातो. वाटेत एक मुलगी येते.

*शामसुंदरः ओ, प्रीती! लुकिंग ब्यूटीफूल! कुल्फी?*

(गजानन आश्चर्याने थांबतो. स्वतःशीच कुल्फी? मागे मुलगा आणि मुलगी सेल्फी घेतात. तो वळणार एवढयात मुलगा त्याच्या समोर येऊन उभा रहातो)

*मुलगाः आयएमरॉकिंग.*

*गजाननः येस. ऑफकोर्स.*

*मुलगाः माझा टवीटर हॅंडल. फॉलो करायचंय तर तिकडं करायचं. कॉलेजमध्ये नाही काय गोटू? (जायला निघतो.)*

*गजाननः तुझं आयकार्ड माझ्याकडे आहे.*

*मुलगाः आज वार काय आहे?*

*गजाननः आँ! मंगळवार.*

*मुलगाः हां. दया मग. एकावर एक फिल्म तिकीट फ्री असतं. उदया परत देतो.*

*गजाननः अरे मी गजानन सर.*

*मुलगाः आयो तुम्ही गजानन सर होय? (त्याचा गालगुच्चा घेतो.) हसून सांगा ना नाव. आई बापानी कपडयाच्या बदल्यात घेतलंय का?*

*गजाननः हे बघ, शामसुंदर पारिजातक!*

*मुलगाः नाव घेईपर्यंत म्हातारे व्हाल, बत्तीस म्हणा!*

*गजाननः काय?*

*मुलगाः बत्तीस. आपल्याला सगळे बत्तीस म्हणतात. येऊ का?*

*गजाननः एक मिनिट. मी टिचर आहे. आणि तू स्टुंडट. मला सांग कुठनं येतो हा आगाऊपणा?*

*मुलगाः इनबिल्ट आहे या जनरेशनच्या प्रोसेसर्समध्ये.*

*गजाननः हेच, संस्कार म्हणून नाहीत. लेडीज टॉयलेटमध्ये घुसतोस. लेक्चर बुडवून हॉटेलमध्ये बसतोस, गुडघ्यावरनं बोटं फिरवून घेतोस. गुदगुल्या झाल्यासारखा हसतोस. काय होतं बोटं फिरवल्यानी, सांग ना काय होतं?*

*मुलगाः (त्याच्या जवळ जात) सर तुम्ही खरंच चिडलाय का माहीती काढताय?*

*(गजानन गांगरतो. बत्तीस हसत रहातो. आयकार्ड घेतो.)*

*मुलगाः या एक कुल्फी घेऊ!*

*गजाननः कुल्फी?*

*बत्तीसः कूल सेल्फी! कुल्फी!*

(बत्तीस सेल्फी घेतो. गजानन वैतागून पहातोय. बत्तीस पँट वर करत निघतो. मध्येच थांबतो. वळतो आणि गजानन ला डोळा मारतो. गजानन घाबरुन इकडे तिकडे पहातो आणि कोणाला? असं विचारतो. बत्तीस परत डोळा मारतो आणि फ्लाईंग किस देतो. गजानन कॉरीडॉरमध्ये एकटा उभा राहून स्लो मोशनमध्ये लाजताना दिसतो.)

*गजाननः बत्तीस, मला आयुष्यात डोळा मारणारी पहिली व्यक्ती!*

रंगीत पुस्तकाचं पान दिसतं. त्यावर लिहीलंय प्रकरण दुसरे. मानसिक गुदगुल्या आणि शारिरीक शिक्षण.

17. Ext/ Day/ Canteen

गजाननचा गुडघा दिसतो. त्यावर बत्तीसचा हात आहे. बत्तीस गुदगुल्या करतो. गजानन टेबलाच्यावर हसताना दिसतो. आजूबाजूचे एकदम पहातात. बत्तीस परत करतो. गजानन परत हसतो.

*गजाननः काय असतं काय हे एक्सॅक्टली?*

*बत्तीसः गैरसमज. जगात अनेक गैरसमज आहेत, लहानपणी नाही का वाटायचं चिकूची बी गिळली की बेंबीतनं झाड येतं, अहो या रेट नी मी घरनच चिकू एक्सपोर्ट केले असते. खाल्ली बी, आलं झाड. काढले चिकू. परत खाल्ली बी. तसंच हाही एक गैरसमज आहे की गुडघ्यावर गुदगुल्या झाल्या की समजायचं माणूस वर्जिन आहे.*

*गजाननः (हसतो. बत्तीसही हसतो.) पण मी वर्जिन नाहीचे, मी कॅप्रीकॉन आहे.*

*बत्तीसः (त्याच्याकडे बघतो) काँग्रॅच्युलेशन्स. तुम्हाला मिळतंय वाईचं ट्रॅवलिंग वाऊचर. आजच निघा.*

*गजाननः सॉरी मी अँटीसिपेट केलं चुकून.*

*बत्तीसः पार्टीसिपेट केलंय का कधी?*

*गजाननः हे काय वय आहे का तुझं हे सगळं बोलायचं.*

*बत्तीसः टॉक विथ रिस्पेक्ट. सिक्सर झालाय आपला. दोन शाळा, एक क्लास, एक पेट्रोल पंप, एक ऑनलाईन, एक राँग नंबर! सध्या मी रियलाझेशन ब्रेकवर आहे, एक पुस्तक लिहीतोय!*

*गजाननः एवढया मुली कशा पटतात?*

*बत्तीसः जगात कुठेही मुली तीनच गोष्टींनी पटतात. टॅलेंट, ॲटीटयूड आणि लूक्स!*

*(गजानन त्याच्याकडे कुतूहलानी पहातो.)*

*गजाननः मग तुला?*

*बत्तीसः (हसतो.) लूक्स!!*

17A. Ext/ Day/ Stairs

आवाज येतो बाई वाडयावर या. बत्तीस डबस्मॅश करतोय. गजानन शेजारी बसलेला आहे.

*बत्तीसः एवढया वेळात एखादयानं भारताची हिस्टरी सांगीतली असती, तुम्ही स्वतःची तर सांगा! बोला हो! (थांबून) बरं सेवन वन टू नाईन. माझ्या एटीएमचा पिन. बास! नाही सांगणार कोणाला. बर शाळेत कुठल्या होतात?*

*गजाननः मुलांच्या.*

*बत्तीसः अररर...*

*गजाननः एक मैत्रीण होती, तिलाही दरवर्षी घरचे राखी बांधायला लावायचे. कधी चोवीस पंचवीस झालो कळलंच नाही, लहानपणी सगळे म्हणायचे खूप शिक, बीए एम ए, नेट सेट झालो रे, मग म्हणले*

*कशाला एवढं शिकलास? नोकरी, पैसे, रुप काहीही नव्हतं, मी पण जरा वर्ष जाऊ दिली म्हणलं अजून मॅच्युअर होऊ!*

*बत्तीसः वर्ष घालवून फक्त एफडया मॅच्युअर होतात.*

*गजाननः त्यामुळे अजूनही तसाच आहे!*

*बत्तीसः म्हणजे तुमचं लग्न नाही झालं?*

*गजाननः नाही.*

*बत्तीसः बर मुलंबाळं?*

*गजानन रागाने पहातो.*

*गजाननः फालतूपणा करायचा विषय नाहीये हां हा! मी सिरीयसली बोललो.*

गजानन त्याच्याकडे पाहून तिथून उठतो. नकारार्थी मान डोलावतो आणि निघून जातो. बत्तीस त्याच्याकडे पहात रहातो. गजानन लांब लांब चालत चाललाय. बत्तीस उठतो. हाक मारतो. सर , ओ सर!

18. Ext/ Day/ Corridor

गजानन चालत कॉरीडॉरमध्ये येतो. आजूबाजूला काही विदयार्थी आणि काही शिक्षक. तो स्वतःच्या तंद्रीत चालत जातो. तेवढयात अनाहूतपणे बत्तीस हाक मारतो ओ काका! आख्ख्या कॉरीडॉर मधून फक्त गजानन वळून पहातो. अचानक वातावरण स्तब्ध होतं. बत्तीस जीभ चावतो. गजानन इकडे तिकडे पहातो. मान खाली घालतो.

*गजाननः आयुष्यात तुमचे अपमान नेहमी स्लो मोशनमध्येच होतात. तिशीतल्या माणसाला एकवेळ लादेन किंवा दाऊद म्हणलं तरी चालेल, पण काका? या वयाची काय विचित्र अवस्था असते, बाळा म्हणलं तरी राग येतो आणि काका म्हणलं तरी.*

बत्तीस त्याच्या समोर उभा आहे.

*बत्तीसः मित्र होणार का?*

*गजाननः (नकारार्थी मान डोलावतो.) तुझा हा सगळा मूर्खपणा सहन करायला?*

*बत्तीसः मी पण करतो तुमचा.*

*गजाननः मी नाही करत मूर्खपणा!*

*बत्तीसः कराना मग! इतके मस्त आहात, तुम्ही एखादया मुलीचा आयुष्यात आलात तर कल्ले होतील तिचे! असला गोंडस टेडीबेअर गाल असलेला नवरा!*

*गजाननः मी?*

*बत्तीसः हां, फक्त तुम्ही बोर आहात, थोडं वायझेड व्हायला पाहीजे!*

*गजाननः हे वायझेड काये?*

*बत्तीसः आयो तुम्हाला वायझेडच माहीत नाही?*

*गजाननः काही शिवी वगैरे आहे का?*

*बत्तीसः (हसायला लागतो. थांबतो) नाही!*

*गजाननः (जवळ येतो.) मग सेक्सशी वगैरे रिलेटेड?*

*बत्तीसः सर, बिटटी घेईन हा परत बोललात तर!*

*गजाननः मग काही चुकीचं अश्लील वगैरे?*

*बत्तीसः काही नाही, वायझेड हे आर्ट आहे, दंगा आहे, व्हिजन आहे आणि सगळयात महत्वाचं, वायझेड हा अॅटीटयूड आहे. व्हायचं का वायझेड? १००० रुपये फी! टायमिंग फ्लेक्सिबल,सब्जेक्ट चेंजेबल, एक्सॅम अवॉयडेबल, सिलॅबस मी सांगीन तो, अभ्यास तुम्ही कराल तितका, नो कॅम्पस इंटरव्यू, गॅरेंटीड प्लेसमेंट, त्यावर १०० परसेंट कॅशबॅक! एकाच जन्मात, दुसरं आयुष्य लिमिटेड लोकांनाच मिळतं.*

गजानन १००० रुपये काढून देतो.

*बत्तीसः नंबर घ्या, ९८३२३२३२३२*

*गजाननः (त्याला शेकहँड करत) काही प्रॉब्लेम नाही ना येणार?*

*बत्तीसः नाही ना तुम्हाला प्रेमात पाडलं, वर्षभर श्री जी नाही वापरणार!*

## 19. Int/ Night/ Home

फोनच्या स्क्रीनवर बत्तीसचा डीपी दिसतो. त्याखाली लिहीलंय. डोन्ट बी एक्सवायझेड बी वाय झेड! गजाननला मेसेज येतो. यो. गजाननही त्याला स्टीकर पाठवतो. यो. तो म्हणतो फोटो काढून पाठवा. गजानन फोटो काढायला जातो. तेवढयात दार उघडून अंतरा आत येते. तीने शॉटर्स आणि टी शर्ट घातलाय.

*अंतराः आरती, आहेस का गं? टॉप्स देणार होतीस ना...*

*गजाननः यो!*

गजानन कडे पहाते आणि हसायला लागते.

*अंतराः चालू दे यो काका! (आरतीचा आवाज येतो. आलेच!) मी बसते इथेच. आरतू येईलच.*

त्याच्याकडे तो ऑकवर्ड होईल असं पहातेय. गजानन तसाच उभा रहातो. दोघांच्यात सायलेन्स जातो.

*अंतराः व्हॉट डू यू ड?*

*गजाननः मी टिचर आहे.*

*अंतराः दिसतंच आहे. टीचींग पण कसलं बदललंय ना आता. डिजीटल बोर्डस आले, ॲप आले. तुमच्या काळात काय वेगळंच असेल ना?*

*गजाननः आमच्या काळात??*

*अंतराः हां, एक दहा पंधरा वर्षांपूर्वी!*

*गजाननः मी लहान आहे तसा... लायसन्स दाखवू का?*

*अंतराः ओ के लेट मी गेस...फोर्टी टू?*

(आरतीचा आवाज येतो. इकडेच ये गं. तिकडे नको. अंतरा झपकन बाहेर निघून जातो. गजानन तिच्याकडे पहात रहातो.)

## 19A. Int-Ext/ Night/ Home Balcony

बाल्कनीत छोटी गादी टाकून त्यावर लाईटच्या माळा सोडून अंतरा आणि आरती बसलेल्या आहेत.

*अंतराः मॅरीड आहे?*

*आरतीः कुठल्या अँगलने असेल? दादा आणि हा एकाच वयाचे आहेत.*

*अंतराः वेट, हा फॉर्टी टू नाहीये?*

*आरतीः थर्टी थ्री, दादाहून एक वर्ष मोठा. दादा बघ कसला स्मार्ट आहे, परवा सिक्स मंथ ॲनिवर्सरी होती तर गोल्डन ब्रिजला घेऊन गेला वहीनीला आणि तिथे डायमंड दिला.*

*अंतराः हा काका फार फार तर बालगंधर्वच्या ब्रीजवर उभं राहून गजरा देईल. पण याचा प्रॉब्लेम काय आहे?*

*आरतीः काहीतरी सेक्शुअरल वगैरे असणार, किंवा कॉम्प्लेक्स. किंवा गंडवलं असणार एखादया वाईच्या मुलीनी! मेजर प्रॉब्लेम असणार बघ काहीतरी! मेज्जर प्रॉब्लेम!*

अंधारात गजानन हात चेहऱ्याखाली ठेऊन ऐकत रहातो.

## 20. Int/ Day/ College

कॉलेजची बेल वाजते.

गजानन आणि बत्तीस वर्गात बसलेत. बत्तीस फळयासमोर आणि गजानन बाकावर.

*बत्तीसः वेलकम टू इंडक्शन प्रॉग्राम!*

*गजाननः माझा प्रॉब्लेम ती आहे.*

*बत्तीसः नाव पत्ता दया! घरीच जाऊ.*

*गजाननः ती अशी अस्तित्वात नाहीये.*

*बत्तीसः आयो डायन?*

*गजाननः म्हणजे असते ती. तिला तोडायचंय मला.*

*बत्तीसः टू मच बफरिंग टाईम!*

*गजाननः (दोन्ही हात पुढे घेत.) वर्जिनिटी! एकदा ते झालं की मग मी नॉर्मल ला येईन! बघ!*

*बत्तीसः तुमचा सिलॅबस मध्ये नाही सब्जेक्ट मध्ये घोळ आहे. माणूस वर्जिन आहे म्हणजे वाईट आहे असं थोडीच आहे. वर्जिन असणं हा चॉईस आहे, वाय झेड असणं हा ॲटीटयूड आहे. काय?*

*(एवढयात दार उघडतं आणि एक सुंदर मुलगी येते.)*

*मुलगीः एक्सक्युजमी विच क्लास?*

*बत्तीसः या इटस फिजीक्स विथ अकाऊंटीग ॲण्ड वार हिस्टरी!*

(गजानन इकडे तिकडे पहायला लागतो. बत्तीस तिच्या जवळ जातो. दोन क्षण जातात. ती मिठी मारुन जाते. बत्तीस तिचा नंबर सेव करतो. गजाननच्या जवळ येतो.)

*गजाननः ओळखीची आहे?*

*बत्तीसः झाली! चला न्यूटन थांबलाय!*

21. Int/ Day/ Physics Lab

ॲनिमेशनमध्ये झाडावरुन एक सफरचंद पडताना दिसतं. त्यावर येतं न्यूटनचा १ ला नियम.

गजानन आणि बत्तीस बसलेले आहेत.

‘An object in motion stays in motion with the same speed and in same direction unless acted upon by an unbalanced force’

*बत्तीसः तुमचं तेहतीस वर्षाचं स्लोमोशन मध्ये चाललेलं आयुष्य असंच चालू राहीलं, जर प्रेम नावाचा फोर्स त्याला धडकला नाही तर. तो आत्ताच धडकला पाहीजे. म्हणजे समजा तुम्ही रस्त्यानी चाललायत आणि एखादी मुलगी धडकली, तिची पुस्तकं पडली तर तुम्ही काय कराल?*

*गजाननः अं! नमस्कार!?*

22. Int/ Day/ Accounts Department

*टॅलीची स्क्रीन दिसते. बत्तीस आणि गजानन दोघं कम्प्युटर लॅब मध्ये बसलेत. त्या स्क्रीनवर येतं.*

*जनरल अकाऊंटीग रुल २:* 'The general accounting should be done by method double entry system'

*बत्तीसः हरकत नाही सायन्स सगळयांनाच नाही झेपत. कॉर्मसचा सगळयात जास्त फायदा प्रेमात होतो. डबल एन्ट्री सिस्टीम हा तर फार महत्वाचा शोध आहे. म्हणजे समजा तुम्ही प्रेमात पडलात.*

*गजाननः मी?*

*बत्तीसः हायपोथेटीकल आहे. एक्साईट होऊ नका.*

*बत्तीसः तुम्ही एकदा सोन्याचं कानातलं घेतलं, एकदा साडी घेतली, पार्लरचं बिल दिलं, अन या सगळयाच्या बदल्यात तिनी तीन महिन्यात एकावर एक फ्री असलेला डिओ दिला तर कितीला परवडलं प्रेम? त्यामुळे डेबिट आणि क्रेडीट दोन्ही इम्पॉर्टंट. बर मला सांगा, एखादया मुलीच्या प्रेमात पडलात, तुमचं लग्न झालं तर पहिले तुम्ही तिच्याकडून काय मागाल? (थांबून) राहू दे नका लोड घेऊ!!*

*(गजानन विचार करतो.)*

*गजाननः अं! (विचार करत) टॉवेल!!*

*दाराला कडी लावलेली दिसते. गजानन आतून ओरडतोय.*

*गजाननः अरे सॉरी, अरे उघड ना, परत नाही असं बोलणार. हॅलो!*

*बत्तीसः थांबा, टॉवेल आणतोय!*

बत्तीस बशीतून चहा पिताना दिसतो.

## 23. Int/Afternoon/ History Department

विन्स्टन चर्चिल आणि हिटलर अशा दोघांची पोस्टर्स दिसतात. गजानन आणि बत्तीस त्यांच्या समोर टेबलवर बसले आहेत. दोघांच्या हातात पुस्तकं.

*बत्तीसः मोराल डाऊन केलंत तुम्ही तरी शिकवतोय, आता तिसरा रुल! वाचा!*

*गजाननः* 'People and property that do not contribute to the war effort should be protected against uneccesary destruction and hardships'

*बत्तीसः प्रेम दोघांचं असतं. त्यात आई बाप, तुमचा भाऊ, तिचा शेजारी यांना इन्व्हॉल्व्ह करायचं नाही. आणि मालमत्तेचं नुकसान करायचं नाही. ब्रेकअप झाला की गाडीच्या सीटावर ब्लेड मार, फेसबुक*

*अकाऊंट हॅक कर, टॉयलेटमध्ये बॉयफ्रेंडच्या वडलांचा नंबर लिहून 'कॉल मी हनी' असलं आजिबात करायचं नाही.*

*गजाननः (आश्चर्याने हसत) असं करतात लोकं?*

*बत्तीसः आपला फ्रेंड, विपुल, त्याच्या गर्लफ्रेंड नी ब्रेकअप नंतर, त्याच्या वडलांचा नंबर मूळव्याधीच्या दवाखान्याच्या पोस्टरखाली लिहीला होता. आणी खाली लिहीलं होतं १२ नंतर कॉल करावा. रोज रात्री टेलिफोन एक्सचेंज!*

## 24. Int/Evening/Road

मूळव्याधीच्या दवाखान्याचं पोस्टर दिसतं. गजानन त्याकडे हसत पहात उभा आहे. खुणेनीच बत्तीसला विचारतो. बत्तीस हसतो.

*गजाननः एवढं सगळं कसं येत तुला?*

*बत्तीसः शिक्षणाची आवड! अकरावीत हॅटट्रिक केली ना मी. आधी सायन्सला होतो, मग कॉर्मस आता आर्टस! पण तीन स्टार्टअप ला फंडींग केलंय. आले की हॅवॉक होणार!*

*गजाननः काय??*

*बत्तीसः हां! बाहेरचं जग इथल्या सिलॅबसच्या फार पुढं आहे अहो.*

*गजाननः तुझं नाव खरंच शामसुंदर पारिजातक आहे? वाटत नाही!*

*बत्तीसः नावाचा आणि पर्सनालिटीचा काही संबंध नसतो. गेंडयाचं नाव सुकुमार असतं, माझे आगलावे नावाचे काका फायरब्रिगेड मध्ये आहेत.*

*गजाननः (समोरच्या बंगल्याकडे पहात.) ही पाटी का लावलीये?*

*बत्तीसः पुण्याची स्टाईल आहे, इथं भारी लोकांच्या घराबाहेर निळया पाटया लावतात.*

*गजाननः (बघतो) भारी रे!*

*त्याच्या चेहऱ्यावर बत्तीसचा आवाज येतो.*

*बरं आज टयूटोरिअल झाली, उदया प्रॅक्टीकल!! सकाळी सहा वाजता टेकडीवर!! तयार होऊन या!!*

## 24A. Int/Night/Home

गजानन टीव्ही पहातोय फक्त आवाज त्याच्या चेहऱ्यावर प्रकाश

*टीव्हीतील मुलगीः हॅव सम सेन्स, यू आर आस्कींग अॅन अननोन परसन!*

*मुलगाः ओ कमआॅन लेटस गो.*

*मुलगीः बिहेव युअरसेल्फ! आॅर आय विल शाउट!*

25. Ext/Day/Tekdi

सूर्य उगवताना दिसतो. गजानन टेकडीच्या खाली उभा दिसतो. पायात फॉर्मल शूज. पँट. शर्ट, स्वेटर, आणि मागे सॅक. हातात पेपर. तो मन लावून वाचताना दिसतो. कॅमेरा त्याच्या पाठीमागे जातो तेव्हा बिकीनीतल्या मॉडेल शेजारची बातमी तो वाचतोय. त्याच्या खांदयावर टॅप केलं जातं. तो समोर पहातो. कालचीच मुलगी उभी आहे. अत्यंत अॅट्रॅक्टीव्ह अशा स्पोर्टस आऊटफिट मध्ये.

*मुलगीः हाय! चल वर.*

*गजाननः हॅव सम सेन्स. यू आर आस्कींग अॅन अननोन पर्सन.*

*मुलगीः बत्तीस वर आहे, त्यानी यायला सांगितलंय. चल लेटस गो यार.*

*(त्याच्या हाताला धरायला जाते.)*

*गजाननः आय एम नॉट यार ऑफ एनीबडी. बिहेव युअरसेल्फ. आय वील शाऊट! (ती थांबते. हात पुढे करते. गजानन पुढे चालत जातो.)*

25A. Ext/Day/ Tekdi

टेकडी चढतानाचे विविध शॉटस जातात.

25B. Ext/Day/ Tekdi

सूर्यासमोर बत्तीस सूर्यनमस्कार शिकवतोय. गजानन त्याच्या समोर येतो. मुलगीही येते. बत्तीस उठतो.

*बत्तीसः अरे व्वा, आज काय टेकडीवर लेक्चर आहे वाटतं?*

*गजाननः रनिंगचं साहीत्य नव्हतं.*

*बत्तीसः साहीत्य? असू दे! ओळख झाली? समायरा, गजानन, गजानन समायरा!*

ती हात पुढे करते. गजानन थांबतो.

*बत्तीसः अहो मिळवा हात, शॉक नाही बसत मुलींना हात लावल्यावर!*

ती जोरजोरात हसते. त्याच्या केसावरनं हात फिरवते हसून निघून जाते. गजानन तिच्याकडे पहात रहातो.

*बत्तीसः चला रेस आहे आपली!*

25C. Ext/Day/ Tekdi

दोघं रेसच्या पावित्र्यात उभे आहेत. बत्तीस पळत पळत जातो गजानन ला हरवतो. टूकटूक करतो.

25D. Ext/Day/ Tekdi

दोघं दमून चौथऱ्यावर बसलेले दिसतात. गजानन स्वतःच्या घाण झालेल्या पायांकडे पहातो. पहात रहातो. त्याला हसू येतं.

*गजाननः लहानपणी करायचो रे असला वेडेपणा. च्यायला लहानपणी बरं असत ना, कसेही वागा आपल्याला त्यावरनं कोणी जज करत नाही.*

बत्तीस त्याच्याकडे पहात राहीलाय. समोर पहातो. मुली एक्सरसाईज करताना दिसतात. बाकी सगळं आऊट ऑफ फोकस.

*बत्तीसः काय मस्त दिसतंय ना समोर?*

गजानन पहातो. आपल्याला हिरवळ, निसर्ग सूर्य फोकसमध्ये दिसतात. मुली आऊट ऑफ फोकस.

*गजाननः हो रे. हिरवळ,आकाश, पक्षी, सूर्य, निसर्ग म्हणजे काय गूढ आहे ना?*

*बत्तीसः (त्याचा चेहरा धरुन वळवतो.) तुम्ही नाही सुधरणार, अहो जगातली सगळयात सुंदर गोष्ट  तुमच्यासमोर आहे आणि सिनरी कसली बघताय?*

*गजाननः मी मुलींकडे बघू?*

*बत्तीसः का? मुली ही जगातली सगळयात सुंदर गोष्ट आहे, आणि मी तिच्याकडे प्रेमानी पहातोय. तुम्ही पाहीलंय कधी मी एखादया मुलीकडे वाईट नजरेनी पाहीलंय, उगाच चान्स मारलाय, उगाच हात लावलाय. आजिबात नाही.*

*गजाननः मला नाही पटते. चीप आहे हे सगळयांसमोर मुली बघणं!*

*बत्तीसः तुम्ही लहानपणी बघायचात ना त्याच नजरेनी बघा. मैत्रीच्या, प्रेमाच्या. तुम्हाला कोणी जज करणार नाही! मुलीचं हसू, तिचा विश्वास आणि प्रेम हे तीनही मिळवायला मनानं खूप क्लिन असायला लागतं. मुलींना लगेच कळतं! (समोर पहातो. डोळयात चमक येते.) आणि तुम्हाला काय वाटतं? मुलचं मुलींकडे वाईट नजरेनी पहातात.*

*गजाननः अर्थात!*

*बत्तीसः सर, एक मुलगी दुसऱ्या मुलीकडे ज्या नजरेने पहाते ना मुलं परवडली. ते बघा.*

एक मुलगी दुसऱ्या मुलीच्या फिगर कडे अत्यंत खुन्नसने पहातेय. गजानन अवाक होतो. बत्तीस त्याच्याकडे पहातो. गजानन हसायला लागतो. जोरजोरात हसायला लागतो.

*गजाननः कमाल आहे. माझ्यापेक्षा जवळपास निम्म्या वयाच्या माणसाबरोबर मी*

*पुण्यात सकाळी टेकडीवर बसून मुली पहातोय.*

*बत्तीसः एज्युकेशन हे फिल्डच असं आहे, इथं कधी काय शोध लागेल सांगता येत नाही.*

*गजाननः (हात टेकवत त्याच्याकडे पहात.) आज दुसऱ्यांदा अशी मजा आलीये. तू एकदा वाईला ये ना, वाईच्या काठावर नदीत पाय बुडवून बसायला काय मजा येते.*

*बत्तीसः तुमच्या लग्नाला!*

*गजाननः ऐ तुला सिरीयसली वाटतं माझं लग्न होईल?*

*बत्तीसः ग्रेस मार्क लागतील पण पास तर व्हाल तुम्ही! आता मी जे सांगणारे त्यान तुमची प्रेमाची डेफिनेशन बदलणारे!*

*गजाननः काये आता?*

*बत्तीसः टयूटोरिअल झालं, प्रॅक्टीकल झालं आता डिस्टंस लर्निंग.*

दोघं पाठमोरे हसत बसलेले दिसतात. पुढे मुली व्यायाम करतायत.

26. Ext/Evening/ Mall

गजानन बावरलेल्या नजरेनी पहिल्यांदा मॉलमध्ये येतो. पहातो. चालत चालत जातो. दुकानातल्या पुतळयासमोर उभा रहातो. विविध ब्रँडस दिसतात. त्याच्यात लहानमुलाचं कुतूहल दिसतंय. बत्तीस लांबून पहातोय. गजानन हळूहळू एकटा फिरतोय. बत्तीस त्याच्याकडे हसून पहातो.

26A. Ext/Evening/ Mall

शूज चे दोन जोड दिसतात. गजानन कन्फ्यूज होऊन पहातो.

*गजाननः कुठले घेऊ?*

अचानक बत्तीस येऊन शेजारी उभा रहातो.

*बत्तीसः तुम्ही लहानपणी असतात तर कुठले घेतले असते?*

*गजाननः अरे! मी...(एक बोट दाखवतो.) हे.*

*शूज उचललेले दिसतात.*

26C. Ext/Evening/ Mall

लहान मुलं पळताना दिसतात. गजानन आणि बत्तीस कँडी खात उभे आहेत.

*बत्तीसः सर, जगात प्रेम या गोष्टीचे तीन प्रकार आहेत. हवा, खवा आणि धुव्वा!*

*गजाननः अरे कुठनं आणतोस हे शब्द. कोण हवा? कसला खवा? आणि कुठनं धुव्वा?*

*बत्तीसः माझ्या डिक्शनरीची एक कॉपी तुम्हालाही देतो. प्रेम करणाऱ्यांची पहिली कॅटेगरी हवा! यातलं कपल, फक्त हवा करायला प्रेमात पडतं. पोरगा पण पोरगी पण, यांना प्रेमात पडण्यापेक्षा आपण प्रेमात*

*आहोत हे फेसबुकवर टाकायला आवडतं. एबीसी असो नायतर सीसीडी हे पीडीए मध्ये पीएचडी मिळवतात आणि मग एका पॉईंटला बरोब्बर टीटीएजी करतात.*

*गजाननः हे सगळे शॉटफॉर्म मला मेसेज करशील का नंतर?*

*बत्तीसः (हसायला लागतो.) सर, तुम्ही म्हणजे एकदमच जॉन्सन बेबी आहात! या हवा बघूया!*

*गजाननः मी निघतो.*

*बत्तीसः (हात धरतो) चला हो.*

*गजाननः नको, मला उशीर होतोय.*

*बत्तीसः मावशी काय गेट बंद करणारे का दहा नंतर? चला!*

*(वळतो. एक झँकी पँकी पोरगा दिसतो.) अरे काय नित्या, काय चालंलय?*

(तोही हात करतो. हा वळून पहातो. गजानन गायब आहे. इकडे तिकडे पहातो, त्याला गजानन जाताना दिसतो. गजानन ला हाक मारतो. गजानन पहात नाही. बत्तीस मागे पळत जातो आणि जोरात हाक मारतो. ‘ओ काका!’ गजानन पुन्हा मागे वळून पहातो.)

PB SONG 2: O KAKA!

बत्तीस त्याला धरतो आणि वेगवेगळी कपल्स दाखवतो.

दोघांचा एक ॲक्शन कोडवर्ड ठरतो.

PBS 2. B int/ Classroom/Day

वर्गात एक मुलगी चालत येते बत्तीस सेम ॲक्शन करतो. गजानन फुटतो.

PBS 3. C Ext/ Under construction building/ Night

एका मॅपवर डेस्टीनेशन ट्रॅवल होताना दिसतं. डेस्टीनेशनला पोचल्याची खूण येते.

गजानन वर पहातो. तो रात्री एका अंडर कन्स्ट्रक्शन बिल्डींग खाली उभा आहे.

वर येतो. कोपऱ्यातून बत्तीस त्याच्या भॉ करतो. तो दचकून घाबरतो.

*बत्तीसः मिटींग प्लेस.*

गजानन इकडे तिकडे पहातो. लांबवर त्याला एक मुलगी घरात खेळताना दिसते.

PBS 4. B int/ Bathroom /Day

गजानन अंघोळ करता करता मध्येच ॲक्शन करतो. गडबडतो. हातातून मग खाली पडतो.

PBS 5. B int/College/ Day

टींडर ॲप दिसतं गजानन ने ते उघडलंय, त्यावर एक मुलगी येते. तो घाबरुन बंद करतो.

PBS 5. D Int/Day/ Home

फोटो काढला जातो. अंतरा अपडेट करतीये. गजानन आरती अंतरा मावशी जेवायला बसलेत.

*अंतराः आरतू, अगं हे बघ परी आणि सँडी , काय फोटो टाकतात एकमेकांबरोबर, सारखं आपलं फीलींग लव्हड, अमेझ्ड, इन्स्पायर्ड! जामचं प्रेमात आहेत हे फेसबुकवर!*

*गजाननः हं हवा! बळच!*

मावशी अंतरा आरती बत्तीस सगळे एकदम त्याच्याकडे चमकून पहातात.

*मावशीः काय रे? पोळी वाढू का? खव्याची आहे!*

*गजाननः खवा??*

27. Int/Day/Computer Science Dept.

यू टयूबवर एक लिंक येते. गजानन ती ओपन करतो. पंचतंत्र असं दिसतं. दोन बोके आणि एक माकड दिसतं.

*बत्तीसः ही आहे आपली दुसरी कॅटेगरी! पंचतंत्र फार लेजेंडरी पुस्तक आहे प्रत्येक गोष्ट या कपल्सना लागू होते.*

*गजाननः वाटटेल ते.*

*बत्तीसः बघा ना,सगळयात लागू पडणारी गोष्ट खवा आाणि बोक्याची, म्हणून दुसरी कॅटेगरी खवा. यात पोरं पोरी आधी एकमेकांना मित्र करतात आणि मग मनू, पिल्लू, बबू.*

*गजाननः सगळी बोक्यांचीच नावं आहेत रे.*

*बत्तीसः अशे एकदोन बोके स्टँडबायला ठेवतात, त्यांनाच खवा मिळणार असं सतत फील देतात, आणि मग शेवटी टापकन स्वतःच खाऊन टाकतात. हा खवा कपल मधला संवाद बघा.*

*मनू हाय, मनू बाय, मनू मेसेज कर, मनू फोन घे, मनू एकटं वाटतंय,मनू खूप गर्दी आहे, मनू पार्लरला जायचंय, मनू रिचार्ज करायचंय, मनू घरी ये ना, मनू गिफ्ट दे ना, मनू हा माझा बॉयफ्रेंड, मनू माझं लग्न ठरलंय, की दोन्ही मनू डेड! याच्यावर आपल्या एका मित्रानी मनू रॅप नावाचं गाणं पण केलंय.*

*गजाननः काय?*

*बत्तीसः असं बघू नका, २ लाख हिटस आहेत!*

गाण सुरु होतं. मनू रॅपचा व्हिडीओ दिसतो. त्यात बत्तीस दिसतो.

*गजाननः हा तू आहेस?*

*बत्तीसः बॅकींग व्होकल्स!*

गजानन जोरजोरात हसायला लागतो. व्हिडीओ दिसतो.

28. Ext/Night/Under constrction building

समोरच्या घरात लहान मुलगी हात करताना दिसते. गजानन समोरुन तिला हात करतो, आणि वळतो. शेजारी बत्तीस उभा.

*गजाननः मला तर कधी कधी वाटतं तू प्रकट होतोस.*

*बत्तीसः माझं राहू दया. शिकून कसं वाटतंय सर?*

*गजाननः मला विश्वास बसत नाहीये मुलं मुली असे वागतात.*

*बत्तीसः राँग. फक्त खवा असे वागतात.*

*गजाननः विस्मयकारक आहे हे!*

*बत्तीसः उदया डिक्शनरीपण आणा येताना. अन हे असले शब्द उच्चारलेत ना पटलेली पोरगीही पळून जाईल! आता आपण आपल्या कोर्सच्या सगळयात महत्वाच्या टप्प्यावर आलोय, पण त्या आधी एक महत्वाची गोष्ट... रिवीजन.*

गजानन त्याच्याकडे पहात रहातो. खूश होऊन डोळे मिटतो. त्याला बत्तीस बिरबल सारखा आणि तो अकबरासारखा उभे दिसतायत. गजानन त्याच्याकडे अतीव खूश होऊन पहातो.

*गजाननः,ता उम्र तहे दिलसे हम आपकी इस खिदमत के नुमाईंदे रहेंगे. मोहोबत्त के इस दौर मै आपका तर्जुबा किसी अजूबेसे कम नही. आप दिखते है किसी पागल की तरह, लेकिन आपका पागलपन आनेवाली सदियोंके लिये मिसाल से कम नही.*

*बत्तीसः जहापनाह. आपका सुकून ही मेरी मिलकीयत, आपका जुनून ही मेरी इबादत, ये बेशकिमती गुलाब आप सूंघेंगे तो बहार मे चमन आ जायेगी.*

*गजाननः बेशक! अब हमे एकही मुक्कम्मील चीझ की तलाश है!! धुव्वा!!*

बत्तीस त्याला गुलाब देतो. गजानन तो गुलाब घेऊन वास घेतो. डोळे मिटतो. त्याला ठाप ठाप करुन उठवलं जातं. बत्तीस चक्रावून पहातोय.

*गजाननः मला सांग हे धुव्वा काय आहे रे? सांग ना! (त्याला मारत) सांग ना?*

*बत्तीसः हाच मुददा आहे, शिकवणारा चांगला असेल तर विदयार्थ्याला विषयाची गोडी लागतेच! हवा पाहीली, खवा खाल्ला आत्ता उदयापासनं धुव्वा!!*

दोघांच्याही डोळयासमोर धूर झालेला दिसतो.

29. Int/Day/Maushi Home

धुपाचं पात्र फिरवलं जाताना दिसतं. समोर एक मुलगी बसलेली दिसते. साडी नेसलेली. गजरा माळलेली. तिच्या शेजारी तिचे आई वडील. गजानन आणि बत्तीस गार झालेत. मावशी खूश आहे. कोपऱ्यात आरती आणि अंतरा उभ्या आहेत.

*मावशीः पत्रिका जुळलेल्या आहेतच.*

गजानन आँ असं म्हणून दचकून पहातो.

*हो! आईला फोटोही पाठवला. बाकीही सगळं सुयोग्यच आहे.*

*आईः एम ए आहे होम सायन्स.*

*वडीलः टॉप लिस्ट!*

*आईः हे तर काहीच नाही. स्वयपाकाची प्रचंड आवड! सगळं घरी करते.*

*वडीलः टॉप क्लास!*

*आईः हेसुध्दा काहीच नाही. रांगोळया काढते मोठमोठया.*

*वडीलः टॉप डिझायन!*

*अंतरा आरतीला ढोपरं मारते.*

*मावशीः व्वा! मी म्हणलं नव्हतं, महीन्याभरात गजाननाला शारदा घेऊन येईन!*

*बत्तीसः हाय शारदा!*

*पर्णरेखाः (हसून) माझं नाव पर्णरेखा आहे.*

*बत्तीसः शारदा चांगलं आहे की?*

*मावशीः लग्नानंतर जान्हवी ठेऊ आपण.*

(आई हो म्हणते. अंतरा आणि आरती वळून हसायला लागतात. गजानन तिच्याकडे पहातो. ती डोळयानीच नकार देते. तो हलका हसतो. ती बत्तीसकडे पहाते. तो आरतीकडे पहातोय.)

*पर्णरेखाः तुम्ही काय करता?*

*एकदम गजानन आणि बत्तीसः टीचर, स्टुडंट!*

(पर्णरेखा हसते.)

*बत्तीसः चहा वगैरे आहे काही आहे का नाही?*

चहा दिला जातो.

*बत्तीसः (पिऊन अनाहूतपणे) टॉप टेस्ट!*

पर्णरेखाच्या वडलांकडे पहातो. गजाननला ठसका लागतो. बत्तीस डोळा मारतो.

*मावशीः जा, तुम्ही जरा आत जा, प्रायवेट मध्ये बोला.*

*गजाननः नाही ठीके.*

*पर्णरेखाः चल ना.*

*गजाननः ओके.*

दोघं चहा ठेऊन आत जातात. तशा आरती आणि अंतरा सुध्दा गायब होतात. दार लावलं जातं. बत्तीस आत डोकावून पहातो. मोठयासारखा वागत.

*बत्तीसः वातावरणात एक ऑकवर्डनेस येणं स्वाभाविक आहे.*

*आई दचकून पहाते.*

*बत्तीसः पण काही काळजी करु नका. सर काही आत जाऊन वावगं करणाऱ्यातले नाहीयेत.*

तिचे आई वडील त्याच्याकडे खाऊ का गिळू नजरेनी पहातात. तो त्यांच्याकडे घाबरुन पहातो.

धाडकन त्याला बाहेर टाकलेलं दिसतं.

## 29A. Int/Day/Maushi Home

गजानन तिच्याकडे पहात रहातो. ती आधी शोकेस मधल्या गणपतीला नमस्कार करते. मग त्याच्या बेडपाशी येते. बसायच्या आधी टी शर्ट पडलाय तो घेते. त्याचा साईज पहाते आणि त्याची घडी घालते. अचानक पैलवानाचा हुंकारांचा आवाज ऐकू यायला लागतो. ती बावरते. तो जाऊन खिडकी बंद करतो.

*गजाननः पूण्यभूषण खामकर नावाचा बॉडी बिल्डर आहे. तो कुंथत असतो रोज. त्याला इथली आजूबाजूचे सगळे स्टोन कोल्ड म्हणतात. त्याने गाडीवर पण लिहीलंय.*

पर्णरेखा हसते.

*पर्णरेखाः मला अशा राकट गोष्टी नाही आवडत. मला नाजूक गोष्टी आवडतात. ही वेलबुटटी किती सुंदर आहे. बघू?*

गजानन तो कपडा देतो. ती हाताने त्याला स्पर्श करते. त्याचा उबदारपणा अनुभवते.

*पर्णरेखाः किती सुंदर आणि मनापासनं विणलंय ना कुणीतरी. लग्नाचंही असचं आहे नाही? नवरा आणि बायको या दोन सुयांनी विश्वासाच्या दोऱ्यानी मन लावून, वेळ देऊन, न चुकता प्रेम हळूहळू विणायला लागतात. तेव्हाचं इतकं सुंदर विलक्षण काहीतरी तयार होतं. हो ना? बसना इथे!*

गजानन भारावून तिच्याकडे पहातोय.

30. Ext/Evening/Murlidhar Tea Stall- Maushi Home Outside

एक माणूस दुकानात चहा बनवताना दिसतो.

*बत्तीसः एक चहा दया.*

तो कप घेतो.

*बत्तीसः (कप पुढे करत) नाही कप आहे माझ्याकडे!*

त्याच कपात चहा ओतला जातो. बत्तीसला फोन येतो. त्यावर बॅकबेंचर असं लिहीलंय.

*बत्तीसः बोला सर. काय गेली ना मोगरा फुलला?*

*गजाननः हं चाललेत!*

*बत्तीसः रात्री फोन करुन नकार आला घाबरु नका. रडू नका. अजून खूप शिकायचंय आपल्याला. लोकांना वाटतं मटण ही पचवायला सगळयात अवघड डिश आहे, पण ती नकार आहे सर. नकार.*

गजानन हसताना दिसतो.

*गजाननः हो म्हणाली ती.*

*बत्तीसः आँ?*

*गजाननः हो म्हणाली!*

*(सायलेन्स जातो.)*

*गजाननः बत्तीस? ऐ बत्तीस?*

*बत्तीसः दोन मिनिटं स्वतःलाच श्रध्दांजली वाहीली. एवढयात हो म्हणाली? काय केलंत काय आत जाऊन?*

*गजाननः अगदीच दहा मिनिटं बोललो पण असं पवित्र वाटलं. तिने बाहेर येऊन लगेच मावशीला सांगितलं. मी आवडलो रे कुणालातरी!!*

*बत्तीसः अवघड आहे.*

*गजाननः म्हणजे?*

*बत्तीसः एकदा नीट बघा हां. तुम्ही एवढयात आवडलाय.*

*गजाननः म्हणजे तुला असं म्हणायचंय की मी कोणालाही आवडू शकत नाही? मी आवडलो तिला. मलाही आवडली ती. लव्ह अॅट फर्स्ट साईट झालं आता! आता तीन आठवडयात साखरपुडा आणि दोन महिन्यात वाईत लग्न. तुला यायचंय हां.*

*बत्तीसः परकं आणि पोरकं केलंत तुम्ही मला. हरकत नाही. विश यू अ वेरी हॅप्पी प्री मॅरीड अॅण्ड मॅरीड लाईफ, उदयापासनं मी नाही!*

*गजाननः थँक यू बत्तीस. तुझ्यामुळे मला मुलींबददल एवढं कळलं. ते सगळं वापरीन मी.*

*बत्तीसः सर, हनिमूनला गोव्या बिव्याला जा, नायतर हडप्पा मोहंजोदडोला जाल उकरायला.*

गजानन हसतो. बत्तीस स्प्लीट स्क्रीनमधून बाहेर जातो. तो खाली पहातो. पर्णरेखा आणि तिचे आई वडील उतरतायत. पर्णरेखा वळून पहाते. त्याला छानपैकी हात करते. तो खूश होऊन हसतो. ती स्प्लीट स्क्रीनमध्ये एन्टर होते.

एका पोथीचं पान येतं आणि त्यावर लिहीलंय प्रकरण तिसरे मौजेचे कुलूप आणि निरामय जीवनाची गुरुकिल्ली!

31. Ext/Evening/Restaurant

प्रभूराम आणि सीता यांच पेटींग दिसतं. त्याच्या समोरच पर्णरेखा आणि गजानन बसलेले आहेत. एक वेटर चालत चालत त्यांच्या जवळ येतो. गजानन त्याच्याकडे पहातो.

*पर्णरेखाः तर, एक स्वतंत्र्य व्यक्ती म्हणून,मला अस वाटतं की आपण एकमेकांबददलच्या अपेक्षा सांगाव्यात. म्हणजे माझी अपेक्षा आहे की माझ्या नवऱ्यान फिट आणि हेल्दी असावं. चूक आहे काही?*

*गजाननः आजिबात नाही. (वेटरला) एकवडा सांबार, चार पाव, आणि त्या तळलेल्या मिरच्या प्लीज.*

*पर्णरेखाः (हसून) मी हेल्दी म्हणाले ना आत्ताच. पावात मैदा आणि बटाटा वातूळ! सांबारात आदल्या दिवशीचे पाव आणि लोणच्याचं तेल घालतात अरे.*

वेटर चिडून पहातो.

*गजाननः इडली सांबार!*

*पर्णरेखाः सांबार हवाच आहे का?*

*गजाननः सँडविच? सँडविच!*

*पर्णरेखाः नो चीज, नो बटर, आणि नो पोटॅटो.*

*वेटरः ब्रेड चालेल?*

पर्णरेखा त्याच्याकडे रागाने पहाते. तो निघून जाते.

*पर्णरेखाः खाऊन बघ. इतकं हलकं वाटेल ना!*

*गजाननः तुला?*

*पर्णरेखाः उपास असतो आज. (थांबून) मी तुला गजा म्हणू? म्हणते. आपणही जरा फॉवर्ड असलंच पाहीजे नाही का? गजा तुला मित्रमंडळ कुठाय माहीतेय.*

*गजाननः (सहजपणे) हो.*

*पर्णरेखाः उदयापासनं तिकडे जिमला जाऊयात आपण. कपल डिस्काऊंट आहे. आणि शरीराचा व्यायाम झाल की लगेच मनाचा व्यायाम. शरीराचा घाम आणि मनाचा मळ रोजच्या रोज निघाला पाहीजे अस बाबा म्हणतात. (थांबून) अरे तुला सांगायचंच राहीलं, मला दोन बाबा आहेत.*

*गजाननः काय?*

*पर्णरेखाः (हसते.) एक माझे बाबा आणि दुसरे ठोंबे बाबा. मुलगी मानतात मला. त्यांच्या मठात जायचं आपण सोमवार, गुरुवार, शनिवार, चतुर्थी आणि एकादशी. विलक्षण अनुभूती आहे तिथे. निरामय वातावरण.*

गजानन घाबरलाय.

*पर्णरेखाः अरे तुला दयायचंच राहीला. (म्हणून पुडीतून अंगारा काढते. बोटाला लावते.) वाक!*

गजानन डोकंपुढे करुन वाकतो. ती अंगारा लावते. तो नमस्कार करायला वाकतो. ती हसून पाठीवर मारते.

*पर्णरेखाः कर कर! मला नमस्कार केलास म्हणजे बाबांना पोचला!*

तो आणखी घाबरलाय. सँडविच येतं.

*पर्णरेखाः (प्रचंड खूश होऊन) गजा, भक्तीचा अंगारा एकदा कपाळावर लागला ना की माणसाचं प्राक्तन अगदी निरामय होऊन जातं!*

गजानन एक घास खातो. त्याला शिटटीचा आवाज ऐकू येतो.

## 32. Int/Night/Boxing Ring

मावशी शिटटी मारतेय. तो पुणेरी पगडी आणि धोतरात बॉक्सींग रिंगमध्ये उभा आहे. समोर पर्णरेखा नऊवारी नथ वगैरे घालून ग्लोव्हज घालून उभी. दोघं एकमेकांना मारायच्या तयारीत. मावशीनी शिटटया मारल्या मारल्या एकामेकांना मारायला लागतात.

*पर्णरेखाः (एक ठोसा मारत) तू निरामय तुझा बाप निरामय!*

*गजाननः (वाचत) तुमचं पूर्ण खानदान सुसंस्कृत आहे!*

*पर्णरेखाः (पुन्हा मारत) असल्या पवित्र घरात रहाण्यापेक्षा मी मौज केली असती.*

*वडीलः (ओरडत) टॉप शॉट!*

*आईः हे तर काहीच नाही. आता खरा पंच!*

*पर्णरेखाः (दोन चार ठोसे लावत) आख्ख्या पुण्यात बोलतात तुम्ही किती सुसंस्कृत आहात ते!* उदयापासन मौज नाही केलीस तर बंबात घालीन आणि निरामय धूर काढीन!

(शेवटचा पंच मारते. गजानन आडवा पडतो. मावशी पर्णरेखाचा हात वर करते. ती गजानन कडे पहाते. गजानन झोपलेला दिसतो. जुन्या काळचं एखादं गाणं सुरु होतं. लपवलास तू हिरवा चाफा...)

PBS3A. Int/ Day/ Maushi Home

गजाननच्या मोबाईलवर बत्तीसच्या वर पर्णरेखा अॅड झालेली दिसते. तिचा स्टेटस आहे. फिलींग निरामय! लिव्हींग निरामय! गजानन त्याकडे बघत रहातो.

PBS3B. Ext/ Day/ Road

गजानन गाडीवर बसतो. पर्णरेखा मागे बसते. ती एका बाजूला बसते. मध्ये पर्स ठेवते आणि मागे धरते.

*पर्णरेखाः थोडा पुढे सरकतोस?*

PBS3C. Int/ Evening/ Math

ठोंबे बाबा दिसतात. गजानन नं त्यांच्यासमोर मान झुकवलीये. पर्णरेखा मागे भक्तीभावाने उभी आहे. बाबा लाथ उगारतात आणि त्याला शक्तीपात दिक्षा देतात. तो कोलमडतो. पर्णरेखा खूश होऊन बाबांना नमस्कार करते.

PBS3D. Int/ Morning/ Gym

आरशासमोर तीन बॉडीबिल्डर दिसतात. चौथा गजानन दिसतो. पोट वाढलेला बेढब. मागे पहातो. पर्णरेखा तिरकी ओढणी लावून ट्रेडमिलवर चारच्या स्पीडने चालतेय.

PBS3E. Int-Ext/ Day/College

गजानन वर्गात शिकवतोय. एक मुलगा हेल्मेट घालून जातो. गजानन वळून पहातो. वेगळाच मुलगा आहे.

PBS3F. Ext/ Evening/Math

मठाबाहेर मोठठी रांगोळी काढली जाते. गजानन तिच्याकडे वाकून पहातो. खूश होतो. ती लगेच ओढणी सरळ करते.

*पर्णरेखाः कंट्रोल हां गजा! धर तू पण काढ!*

गजानन च्या हातात रांगोळी दिसते आता दोघं मिळून काढताना दिसतात.

PBS3G. Int-Ext/ Day/College

गजानन कँटीनमध्ये एकटाच बसलेला आहे. मुली बास्केटबॉल घेऊन जाताना दिसतात तो पहात रहातो.

PBS3H. Ext/ Evening/ Restaurent

एक प्लेट येते त्यात रताळी दिसतात आणि दुसऱ्या प्लेटमध्ये दाण्याचे लाडू. ती गजानन ला अंगारा लावते. तो पुन्हा वाकून नमस्कार करतो.

PBS3I. Int-Ext/ Day/College

एका इंग्लीश पिक्चरमध्ये सेक्स सीन सुरु होतो. पर्णरेखा त्याच्याकडे चिडून पहाते. टीव्हीच्या समोरच ठोंबे बाबांचा फोटो आहे, ते बघतायत असं ती खुणेनंच सांगते. गजानन सॉरी म्हणतो आणि चॅनल बदलतो.

PBS3J. Int-Ext/ Day/College

वेगळया कपडयात गजानन लेडिज टॉयलेटच्या समोर उभा आहे. दोन मुली येतात. तो पाहून नाराज होतो.

PBS3K. Int/ Home/ Day

पर्णरेखाने व्हॉईस नोटस पाठवल्यात. गजानन उघडतो. घंटा वाजल्याचा आवाज येतो.

*पर्णरेखाः गजा,जीवन हा समुद्र आहे तू त्यातला शिंपला, प्रेमरुपी मोत्यांनी संसार हा गुंफला!*

*आज ठोंबे बाबांचा प्रकट दिन, त्यांचा फोटो वॉलपेपर म्हणून ठेव.*

*गजाननः (चिडून बटण दाबून ठेवतो.) हाड!!!!! (लगेच डिलीट करतो.) हो, अगदी मौजच!!*

PBS3L. Various Shops

ती एका दुकानात शोकेस कडे बोट दाखवते. गजाननच्या डोळयांवर चष्मा चढवला जातो.
ती पुन्हा बोट दाखवते. शर्ट निवडते. गजाननचा शर्ट बदलला जातो.
ती पुन्हा बोट दाखवते. बनियान निवडते. गजानन तिच्याकडे हतबल होऊन पहातो. ती लाजते.
ती पुन्हा बोट दाखवते. रिंग निवडली जाते.

PBS3M. Ext/ Day/ Road

गजानन आणि पर्णरेखा रस्त्यावरुन चाललेत. तो समोर पहातो. अखिल भारतीय पैलवान मेळावा. शुभेच्छुक शामसुंदर पारिजातक. गजानन हसायला लागतो. पर्णरेखा विचारते. तो काहीच बोलत नाही.

PBS3N. Ext/ Day/ Road

अंतरा आणि आरती क्लास खालून येतात. पर्णरेखा आणि गजानन गाडीवरुन जाताना दिसतात, त्या थांबतात. पर्णरेखाने गाडीला मागे दोन छोटी चाकं लावली आहेत. दोघीही हसायला लागतात.

*अंतराः यो!!*

PBS3O. Int/ Day/ Parnrekha Home

एंगेजमेंटची रिंग घातली जाते. सगळे टाळया वाजवतात. कॅमेरा पुल बॅक होतो तसं दिसतं की सिरीयलमध्ये साखरपुडा सुरु आहे. गजानन ठोंबे बाबांच्या फोटोकडे पहातो ते पहातायत का? आणि चॅनल बंद करतो. गाणं संपत!

33. Ext/Night/Road

रस्त्यावर शांतपणे दोघं चालतायत. मध्येच एकमेकांकडे पाहून हसतात.

*पर्णरेखाः ऐ तुला बा भ माहीतेयत?*

*गजाननः हो.*

*पर्णरेखाः आणि ना. घ?*

*गजाननः हो.*

*पर्णरेखाः आणि बी?*

*गजाननः तुला वाय झेड माहीतेय का गं? खूप मोठे इंग्लीश फिलॉसॉफर आहेत. एस पी. त्यांनी काढलेली फिलॉसॉफी आहे.*

*पर्णरेखाः काहीतरी उगाच बोलू नकोस.*

*गजाननः नाही गं. (खांदयावर हात टाकायला जातो. ती एकदम दचकून ओरडते.)*

*पर्णरेखाः बाबा!! (थांबते.) किडा?*

*गजाननः माझाच आहे. हात माझाच आहे. तुझ्या कानातले किती छान आहेत.*

(दोन्ही हात तिच्या जवळ नेतो. ती समोर उभी रहाते. गजानन डोळे बंद करतो. ओठ तिच्या जवळ नेणार एवढयात तिचा हात मध्ये येतो.)

*पर्णरेखाः किती अधीरता, किती धांदरटपणा! आत्ता नको. साडे अकरा वाजलेत.*

*गजाननः बरं मग गालावर?*

*पर्णरेखाः आपण कुठे आहोत याचं काही भान? हल्ली प्रत्येक चौकात सीसीटीव्ही असतो. उदया आपली क्लीप निघून वायरल झाली तर कुठे तोंड दाखवणार आपण? (थांबून) बर, हातावर कर. (हात पुढे करते. त्यावर बाबांचा गंडा दिसतो.)*

*गजाननः (चिडून) तुला का त्यांना?*

*पर्णरेखाः स्वारींचा मूड आज भलताच दिसतोय. उदया संध्याकाळी वेळ काढून ये, होशील शांत! उदयापासून सात आठ दिवस गम्मत आहे.*

*गजाननः (उत्साहाने) का गं ? का?*

*पर्णरेखाः उपासना सप्ताह आहे ना! आपोआप शांत होशील, टोटल कंट्रोल ऑन डिझायर्स! आणि अजून एक आनंदाची बातमी आहे, वाईला बाबा स्वतः येतायत लग्नाला! स्वतः! आता बोल!*

ऑपेराचं म्युझिक वाजायला लागतं.

34. Int/ Night/ Jail

उलटं स्वस्तिक फिरतंय. त्या पुढे गळा कापायचं मशीन. शेजारी ठोंबे बाबा उभे. समोर पर्णरेखा हिटलरच्या वेशात. गजानन छळछावणीत असल्यासारखा उभा आहे.

*पर्णरेखाः इश्त एक्सेक्यूता गजानना!*

*बाबाः हॅय मौजा!*

त्याला धरतात, त्याची मान खाली घातली जाते. वरुन धाडकन ते पडतं. पर्णरेखा हसते.

पर्णरेखाः निरामया डेथा!

34. Ext/ Night/ under construction Building

गजानन दचकून वर पहातो. तो अंडर कन्स्ट्रक्शन बिल्डींगच्या खाली आलाय. घाबरुन चालत चालत वर येतो. त्यावरच त्याचा व्हॉईस ओव्हर येतो.

*गजाननः माझ्या सॅटलाईटला ठोंबे बाबा नावाची कक्षा मिळालीये. सुयांमध्ये विश्वासाचा दोरा ओवून निरामय स्वेटर घालणार हे मला. खूप टेंशन आलंय. नात्याचा रंग उतरत चाललाय. सेंचुरी मारेल म्हणून क्रीजवर आलेला बॅटसमन चाळीसवर रनआऊट होतो ना तशी अवस्था झालीये. का मी फार विचार करतोय. यालाच लग्न म्हणतात का? नंतर सगळं नीट होत का? का अॅडजस्टच करावं लागतं? काय करु मी? नाही म्हणू? पण हिला नाही म्हणालो तर कोण मिळणार आपल्याला?*

34A. Ext/ Night/ under construction Building

दोघं पायरीवर बसलेले दिसतात.

*गजाननः म्हणून पॅनिक होऊन तुला एकावर एक मेसेज केले गेल्या एक तासात. रहावलंच नाही रे. आपण कोणालातरी आवडलो या आनंदात इतका वेडा झालो की आपल्यासारख्याच एकीला आपण आवडलो हे ही कळलं नाही.*

*बत्तीसः मी तर तेव्हाच म्हणणार होतो की ती लेडी गजानन आहे.*

गजानन रागाने पहातो.

*बत्तीसः डोळे देऊ नका. खरंच.*

*गजाननः चांगली आहे रे मुलगी. बोअर आहे. खूप जास्त बोअर. आत्ता असं वाटतंय, लग्न झालं तर पुढे काय होईल? (थांबतो.) बत्तीस, मला काय वाटत होतं माहीतेय? तेहतीस वर्षात कळायला लागल्यापासून मला एकदाही एकाही मुलीनी प्रेमानी हात सुध्दा लावला नाही. कधी कोणी पाठीवर थाप मारली नाही, कधी खांदयाला धरलं नाही, पोटात गुददा घातला नाही, साधी टिचकी, चिमटा, सुध्दा नाही. बाकी सोड प्रेमाने बघितलं सुध्दा नाही. म्हणून मग वाटलं होतं, आपल्याबरोबरही मुलगी असावी. तिनं खांदयावर हनवटी टेकून गाडीवर बसावं, हातावर डोकं ठेऊन झोपून जावं, कितीही दमलेली असली तरी आपल्याला पाहून तिला हसू यावं, आपली गाडी असावी ज्यातनं लाँग ड्राईव्हला जावं, घर असावं ज्यात मोकळेपणानं रहावं. हे सगळं कसं करु तिच्याबरोबर!? तू एकदा म्हणला होतास आयुष्य ही जर मॅच धरली तर त्यातले हायलाईटस कुठले आहेत? ते शोधा. मला तर आत्तापर्यंत दोनच हायलाईटस दिसतात मला. एक तू आणि एक सायली. कारण तुमच्याबरोबरचे दिवस, नेहमी या तेहतीस वर्षातल्या सगळया दिवसांना पुरुन उरतात.*

(बत्तीस त्याच्याकडे पहात राहीलाय.)

*मला या पुढेही असंच जगावंस वाटतंय. मला मनापासून कुणीतरी आवडलं पाहीजे. आणि मीही कोणाला तरी. मला कॉम्प्रमाईज म्हणून आयुष्य नाही जगायचं!*

*बत्तीसः नका लोड घेऊ!*

*गजाननः (शांतपणे त्याच्याकडे पहात) नाही रे, तुला माझा वयाचा झालास की कळेल, सिंगल आणि वर्जिन या दोन शिव्या इतक्या वेळा इतक्या प्रकारानी ऐकल्यात ना, की आता वाटत आपण असेच रहाणार!*

*बत्तीसः नाही रहाणार.*

*गजाननः मग काय करु?*

*बत्तीसः तेच जे आधी करायचं होतं!*

*गजाननः काय?*

*बत्तीसः  हवा पाहीली होती, खवा खाल्ला होता, आता एकच गोष्ट करायची, धुव्वा!*

*वेलकम बॅक!*

गजानन आणि बत्तीस एकमेकांना कडकडून मिठी मारतात. संगीत वाढत जातं. अंडर कन्स्ट्रक्शन बिल्डींगच्या चौथ्या मजल्यावर एकमेकांना कडकडून मिठी मारलेले गजानन आणि बत्तीस दिसत रहातात. आणि मध्यांतर अशी अक्षरं उमटतात.

**मध्यांतर**

35.Ext-Int/ Various shot/ Day

पर्णरेखा आरशासमोर आनंदाने उभी आहे. फेसवॉश लावते.

गजाननन आरशासमोर चिडून उभा आहे. फोम लावतो.

पर्णरेखा साडीच्या नीऱ्या नीट करते.

गजानन बत्तीसने दिलेले लहानपणीचे बूट घालतो.

पर्णरेखा एका डब्यात लाडू भरते. झाकण लावते. त्यावर वेलबुटटीचा कपडा टाकते.

गजानन मेसेज टाईप करतो. १५ मिनिटात येतो.

पर्णरेखा गाडी काढून निघते.

36. Ext/ Restaurent/ Evening

सँडविच ठेवलं जातं. वेटर ठेवतो आणि गजाननकडे दचकून पहातो.

*वेटरः काय सर मिशी उडवली?*

*गजाननः तुला विचारायला हवं होतं का? घेऊन जा हे. आणि एक वडा सांबार दोन पाव आण.*

समोरुन पर्णरेखा चालत येते. गजाननच्या शेजारुन जायला लागते. गजानन थांबवतो. ती चमकून पहाते. हसायला लागते. थक्क होऊन बसते. मुलाला बसवते.

*पर्णरेखाः गजा. मोती साबणासारखा दिसतोयस. (थक्क होऊन पहात रहाते.) माझा विश्वासच बसत नाहीये तुला मिशीशिवाय बघताना.* पण *यापुढे लक्षात ठेव, शनिवारी केस काढू नये.*

*गजाननः तुझ्याशी जरा बोलायचंय!*

*पर्णरेखाः हो आधी माझं ऐक! एकवीस ला छान दिवस आहे, आजच मावशींशी बोलणं झालं. तेव्हा साखरपुडा करायचं म्हणतायत आणि पुढच्या महिन्यात चौदाला लग्नाचा मुहूर्त. (थांबून) मग तीन दिवस देवाला आणि मग हंहं. मी खूप खूश आहे गजा. बरं खाऊन आपल्याला खूप कामं आहेत हां.*

*गजाननः मला तुझ्याशी महत्वाचं बोलायचंय. बोलू ?(थांबून) मला, मला चोवीस तास निरामय नाही जगता येणार.*

*पर्णरेखाः साधना आहे ती. एकदम नाहीच येत. हे घे लाडू!*

*गजाननः मला मौजेचा संसार आयुष्यभर करता येईल की नाही माहीत नाही.*

*पर्णरेखाः करु, मी करीन. वेलबुटटी आहे ती!*

*गजाननः (दोन्ही बाजूला ठेवत) तुला कळत नाहीये.*

*पर्णरेखाः लाडू खा बरं आधी! (झाकण उघडायला जाते.)*

*गजाननः (ओरडत) थांब! मला नाही करायचं हे लग्न कारण तू खूप बोअर आहेस. खरंच खूप बोअर आहेस.*

(मोठी शांतता जाते.)

*गजाननः बघ जरा स्वतः कडे, म्हणजे कळेल तुला! काय वाटली होतीस आणि काय आहेस? इतके सुंदर डोळे आहेत पण सतत मिटलेले असतात, नाजूक हात आहेत पण ते सतत जोडलेले असतात, इतके सुंदर केस आहेत, ते वेणीमध्ये शिस्तीत बांधून ठेवतेस. चेहरा तर आपल्यावर देशाची अध्यात्मिक उन्नती अवलंबून आहे असा करतेस. आणि कपडे...*

*पर्णरेखाः (चिडून रडवेली होत.) बास हां! बास!*

*गजाननः बोलू दे मला. मला आधी वाटायचं या जगातला सगळयात बोअरिंग माणूस मी आहे. प्लीज हा त्रास देणं थांबव. इतरांनाही आणि स्वतःलाही. तुझ्या हातावर जो गंडा आहे तो चालवून घेतला मी, पण तुझ्या मनावर जो गंडा आहे ना, तो याच काय सात जन्मात कोणालाही काढता येणार नाही. मला तो काढायचा नाही मी नाही करणार हे लग्न. माझा डिसीजन फायनल आहे.*

(पर्णरेखा रडायला लागलीये. गजाननही धीर एकवटतोय. ती उठते. सगळया गोष्टी गोळा करते.)

*गजाननः सॉरी आणि घरच्यांनाही सांग.*

(पर्णरेखा रडत रडत निघून जाते. गजानन मान खाली घालून बसतो. मागच्या टेबलवरुन शांतपणे बत्तीस येऊन बसतो. त्याने मिशी वाढवलीये. पर्णरेखा लांबून त्या दोघांकडे पहाते. निघून जाते.)

*गजाननः (दीर्घ श्वास घेत) हलकं वाटतंय, पण खूप जास्त बोललो का मी?*

36A. Ext/ Road/ Evening

दोघं गाडीवरुन जाताना दिसतात.

*बत्तीसः महत्वाचं काये? तुमचं आयुष्य वाचवणं का तिचं मन सांभाळणं? पहिल्यांदा मनात जे आहे ते बोललात ना, बास!!*

गजानन ऑकवर्डसा हसतो. गाडी जाताना दिसते. त्याच्या खांदयावर हात ठेवतो.

*गजाननः विदयेचं माहेरघर माझं सासर व्हायच्या आत मी हे बोललो बरं झालं. सुटलो बाबा!*

37. Int/ Wai home/ Day

गजाननची आई फोनवर ऐकते. तोंडाला पदर लावते.

37A. Int/ Wai home/ Day

गजाननचे वडील पुन्हा एकदा बीपीच्या गोळया घेतात.

37B. Ext/ Wai station/ Day

एस टी निघते.

38. Int/ Maushi Home/ Day

मावशी आणि आई शेजारी शेजारी पदर लावून बसलेल्या. आरती आणि अंतरा थांबल्यात. वडील बसलेले. पर्णरेखा समोर उभी. बत्तीस आणि गजानन कोपऱ्यात उभे आहेत.

*आईः अबब,माफी माग तिची.*

*अंतराः चल, मी जाते.*

(आरतीला बाय करुन तिथून जाते.)

*आईः आठ वर्षं झाली गं मी काही बोलले नाही. तिथं सुधरला नाही, म्हणलं इथं तरी सुधरेल. नाहीच. ही मुलगी नको, ती मुलगी नको. अरे हिचा फोटो पाठवला मावशीनी, माझा विश्वासच बसला नाही ही मुलगी तुला दाखवलीये. आश्चर्य वाटलं याला कसं पसंत केलं या शुंभाला इतक्या चांगल्या मुलीनी.*

पर्णरेखा रुमालाने नाक पुसतेय. गजानन शॉक्ड होऊन पहातो.

*आईः हो खरंच, तुझी लायकीच नाहीये अरे. मुली काय रस्त्यावर पडल्या नाहीयेत, आणि त्यांना  असं बोलण्याचा तुला अजिबात अधिकार नाही. शहरात राहून तुझ्यापेक्षा जास्त कमवते. सगळयांना सांभाळते, देवाधर्माचं करते, आणि तू वाईतल्या दोनमजली कॉलेजचा इतिहासाचा तात्पुरता शिक्षक. तुझ्याशी लग्न करुन उपकारच करत होती. पण तुला तेही नकोय. भोग कर्माची फळं! आम्हाला काय वंश चालवायचाय म्हणून मागे नाही लागलो. हे वय असं आहे की सोबत लागते. माणूस लागतो. थोडं अॅडजस्ट करावं लागतं. मुंबईत बालपण गेलं आमचं, आम्ही आलो की नाही छोटया शहरात. त्याला नाकं नाही मुरडली. आणि तुला थोडंस खटकलं तर लगेच फाडफाड बोलतोस? अरे आत्तासुध्दा एखादया मुलीनी घरच्यांना बोलवून तुला धारेवर धरलं असतं, तिनं सांगितलंही नाहीये अजून. समंजस आहे कारण ती. (थांबून) आणि तुला एवढी जगावेगळी अक्कल आलीयेना, बघ मग आता तुझं तू. काय वाटटेल ते कर. परत थोबाड दाखवू नकोस.*

गजाननचे डोळे भरलेत तो ताडकन उठतो आणि बाहेर निघून जातो. बत्तीसही त्याच्या मागोमाग जातो. आता तीन बायका घरात बसल्यात.आई आणि मावशी पर्णरेखा जवळ येतात.

*आईः काही घाबरु नका. सहावेळा घर सोडून गेलाय. वाईच्या काठावर बसून आलाय परत. आत्ताही येईल. आणि हो म्हणेल. नाही म्हणायची हिम्मतच नाही त्याच्यात.*

38A. Ext/ Building/ Evening

गजानन आणि बत्तीस खाली उतरतात.

*गजाननः चल इथनं बाहेर चल आधी. कसा आलायस तू?*

*बत्तीसः रिक्षानी! थांबा तुम्ही मी आलो घेऊन...*

38B. Ext/ Road/ Evening

बत्तीस रिक्षा चालवताना दिसतो. गजानन मागे हताश होऊन बसलाय. आरशाला मोरपीसं लावलेली. आतमध्ये टेपवर कर्मण्ये वाधिकारस्ते चालू आहे.

*गजाननः रिक्षानी म्हणजे रिक्षा चालवत आलायस तू?*

*बत्तीसः फ्रेंडची आहे. डाऊन झाला. म्हणलं मी मीटर डाऊन करतो.*

*गजाननः काय करु रे? मी हो म्हणून टाकतो तिला. जाऊ दे.*

*बत्तीसः ती कोण तुमची दासी आहे का? आज हो उदया नाही, परवा हो. गप्प बसा.*

*गजाननः मला खरंच भिती वाटतेय. आई बाबा, मावशी ती सगळी आपली माणसं आहेत. आपल्या चांगल्यासाठीच बोलतायत. त्यांच्या विरुध्द जायचं म्हणजे. तू वळव.*

*बत्तीसः (रिक्षा थांबवतो.) ते आपले शत्रू नाहीत, ते वाईटासाठी सांगत नाहीत पण शेवटी माणूस एकटा असतो आणि त्याचा डिसीजन हा त्याचा एकटयाचा असतो. त्यांना त्रास होईल, वाईट वाटेल, शिव्या घालतील, लांब जातील, पण डिसीजनची जबाबदारी घ्याल. मला एकच सांगा, तुम्ही आत्ता लहान असतात तर काय केलं असतं?*

*गजाननः (डोळे मिटतो. विचार करतो.) नसतं केलं लग्न.*

बत्तीस त्याच्याकडे पाहून हसतो. गजानन रडवेला झालाय. त्याच्या खांदयावर हात ठेवतो.

38C. Ext/ Bridge/ Evening

बत्तीस आणि गजानन एका पुलाच्या कडेला रिक्षा लावून उभे आहेत. गजाननने कठडयाला डोकं टेकलंय.

*गजाननः च्यायला हे सगळं कधीपर्यंत चालणारे कुणास ठाऊक? जास्तीत जास्त बारीक दिसेल असा फोटो काढा, अर्धवट माहीती लिहा, उभे रहा नंबर लावून, कोणी तरी उचलेपर्यंत. काय काय केलंय अरे मी पण सुरुवातीला मुलींनी हो म्हणावं म्हणून!*

*बत्तीसः हाच तर प्रॉब्लेम आहे. दुसऱ्यानं सुंदर म्हणावं म्हणून चांगलं रहातो आपण, दुसऱ्यानं हुशार म्हणावं म्हणून अभ्यास करतो, दुसऱ्याला आवडाव म्हणून स्वतःच्या नावडीच्या किती गोष्टी करतो आपण. मी तुम्हाला नेहमी विचारतो लहान असतात तर काय केलं असतं? काये ना, आपल्या प्रत्येकात आपलं लहान जुनं, खरं व्हर्जन असतं. आपल्याला पायजे तसं जगणारं. मग जशी जशी आपल्याला शिंग फुटतात ना आपण इतरांचं ऐकायला लागतो आणि त्याला गप बसवतो. तो सांगत असतो आतनं आपण ऐकत नाही. ते हर्ट होतं, लांब जायला लागतं. लोकांची पर्वा न करता त्याला काय वाटेल असा विचार करणारे आपण त्याची पर्वा न करता लोकांना काय वाटेल याचा विचार करतो, तेव्हा ते कायमचं जात. बरं आपण माणसांच्या गर्दीत. ते आपल्याला काहीही पटवतात. नेहमी लक्षात ठेवा सर, गर्दीला आय क्यू नसतो.  त्यांना गोरा म्हणजे सौंदर्य वाटतं आणि काळा म्हणजे कुरुप. स्लीम असण फॅशन वाटते आणि टुणटुणीत असणं आजार, सायकल चालवणारा बोरिंग वाटतो आणि रेसिंग बाईक   रस्त्यावर उडवणारा हिरो. या सगळया डेफिनिशन आपल्या डोक्यावर हाणत असते ही गर्दी. आपल्याला यातलं वाटत नसतं तरी आपण ऐकतो आणि मान्य करतो, याला तोडलं पाहीजे. आपल्याला जे वाटेल ते केलं पाहीजे. त्या जुन्या खऱ्या वर्जनला जोरात हाक मारली पाहीजे. त्याच्याशी बोललं पाहीजे! त्याच्याबरोबर पाय बुडवून बसलं पाहीजे. तो म्हणेल तेच केलं पाहीजे. तुम्हीही तेच करा. त्याला आवडेल असे झालात की थांबा पण तो पर्यंत सुटा सर, दुसऱ्यांसाठी नाही स्वतःसाठी सुटा!*

गजानन त्याच्याकडे भारावून पहातो. शेजारुन एक माणूस मोरपीसाचा आख्खा जथ्था घेऊन जातो.

38D. Ext/ Bridge/ Evening

रिक्षाचं टप गेलेलं दिसतं. गजानन अर्जुनाच्या वेशात आहे आणि बत्तीस कृष्णाच्या. मागे यदा यदाही धर्मस्य चालू आहे. आणि गजानन डोळयात पाणी आणून भक्तीभावाने त्याच्याकडे पहातो आहे.

39. Ext/ Morning/ Tekdi

गजानन एकटा पळतोय. पळता पळता थांबतो. त्याच्या कपाळावर जमलेला घाम टपाटप पडतोय.

40. Int/ Maushi Home/ Day

तो पर्णरेखाला फोन करतो.

*गजाननः माझा निर्णय तोच आहे. तुला ऑल द बेस्ट. प्लीज एकमेकांबददल राग आणि गैरसमज नको.*

41. Int/Classroom/ Day

वर्गात फळयावर लिहीलं जातं. 'चवदार तळयाचा सत्याग्रह!'

गजानन वळतो. मुलांकडे पहातो.

*गजाननः ए नीरज, झालं की मला पण दे काय खेळायला एकदा.*

मुलं एकदम चमकतात. गजानन वळतो.

42. Int/ Maushi Home/ Day

गजानन कपडे बदलताना समोर पहातो. लाईटसच्या माळा लागलेल्या दिसतात. तो पहात रहातो. पुण्यभूषण खामकरच्या घरात तो आणि मोना महाबळेश्वरकर लग्नाच्या वेशात बसले आहेत. गजानन प्रचंड आश्चर्याने त्या दोघांकडे पहातो. खिडकीच्या गजाला टेकून पहात रहातो. त्याला आश्चर्य वाटतं आणि आनंदही होतो.

43. Ext/ Day/ Canteen

पर्णरेखाचा व्हॉटसअप स्टेटस पहातो. रिथिंकींग अबाऊट माय एक्सीस्टंस. चहा संपवतो. समोर एक मुलगी येते.

*मुलगीः एक्सक्युज मी. झालंय तुमचं?*

*गजाननः नाही.*

*मुलगीः ओ के! (तिथून निघून जाते.)*

44. Ext/ Night/ Under construction Building

गजानन बत्तीसची वाट पहात उभा आहे. खिडकीमधल्या मुलीच्या हातात बॉल दिसतो. गजानन तिच्याकडे पहातो आणि म्हणतो टाक. ती टाकायला जाते. बॉल खरंच खाली पडतो. गजानन उतरतो. सोसायटीत जातो. बॉल उचलतो. दयायला वर जाणार एवढयात वॉचमन घेतो. त्याच्या हातातून बॉल घेतो.

45. Ext/Day/ Dance Class outside

क्लास संपतो. आरती आणि अंतरा समोर येतात. गजानन गाडी घेऊन थांबलाय.

*अंतराः हाय काका!*

दोघी हसतात.

*गजाननः हाय बाळा!*

*अंतराः एक मिनिट मी काही बाळा वगैरे नाहीये. (बॅग उचलते.) बाय द वे त्या दिवशीचा किस्सा कळाला मला. तुम्ही वाचलात हां मेज्जर!*

*गजाननः का गं?*

*अंतराः त्या पर्णरेखा काकू कसल्या सॅड होत्या. एकदा तुम्ही नसताना घरी आल्या होत्या. आम्ही बेली डान्सची प्रॅक्टीस करत होतो तर त्यांनी टॉवेल दिला पोटावर बांधायला. युसलेस होती हां. टॉवेल काय लावायचे पोटावर? (हसून त्याला टाळी दयायला जाते. तो थांबतो.)*

*गजाननः तू तिच्याबददल असं नको बोलूस.*

*अंतराः मंदच होती हां ती.*

*गजाननः असू दे. चल गं.*

*अंतराः बर मला सांगा ना, एक्सॅक्टली कशामुळे नाही म्हणालात? खरं सांगा हां!*

*गजाननः (तिच्याकडे पहात) मी नाही सांगणार तुला. एकतर तुला सांगायचं काही कारण नाही, आणि दुसरं ते कळण्याची तुझी बौध्दिक क्षमता नाही. तू लहान आहेस अजून खूप!*

*अंतराः आय एम २०! कमऑन!*

*गजाननः वय आणि अक्कल यांचा परस्परांशी काही संबंध नसतो. नेहमी लक्षात ठेव. चल गं.*

*अंतराः आरती, तुझ्या गाडीच्या डिक्कीत माझी संस्कृतची पुस्तकंआहेत.*

गजानन उतरतो. आरती डिक्की उघडते.

*गजाननः कोण शिकतंय संस्कृत?*

*अंतराः मी. ऑफकोर्स!*

*गजाननः हा ॲटीटयूड कशाबददल आहे नक्की? संस्कृत? बी ए? का बळच?*

अंतरा प्रचंड रागाने त्याच्याकडे पहाते. त्याला मधलं बोट दाखवते.

*गजाननः व्वा! एका हातात संस्कृत आणि दुसऱ्या हातात संस्कृती! धन्य आहे. सॉरी पण तू संस्कृत च्या आधी मॅनर्स शिक. त्याची तुला जास्त गरज आहे.*

*अंतराः निघा. (वळते.)*

*गजाननः आणि काय असणार तुमचं संस्कृत तरी. फार फार तर पिबन्ती नदय स्वयमेव नाभ्य स्वयं न खादन्ती फलानी वृक्षा किंवा न ही सुप्तस्य सिंहस्य प्रवेशन्ती मुखे मृगा.*

आरती चमकून पहाते.

*अंतराः शायनिंग मारु नका. दहावीत होतं ते. मी कॉलेजला आहे.*

*गजाननः भृतहरी आहे का मग?*

*अंतराः (तशीच वळते.) आँ?*

*गजाननः माझ्यामते भास असेल?*

*आरतीः ऐ तुम्ही काय बोलताय?*

*गजाननः मग शाकुंतल आणि स्वप्नवासवदत्ता असेल सिलॅबस मध्ये?*

*अंतराः (थांबून) हो! हे स्वप्नवासवदत्ताच आहे!*

*गजाननः व्वा! भासनाटक चक्रैपि छेकैः क्षिप्ते परीक्षितुम! स्वप्नवासवदत्तस्य दाहको भूनः पावका!! हाच श्लोक आहे ना वर?*

अंतरा अवाक होऊन पहाते. पुस्तकाचं पहिलं पान उघडते. तोच श्लोक दिसतो. तीचा आ वासला गेलाय.

*गजाननः दोन्ही आवडती नाटकं माझी. सगळयांना शाकुंतल आवडतं पण मल, स्वप्नवासवदत्ता!वासवदत्ता उदयन आणि तिची वीणा*

*दोघे एकदम : घोषवती!*

गजानन हसतो. आरतीला गाडी चालवायला देतो. मागे छानपैकी बसतो. अंतरा त्याच्याकडे पहात रहाते. आरती अचंबित नजरेनी गाडी चालवतेय. गजानन मागे बसलाय.

*गजाननः लोकांची दृष्टीच बदलते गं अचानक. वाळवंटात गुलाब पाहील्यासारखा चेहरा होतो. पण मला संस्कृत पहिल्यापासनं आवडायचं. सुभाषित माझ्या गळयाचा दागिना होता. आणि मला दरवर्षी पैकीच्या पैकी मार्क होते.*

*आरतीः तुला अबब का म्हणतात?*

*गजाननः मी जन्माला आलो तेव्हा तेरा पाऊंडाचा होतो. नर्स म्हणाली होती अबब केवढं बाळ आहे. मावशीला तो शब्द आवडला. तेव्हापासून अबब!*

46. Ext/Evening/ Outside Maushi Home

गजानन आणि आरती उतरतात.

*गजाननः शार्दुल आणि मी बेस्ट फ्रेंड होतो एकेकाळी. माझे शर्ट घालायचा. मग नंतर कॉन्टेक्ट गेला. मावसचुलत भावांच होतचं एका पॉईंटनंतर!*

मागून अंतरा येते. येऊन त्याच्या समोर उभी रहाते.

*अंतराः सॉरी!*

*आरतीः काय गं?*

*अंतराः तुला नाही गं, हॅलो, सॉरी! जेन्युइनली!*

*गजाननः इटस ओके.*

*अंतराः मला ते शाकुंतल आणि स्वप्नवासवदत्ता सांगाल? मी पाया पडते.*

*आरतीः मी हिस्टरी शिकवतो, संस्कृत नाही गं.*

*आरतीः कॉलेजमध्ये शिक ना!*

*अंतराः शिकले असते पण शिंत्रे मॅडमच्या चिमणीसारख्या आवाजात काही कळत नाही. प्लस यांच्याकडून पटकन शिकता येईल. हवं ते विचारता येईल. इट वील बी फन! प्लीज, का मी पाया पडू?*

(रस्त्यात त्याच्या पाया पडायला जाते. तो ऑकवर्ड होऊन हसायला लागतो.)

*गजाननः अगं हो. मलाही बघायला लागेल.*

*अंतराः तीन सिग्नल मोडलेत, एकाला उडवता उडवता राहीलेय, आणि आरसा तोडून आलेय.*

*गजाननः का?*

*अंतराः सॉरी म्हणायला. प्लीज शिकवा ना. एवढा भाव मी कुठल्याच मुलाला दिला नाहीये. मी तुम्हाला काका म्हणण सोडून देईन!*

आरती डिस्गस्टेड लूक देऊन पहाते. गजानन थांबतो.

*गजाननः (शांतपणे पहातो.) यो.*

*अंतराः ग्रेट. उदया चार वाजता येते.*

*आरतीः (लगबगीने) घरी आईची भिशी आहे.*

*अंतराः बेस्ट. मग माझ्या घरी या. हवं तर मी पेट्रोल अलाऊन्स देते. आरतू अॅड्रेस दे. बाय.*

अंतरा खूश एक्साईट होऊन निघून जाते. आरती आणि गजानन पहात रहातात. गजानन आरती अंतराक्डे जाताना कशी पहातेय ते पहातोय.

*आरतीः फार लक्ष देऊ नका हां तिच्याकडे. आगाऊ आहे ती.*

दोघं आत जायला लागतात.

*आरती: तुम्ही खरंच जाणार आहात का शिकवायला?*

*गजानन: बघू!*

46. Ext/Day/ Piyu Home

अंतराचं मॉडर्न मोठठ घर दिसतं. गजानन घर पाहून अवाक होतो. अंतरा बाहेर येते.

*गजानन: इथे बसूयात?*

*अंतरा: आत! प्लीज!*

46A. Ext/Day/ Piyu Home Room

अंतराच्या रुमचं दार उघडतं. गजानन पहिल्यांदा एका मुलीच्या रुममध्ये डोकावतो. रुम पहातो. खुर्चीवर बसतो. अंतरा समोर बसते, गजानन उठून दार उघडतो. तिथे खुर्ची घेऊन बसतो. धाडकन दोन तीन गोष्टी पडल्याचा आवाज येतो. गजानन दचकून पहातो. अंतरा उठते.

*अंतरा: प्लीज बंदच राहू दे.*

*गजानन: ठीके. शाकुंतल आणि स्वप्नवासवदत्ता सांगण्याआधी मी भासाचं कॉन्ट्रीब्यूशन सांगतो.*

*अंतरा: येस!*

46B. Ext/Day/ Piyu Home Room

अंतरा बसलेली पडलेली लोळलेली दिसते. गजानन समोर तसाच बसलाय.

*अंतरा: या स्वप्नवासवदत्ताचं नाव असं का आहे? तिचं नाव वासवदत्ता, तो उदयन, तिला घोषवती वीणा शिकवायला आलेला. एक मिनिट मी विकीपिडीयावर चेक करते.*

*गजानन: थांब, नको करुस. त्यानी तुला माहीती मिळेल, मजा नाही. नाटकाला एकरुप होऊन जेव्हा तो प्रवेश वाचशील तेव्हा तुला जो आनंद मिळेल ना, तो विकीपिडीयावर भसकन वाचून नाही मिळणार. स्टेप बाय स्टेप जाऊया, आधी शाकुंतल मग स्वप्नवासवदत्ता!*

वहीवर ती अंक पहिला असं लिहीलं जातं.

47. Ext/Evening/ Outhouse

एका जुन्या आउटहाऊस समोर बत्तीस आणि गजानन उभे आहेत.

*बत्तीस: सर अर्ज किया है!*

*गजाननः कुठे रे.*

*बत्तीसः मला मारा त्या पेक्षा फिजीकली. जिंदगी जिनी है तो अपने दमपर, दूसरोंके कंधोपरतो जनाजे भी निकलते है! आँ?*

*गजाननः व्वा!!*

*बत्तीसः आठ भाडं, तीस डिपॉझिट, आपला फ्रेंड आहे पुष्कर. टेनंट हवा होता. म्हणलं मी देतो. मोकळेपणानं रहायचं होतं ना?*

*गजाननः मला?*

*बत्तीसः हां मग, आयुष्यभर मावशीसाठी धावती लायब्ररी होणारात का स्वतःचं स्वतः रहाणार आहात. मेन काये, तुम्हाला तुमची कंपनी आवडली पाहीजे!*

*गजाननः (हसतो.) अजून टाकलीच नाहीये ना पण!*

*बत्तीसः सर, तुमचं आणि जोक्सचं भांडण कधी झालं होतं?*

बत्तीस पळत पळत जातो. दार उघडतो. दोघं त्या जुन्या आऊटहाउसमध्ये उभे दिसतात.

## 48. MONTAGE

*शाकुंतलः अंक दुसरा पान उलगडलं जातं.*

भिंती खरवडल्या जातात.

रंगाचे डबे उघडले जातात.

भिंतींना रंग दिला जातो.

गजानन घरुन सगळं सामान उचलतो. समोर आरती हेडफोन्स लावून बसलीये. गजानन तिला हात करतो.

*गजाननः थँक्स.*

*आरतीः कशाबददल?*

*गजाननः मला सहन केल्याबददल. आणि हो, तू माझ्या नवीन घरी कधीही येऊ शकतेस.*

*आरतीः मी कशाला येऊ? मला थोडीचं संस्कृत शिकायचंय.*

*गजाननः मला माहीतेय मी तुला आवडत नाही, आणि आता अंतरा मला भेटतीये तेही. त्या बददल माझी तक्रार नाही. पण मी स्वतःचं काहीतरी करु पहातोय. घराप्रमाणेच नवा व्हायचा प्रयत्न करतोय. त्यात बहीण म्हणून तुझी मदत हवीये. करशील?*

ती काहीच बोलत नाही.

*गजाननः हरकत नाही. थँक यू आणि ऑल द बेस्ट.*

*आरतीः वॉल ला कुठला रंग दिलाय?*

*गजाननः आँ? हिरवा!*

आरती डोक्याला हात मारते.

गजाननः (हसून) लेमन!

म्युझिक वाढत जातं. लेमन कलरची भिंत दिसते. त्यावर फ्रेम्स लावल्या जातात.

कपडे वाळत घालायची दोरी लागते. त्यावर कपडे वाळत घातले जातात.

केनचा सोफा आत सरकताना दिसतो.

गजानन आणि अंतरा त्यावर बसून अभ्यास करतायत. शाकुंतल अंक शेवटचा असं दिसतं.

जुना रेडीओ येतो. तो सुरु केला जातो. बत्तीस त्याच्यावर वा वा म्हणतोय!

इंडक्शन उघडलं जातं. त्यावर चहा होताना दिसतो.

गजानन आणि अंतरा आणि गजानन दोघं बसून चहा पितात. शेजारी वहया पुस्तकं पडलेली.

वहीवर लिहीलं जातं स्वप्नवासवदत्ता अंक पहिला.

*अंतराः मला माझं नाव कधी कधी जाम बोर वाटतं. आपल्या हातात पाहीजे ना आपल्याला नाव ठेवणं!*

गजाननः हं!

*अंतराः तुझ्या हातात असतं तर तू काय ठेवलं असतंस?*

*गजाननः (तिच्याकडे पहात) माहीत नाही. मी कधी विचार नाही केला.*

*अंतराः एकदाही नाही? आपलं हे नाव नसतं तर काय असतं? आपण हे काम करत नसतो तर काय करत असतो? विचार तर कर!*

*गजाननः वेडी आहेस का तू?*

बुक शेल्फ येतो. पुस्तकं लावली जातात. ती लावता लावता बत्तीस आरतीकडे पाहून हसतो.

*बत्तीसः आर यू ऑन व्हॉटस ॲप?*

गजानन बरोब्बर दोघांच्या मध्ये येऊन एक पुस्तकं ठेवतो आणि बत्तीस कडे रागाने पहातो.

एक झोला दिसतो. अंतरा त्यातून काय काय उत्साहाने काढते.

छोटे पक्षी लावते. कॉफीचे मग ठेवते.

शेल्फवर अंतरा तीन छोटया सायकली ठेवते. गजानन त्याकडे पहातो. प्रचंड खूश होतो. तिच्याकडे पहातो. ती त्याच्याकडे पहाते.

व्हॉटस अपवर बत्तीस आणि पर्णरेखाच्या वर अंतरा ॲड होतं. तिचा स्टेटस आहे असतो मा सदगमय, तमसो मा ज्योतिर्गमय!

झपकन लाईटस लागतात. रात्रीच्या प्रकाशात आख्खं घर उजळलेलं दिसतं. मधोमध मिठाईचे बॉक्सेस ठेवलेले आणि दोन तीन बुके.

मावशी गजानन अंतरा बत्तीस आणि आरती त्याच्याकडे खूश होऊन पहातायत.

बत्तीस म्हणतो या एक कुल्फी घेऊ? सेल्फी काढला जातो.

49. Int/ Night/ Ouhouse

मावशी ते सगळं कौतुकाने पहाते. त्याचा पाठीवर थाप मारते.

*मावशीः (गमतीने) गेलास वाईला की मला दे.*

*गजाननः तुझंच आहे.*

*मावशीः चला.*

*मावशीः आता घर झालंय, इथंच बघ नोकरी आणि एकदा चल इथल्या पुराणिककाकूंच्या इथे. अतिशय चांगली स्थळ आहेत त्यांच्याकडे.*

*गजाननः जाऊयात.*

*मावशीः चला गं!*

तिघी निघून जातात. अंतरा एका क्षणाकरता त्याचा हात धरुन ठेवते, निघून जाते. आता बत्तीस आणि गजानन दोघंच उरलेत. बत्तीस त्याच्या समोर उभा रहातो. दोघं एकमेकांना कडकडून मिठी मारतात.

*गजाननः बत्तीस काय सांगू? तू मुलगी असतास ना तुझ्याशीच लग्न केलं असतं*

*बत्तीसः तुमची फँटसी चांगली आहे, पण मला काही चॉईस आहे का नाही!*

दोघं हसतात. बत्तीस त्याला एक गिफ्ट देतो, आणि त्याला थाप मारुन निघतो. गजानन दार तसंच उघडं ठेऊन उभा रहातो. त्या गिफ्ट कडे पहातो. गिफ्ट उघडतो. त्याला गोल नील फलक दिसतो. त्यावर लिहीलंय सुप्रसिध्द इतिहास शिक्षक, गजानन कुलकर्णी इथे रहातात. गजानन दाराच्या बाहेर ती प्लेट लावतो आणि घराकडे पहातो. पहाता पहाता रडायला लागतो. त्याला रडू अनावर होतं. तो ग्रीलला टेकतो.

*गजाननः नाईलाज म्हणून एकटं रहाण्यापेक्षा चॉईस म्हणून एकटं रहाण्यात किती समाधान आहे. सेविंगचे फक्त निम्मे पैसे घालवून आयुष्यात कधीही मिळालं नाही इतकं समाधान आहे माझ्यापाशी आत्ता. नव्या रंगाच्या वासात पहिली रात्र घालवायचीये. सायलीच्या घरी घालवली होती. लहानपणी गेलो होतो सोबतीला. रंगाचं काम काढलं होतं आणि तिचे बाबा बाहेरगावी गेले होते. गार भिंतीला गाल लावून समोरासमोर झोपलो होतो आम्ही दोघं.*

चहा उकळतो. चहा ओतला जातो. एक पुस्तकं काढलं जातं. गजानन वाचत बसतो. वाचता वाचता झोपतो.

दार उघडंच आहे. अंतरा येते. त्याच्याकडे पहाते. शेजारनं स्कार्फ उचलते. तो झोपेत बोलतोय, अंतरा, अंतरा, ती त्याचा खाली पडलेला हात वर उचलून ठेवते. तो डोळे उघडतो. तिच्या समोर उभा रहातो. अंतरा त्याच्याकडे पहाते. त्याला मिठी मारते. तोही तिला मिठी मारतो. ती लांब लांब चालत जाते.

*गजाननः अंतरा, अंतरा...*

ती वळून पहाते.

*गजाननः मी तुला आयुष्यात कधीच विसरणार नाही, कारण मला मिठी मारणारी तू पहीली मुलगी आहेस.*

ती लाजून त्याच्याकडे पहाते. त्याच्या डोळयात पाणी आहे. ती लाजून वळते.

49A. Int/ Night/ Ouhouse

गजानन रात्री उठतो. त्याला लक्षात येतं की तो गादीवर झोपलाय. तो समोर पहातो. त्याला स्वप्नवासवदत्ताचं पुस्तक आणि अंतराची वही शेल्फच्या बाहेर ठेवलेलं दिसतं.

अंतरा स्वतःच्या घरात बसलीये. खिडकीतून बाहेर पहात लाजते.

केळीच्या पानाची स्लेट येते. प्रकरण चौथे प्रियकरा, प्रियकरो, प्रियकरम दिवतीया

गाणं इन होतं.

PBS4: Sanskrit Song Fantasy plus Reality

PBS4A: Int/Day/ Outhouse

आता अंतरा उतरवून घेतेय. अंक चौथा.

*अंतराः एक्साम संपली की लगेच नाईट आउट करुया!*

*गजाननः वेडी आहेस का तू?*

PBS4B: Ext/ Day/ Danceclass

क्लासखाली अंतरा आणि आरती उभ्या आहेत.

*अंतराः काय मजा येते गजानन बरोबर. तू येणं कमी का केलं?*

*आरतीः आवडती व्यक्ती नावडत्या नात्यात असली की काही बोलता येत नाही.*

गजानन गाडी घेऊन येतो. आरती बसायला जाते.

*गजाननः मी अंतरा ला न्यायला आलोय.*

अंतरा गाडीवर बसते. गजानन आणि ती निघून जातात. आरती चालत जाते.

PBS4C: Ext/ Day/ Road

गजानन गाडी चालवतोय. अंतरा बोलता बोलता पुढे येते आणि त्याच्या खांदयावर हनुवटी टेकवते. गजाननला तो स्पर्श होतो आणि तो प्रचंड आनंदी होतो.

PBS4D: Setup

गाण्यात त्याला तो उदयन आणि ती वासवदत्ता असे दिसतायत. दोघं वीणा शिकतायत. एकमेकांच्या जवळ येतात. बत्तीस सेवक म्हणून येतो आणि गाणं संपतं.

*बत्तीसः किमपी आश्चर्यम! किमपी आश्चर्यम?*

*गजाननः राहू दे.*

*बत्तीसः कॉलेजला कधी येताय? आपण शिक्षक आहात.*

*गजाननः हो पण माझ्या वर्गावर कोणी फिरकत नाही.*

*बत्तीसः त्यांना आणण्याची जबाबदारी माझी. आपण यावं. अन या वेळेला चांगला धडा शिकवावा. आपला शेवटचा महिनाच शिल्लकराहीलाय.*

50. Int/Day/College Classroom

धाडकन दार उघडतं. गजानन समोर येतो. पुस्तकं ठेवतो. आणि समोर पहातो. सगळा वर्ग भरलाय.

*गजाननः अरे व्वा! आज कसे काय?*

*१: हा बत्तीस म्हणला फ्री डेटा कार्ड वाटप आहे. चला!*

*गजाननः आजपासनं रोज पन्नास मिनिटं इतिहासाचं लेक्चर होणार आहे. ज्यांना ज्यांना टाईमपास करायचाय, गोंधळ घालायचाय, व्हॉटस अॅपवर बोलायचंय पहिले बाहेर व्हा.*

सगळे गप्पगार होतात. बत्तीस अंगठा दाखवतो.

*गजाननः ऐ, माठा तू आधी बाहेर हो. चल. आणि आठ दिवस दिसू नको. चल उठ! बाहेर हो!*

बत्तीस हताश होऊन बाहेर जातो. गजानन मुलींकडे पहातो. मुलींच्या दिशेनी येतो.

*गजाननः आज मी एक प्रश्न विचारणारे ज्याचं उत्तर फक्त मुलींनी दयायचंय. (मुलांकडे पाहून) करा ना चॅकचॅक करा आता. सावित्रीबाई फुल्यांनी मुलींची जी पहिली शाळा काढली त्यातल्या पहिल्या स्टुडंटचं नाव काय?*

मुलीचा फोन वाजायला लागतो. गजानन फोन हातात धरतो.

*गजाननः हा फोन पास करायचा एकीनी दुसऱ्याकडे. रिंग थांबल्यावर जिच्याकडे येईल तीनी उत्तर दयायचं नाहीतर फोन फेकून दयायचा.*

*मुलगीः ओ सर!*

*गजाननः चला चला.*

एका मुलीकडे फोन दिला जातो. दुसऱ्या मुलीकडे. तिसऱ्या. मागे एका मुलीकडे येतो आणि फोन थांबतो.

*गजाननः सांगा उत्तर सांगा! पहिल्या स्टुंडटंच नाव. (मुलगी शांत आहे.) बरं मुलांनी सांगा! (सायलेंस जातो.) बरं सावित्रीबाई फुले तरी माहीतीयेत? बरं ज्योतिबा फुले?*

मुलगी मान खाली घालते.

*ही ती लोकआहेत ज्यांच्या मुळे आज तुम्ही मुली वर्गात बसून शिकताय. त्यांनी शंभर वर्षापूर्वी दगड खाल्ले म्हणून आज तुम्हाला वर्गात मोबाईल वाजवता येतो. माझी नाही किमान त्यांची किंमत ठेवा. मला माहीतेय तुम्हाला इतिहास आवडत नाही. कारण तुम्हाला नीट शिकवलाच जात नाही. पण मी शिकवायला तयार आहे. जीव तोडून. तुम्हाला शिकायचाय?*

काही माना डोलावल्या जातात.

*तुमचं तुमच्याबददल, राज्याबददल, देशाबददल, आणि इतिहासाबददलचं परसेप्शन बदलीन जाईल ही गॅरेंटी मी देतो, मी हे ही प्रॉमिस करतो की हा तुमच्या आयुष्यातला सगळयात हॅपनिंग महिना असेल! तयार आहात?*

काही आवाज येतात. हो.

*मोठयाने. मला तुमचा खरा आवाज ऐकायचाय!*

50A. Ext/Day/College Classroom

वर्गाच्या बाहेरुन एक शिक्षक चाललेत. त्यांना एकदम मोठठा आवाज येतो. हो... ते दचकतात!

50B. Int/Day/College Classroom

गजानन सगळयांकडे पाहून म्हणतो.

*गजाननः व्हॉटस अप ग्रुप करा. हिस्टरी मेकर्स. मला सगळे त्या ग्रुपवर हवेत! (त्या मुलीला मोबाईल देत) तू अॅडमिन!*

धपाधप नंबर अॅड होताना दिसतात. स्टीकर्स पॉप अप होतात. गजानन मधोमध अत्यंत कॉन्फीडन्टली उभा दिसतो. धप असा आवाज येतो.

51. Int/Evening/Hall

गजानन आता माईक समोर उभा आहे. त्याला बिल्ला लावलाय. समोर मावशी बसलीये. एक काकू अनाऊन्समेंट करतात.

*पुराणिकः गजानन कुलकर्णी, वय ३३, शिक्षण फोर व्हीलर, पगार एम ए! सॉरी सॉरी!*

सगळे हसतात. गजानन त्यांना थांबवतो.

*गजाननः मी गजानन कुलकर्णी, वय ३३ पूर्ण, एम ए आहे, टेम्पररी टिचर आहे, माझ्याकडे फोर व्हीलर नाही, घरी आई वडील आहेत.*

मुली इकडे तिकडे पहातात. मावशी ते पहाते. तिचा फोन वाजतो. ती निघून जाते. तो पहातो. त्याला मधोमध पर्णरेखा बसलेली दिसते, दोघं एकमेकांकडे पहातात. तिलाही बिल्ला लावलेला आहे. गजानन निघून जातो.

*पुराणिकः आता मुली. पर्णरेखा जहागिरदार.*

52. Ext/ Restaurent/ Night

मावशी आणि गजानन जेवतायत.

*गजाननः थोडं जास्त तिखट आहे ना? का ओके आहे?*

*मावशीः (शांतपणे मान डोलावते.) ठीके.*

*गजाननः गोड काही?*

*मावशीः नको.*

53. Int/ Night/Outhouse

नाईट लॅम्पच्या प्रकाशात तो आणि मावशी बसलेत. दोघं कॉफी पितायत.

*मावशीः सॉरी रे बाबा!*

*गजाननः काय गं?*

*मावशीः हां. माझ्यामुळे तुला यायला लागलं सगळयांसमोर असं उभं रहायला लागलं. स्वतःच्या डोळयांनी पाहील तेव्हा जाणवलं. (थांबून) खूप त्रास होत असेल ना.*

*गजाननः हं.*

*मावशीः आजकालच्या मुली सगळं किती बघून पारखून घेतात. नाहीतर आम्ही, काही चॉईसच नव्हता आयुष्यात. (कॉफी पिते.) छान केलीयेस. मस्त सेटल झाला आता अबब! (दोघं हसतात.) तुझं घर पाहीलं ना त्या दिवशी जळले मी अक्षरशः*

*गजाननः का गं?*

*मावशीः हो, मला पण हे असलं काय काय करायचं होतं. एकटं रहाणं, स्वतःपुरता चहा करणं. पुस्तकं वाचणं, पुस्तकं म्हणजे जीव की प्राण. लहानपणी आम्हाला दोघींना पैसे दिले की तुझी आई पिक्चर बघायची राजेंद्र कुमारचे आणि मी पुस्तकं घ्यायचे विकत. फाऊंटनहेड वगैरे बसल्या बैठकीत वाचून काढलेत मी. मग लग्न झालं. दोनशे पानांच पुस्तक सहा तासात वाचून व्हायचं त्याला वाचायला दोन दिवस लागायला लागले, मग आठ दिवस, मग महिना, मग सहा महिने. संपलं रे वाचन आयुष्यातनं. कोपऱ्यावरच्या लायब्ररीतलं पुस्तक तीन वर्ष होतं माझ्याकडे, दंड भरुन परत केलं पण वाचताच आलं नाही. आता विकत घेत सुटते नुसती. पैसे आहेत वेळ आहेत पण ती इच्छा परत आणता येत नाही. ती गेली. सांगायचा मुददा हा, की आपली इच्छा मारता कामा नये,*

*त्याच्यासाठी या घरासारखी एक जागा मनातही ठेवायला पाहीजे. आपली, आपल्यापुरती. तुला हवं तसं जगतोयस ना तसंच जग, हवं तरच लग्न कर. लिव्ह इन का काय म्हणतात तसा रहा. उगाच घाई घाईत लग्न करुन सहा महिन्यात मोडायला आल्यासारखं नको. (डोळयातून पाणी येतं.)*

*गजाननः (कप बाजूला ठेवतो.) काय गं काय झालंय?*

*मावशीः बघ ना, काका गेल्यावर, आत्ता कुठे नीट झालं होतं. आज शार्दुलचा फोन आला होता. पटत नाही मुग्धाशी म्हणाला, गेले दोन आठवडे एकत्र रहातही नाहीयेत. (थांबून) त्यामुळे कोणीही कितीही आग्रह केला, कितीही*

*मागे लागलं तरी तू तुला हवं तेच कर. मनापासनं. आई बाबांनाही मी सांगेन. आणि इतर कोणालाही स्पष्टीकरण दयायला तू बांधिल नाहीस. हं?*

*गजाननः थँक यू मावशी.*

*मावशीः मी म्हणलं पाहीजे. (उठते.)*

*गजाननः मावशी,*

उठतो शेल्फमधनं एक पुस्तक काढून तिला देतो.

*गजाननः अप्रतिम पुस्तक आहे. परत सुरु कर.*

*मावशीः हं. (त्या पुस्तकाकडे पहात रहाते. चेहऱ्यावर प्रचंड आश्चर्य)*

*गजाननः काय गं?*

*मावशीः कोणाचं आहे हे?*

*गजाननः वाईतनं जी ट्रंक रागाने पाठवली त्यातलं आहे आईचं!*

*मावशीः गपे! माझं आहे हे!! (पहिलं पान उघडते. तीच नाव  तारीख आणि सही दिसते. ती हरखून पहाते.) तुझे काका बघायले आले तेव्हा हेच पुस्तक वाचत होते. तुझ्या आईनी हिसकावून घेतलं होतं हातातनं. (ते उलटपालटं करत) बाप रे!!*

*गजाननः हो? कुठली कथा वाचत होतीस तेव्हा?*

*मावशीः (आठवत पहाते.) काय रानटी लोक आहेत!*

त्याला पान दाखवते. ते वरुन चार वेळा दुमडलेलं असतं. मावशी त्याच्याकडे हसून पहाते. पुस्तकंजवळ धरते.

54. Ext/Day/Tekdi

मोबाईलवर फिटनेस ॲप डाऊनलोड होतं. त्याचा लोगो स्क्रीनवर येतो.

गजानन टेकडीवर एकटाच पळतोय. समोर गर्दी जमलीये. तो धावत धावत जाऊन पहातो. समायराला चक्कर आलीये. गजानन पुढे जातो.

*गजाननः आय नो हर. मी बघतो.*

इकडे तिकडे पहातो. तिला उचलतो, चौथऱ्यावर ठेवतो. पाणी मारतो. ती दचकून जागी होते.
दोघं बसलेले दिसतात. गजानन तिला चॉकलेट देतो.

*गजाननः बहुतेक शुगर लो झालीये. (उठतो.) टेक केअर.*

तिच्या डोक्यावर हात फिरवून पळायला लागतो. ती त्याच्याकडे पहात रहाते.

55. Int/ Day/ Outhouse

फ्लिपकार्टचं ॲप येतं.
ऑनलाईन गोष्टी घेऊन एक माणूस येतो.
उघडल्या जातात. मनगटावर घडयाळ दिसतं.
डोळयाला गॉगल दिसतो. बेल्ट लावला जाताना दिसतो. तो लागत नाही.
गजानन पकडीने एक होल जास्त करतो. आरशात स्वतःकडे बघून हसतो.

56. Ext/ Day/ Historic site

गजानन एका जुन्या जागेत उभा आहे. त्या जागेची माहीती वाचतोय. धीस मंथ बेस्ट वर्ल्ड हेरिटेज साईटस असं दिसतं त्यावर क्लिक करतो.

57. Ext/ Afternoon / Corriodor

गजानन बाहेर पडतो. सगळी मुलं त्याच्यामागून बाहेर पडतात.

*१: सर, कॉलेजने कुठलाही डे साजरा करायला परमिशन दिली नाहीये.*

*२: तुम्ही प्लीज बोलता का? अॅटलीस्ट. चॉकलेट डे.*

*गजानन: चॉकलेट दयायला दिवस कशाला पाहीजे?*

*१: सर प्लीज.*

*गजानन: कोणाकडेही जाऊ नका. आपण शिजवू काहीतरी.*

58. Int/ Night/ Outhouse

रेसिपीज चं अॅप येतं. गजानन पास्ता ची रेसिपी पहातो.

58A. Int/ Night/ Outhouse

पास्ता बनवला जातो. त्यावर सिझनींग केलं जातं.

एक कँडल लावली जाते.

गजानन एकटा बसून पास्ता खातो.

डिशवरुन पाणी गोल गोल करुन धुताना दिसतं.

गादीवर स्वच्छ चादर अंथरतो.

सकाळी पडदे उघडतात.

न्यूजचं अॅप दिसतं.

गजानन चहा पिता पिता सेल्फी घेतो.

वॉलपेपर बदलतो. पहिल्यांदा त्याचा चेहरा दिसतो. आणि त्यावर सगळी अॅप्स दिसतात.

अंतरा आलेली दिसते.

*अंतरा: पहिला पेपर आहे. प्लीज विश मी लक!*

*गजानन: तू एवढयासाठी आलीस भेटायला?*

*अंतरा: हो, आणि आय मिस्ड यू!* (गजाननला मिठी मारते. तो सोडवतो.)

*गजानन: मी टू!*

*अंतरा: आता एक्साम संपली की डायरेक्ट नाईट आउट!*

*गजाननः वेडी आहेस का तू?*

*अंतरा रागाने पहाते.*

*गजाननः हो, हो! जा आता! उशीर होईल!*

59. Int/Afternoon/ Library

गजानन ऐतिहासिक कॅरेक्टर्सच्या फोटोज समोर उभा आहे. हातात पुस्तकं वॉर हिस्टरी. त्याकडे बघून हसतो. वळणार इतक्यात समोरच्या सगळया फोटोज कडे पहातो. पहात पहात वळतो. ते सगळे फोटो त्याच्या भोवती घुमायला लागतात.

ग्रुप ओपन होतो टाईप केलं जातं 'आयडिया'!!!!

60. Ext/ Day/ Corridor

बत्तीस जीन्स वर करत चालत जातो. वर्गाच्या बाहेर जातो. दोन मुली बाहेर पडतात. एकीने ॲनी बेझंटचा वेश केलाय दुसरीने मॅडम कामाचा.

*१: ही इज सो कूल! आय मीन. धीस आयडिआ इज सो जिनीयस!*

*२: आपण त्यांना कूल कर्णी म्हणूयात. आउटस्टँडींग!*

60A. Int/ Day/ Classroom

बेल वाजते बत्तीस आत जातो आणि दचकतोच. आख्ख्या वर्गाने एतिहासिक कपडे घातलेत. गजानन पहातोय. पाच जण गांधीजी, चार आंबेडकर, दोन सुभाषचंद्र बोस, तीन भगतसिंग, ५ झाशीची राणी, काही पेशवे, असे सगळे दिसतात. बत्तीस चकीत होत होत एकाकडे जातो. तो एकटाच बसलाय.

*बत्तीसः काय उल्हया, तू काय झालाय?*

*१: भुवन!*

बत्तीस कपाळाला हात लावतो. तेवढयात सगळे उभे रहातात. गजानन एक पांढरा झब्बा आणि धोतर घालून येतो. त्याने जुना चष्मा चढवलाय.

*गजाननः (अत्यंत चार्मिंग हसत) छान वाटतंय. माझ्या या कॉलेजमधल्या शेवटच्या लेक्चरला तुम्ही सगळे समोर आहात. छान वाटयंय. तुम्हाला प्रश्न असेल ना की मी कुठल्याही ऐतिहासिक माणसाचे कपडे का नाही घातले? मी म्हणलं होतं की ऐतिहासिक व्यक्तींचं काहीतरी घेऊन या. तुम्ही कपडे आणले, मी विचार!*

*कारण मी मानतो की इतिहास ही काही फॅन्सी ड्रेस कॉम्पीटीशन नाही. इतिहास म्हणजे मूळ. इतिहास म्हणजे आत्मा. आपल्या भविष्यासाठी वर्तमान बदलणाऱ्या माणसांमुळे घडतो त्यालाच नंतर इतिहास म्हणतात.*

वर्गाच्या बाहेरनं जाणारे दोन चार जण थबकून वळून पहातात.

*पण आपली इतिहासाची  डेफिनेशन जरा वेगळी आहे. आपल्यासाठी तारखा, व्यक्ती, आणि घटना म्हणजे फक्त इतिहास. मग आपण ऐतिहासिक घटनांच्या तारखां वरनं भांडतो, आपण ऐतिहासिक जागांना पिकनिक स्पॉट बनवतो, हे बदामात कोरलेली नाव आणि पुड्या पडलेल्या, आणि गाडीच्या मागे राजे पुन्हा जन्माला या.* (मुलं हसतात.) *आणि ऐतिहासिक माणसं? त्यांच्या इतकं दुर्दैवी तर आपल्या देशात कोणीही नाही. मी नाही कुसुमाग्रज म्हणतात. आपण त्यांचे पुतळे बांधतो आणि विचार जमीनदोस्त करतो.*

बाहेर काही वेगळे स्टुडंट आहेत जे माना डोलवतायत. बाहेर गर्दी आहे,मुलं टाचा उंच करुन पहातायत.

*मला मी एम ए करत असताना नेहमी वाटायचं, इतर देशांना भूतकाळ आहे पण इतिहासच नाही, मग आपल्या इथं इतिहास आहे त्याचं का बरं काही वाटत नाही? मग मला लक्षात आलं, आपला इतिहासच बेवारस करुन टाकलाय आपण .*
*त्याच्यावरनं भांडायला सगळे हजर पण त्याला आपला*
*मानायला कोणी तयार नाही. त्याला धरुन भविष्यात पाऊल टाकायला कोणी पुढे येत नाही. आमचा इतिहास तोच जो आम्हाला आमच्या सोयीनी वापरता येईल. वर्षानुवर्ष आपण हेच केलंय. मनापासनं इतिहास जगणाऱ्या आणि जपणाऱ्यांना काय त्रास होत या सगळयाचा कधी विचार केलाय? नाही. मग आता करुया.*

मुलं होकारार्थी माना डोलावतात.

*जगातला सगळयात यंग देश असं फेसबुकवर मानाने मिरवतो आपण*
*ती यंग लोकं काय करु शकतात हे दाखवूयात. आज शंभर टक्के मतदान होणं, ही सुध्दा पन्नास वर्षांनी ऐतिहासिक घटना होईल, दर शनिवारी सायकल वापरणं याची सुध्दा सामाजिक चळवळ होईल, यू नेवर नो. जास्तीत जास्त लोकांना साक्षर केलतं त्यातनच परिवर्तन होईल! तुम्हाला हेच छोटे छोटे बदल घडवायचेत. बाकी काही नाही, किमान येणाऱ्या पुढच्या पिढयांना चांगला इतिहास तर देऊयात आपण. मला माहीत   नाही मी यापुढे तुम्हाला भेटेन का नाही, शिकवेन का नाही, पण या कॉलेजमधल्या मुलांनी इतिहास जपला पाहीजे, जगला पाहीजे, घडवला पाहीजे.*

*तुम्ही मला सहन केलंत त्याबददल आभार. मला गेली आठ वर्ष कोणालातरी जे सांगायचं होतं ते मी सांगितलं. थँक यू ऑल. आज मी काहीही शिकवणार नाही.*

वर्गात पिनड्रॉप सायलेन्स जातो. बत्तीसचा आ वासला गेलाय. ती ग्रुप अॅडमिन सावित्रीबाई फुल्यांच्या वेषात उभी रहाते, बाहेर जाते. हळूहळू विवेकानंद उठतात, त्यांच्या शेजारी सुभाषबाबू, त्यांच्या मागून भगतसिंग, त्यांच्या पुढून झाशीची राणी, सगळी ऐतिहासिक पात्र एक एक करुन जातात. गजानन तसाच उभा रहातो. सगळी मुलं पांगतात. बत्तीस बेंचवरन उडी मारुन समोर येतो, आणि थेट त्याच्या पाया पडतो.

## 60B. Int/ Day/ Classroom

गजानन दार उघडतो. पहिलं पाऊल बाहेर टाकतो. त्याला दिसतं आख्खा कॉरीडॉर भरलाय. मुलं बाजूला सरकतात आणि टाळया वाजवायला सुरुवात करतात. तो इमोशनल होतो. बत्तीस कडे पहातो. बत्तीस मागे थांबतो. त्याला जायला सांगतो. गजानन टाळयांच्या गजरात चालत चालत चाललाय. सगळे त्याला थँक यू सर, थँक यू सर, म्हणतायत. तो हसतमुखाने ते सगळं घेतोय. सगळयात शेवटी येऊन थबकतो. एक मुलगी टाळया वाजवताना दिसते. गजानन तिच्याकडे पहातो. पंजाबी ड्रेस घालून पर्णरेखा उभी आहे. डोळयात पाणी आहे. गजानन तिच्या जवळ येतो.

*पर्णरेखाः तू नेहमीच फार महत्वाचं बोलतोस. तेव्हाही बोललास आणि आजही. अप्रतिम झालं लेक्चर!*

*गजाननः मला कळलं नाही. तू कशी काय?*

*पर्णरेखाः दोन गोष्टी कळल्या होत्या, त्या सांगायला आले. एक म्हणजे संसार ही वेलबुटटी नाहीये, आणि दुसरं मला तुझ्याशीच लग्न करायचंय!*

*गजाननः अगं काय बोलतेयस तू?*

*पर्णरेखाः माझं चुकलं. मी स्वतःच्या शिस्तीत सगळयांसारख तुलाही बांधत होते. पण नाही जमलं. पण तुला माहीतेय तू एकमेव मुलगा आहेस, ज्यानं मला खरं कारण सांगून रिजेक्ट केलं. मी अळणी आहे, बोरिंग आहे, कारण मी घाबरट आहे अरे. देव या संकल्पनेच्या आधाराशिवाय मला जगणचं अशक्य आहे. पण तुला माहीतेय गेले दोन महिने मी एकदाही मठात गेली नाहीये.*

बत्तीस कोपऱ्यात येऊन उभा रहातो. ती त्याच्याकडे पहाते.

*बत्तीसला एकदोनदा फोनही केले मी. मला माहीत नाही मला वाय झेड वगैरे होता येईल का पण मला एवढं नक्की सांगता येईल की तुझ्यासारख्या खऱ्या माणसाचा आधार मला देवापेक्षा जास्त आहे, आणि तो मिळाला तर कदाचित मलाही नॉर्मल जगता येईल!*

*(त्याला पुढे बोलवते. तो थांबतो.)*

*घाबरु नको, अंगारा नाही लावणार.*

तो हलका हसतो. पुढे येतो. इतक्यात ती त्याचा हात हातात घेते आणि त्याला मिठी मारते. तिच्या हातातून गंडा गेलेला दिसतो. तिने त्याला कडकडून मिठी मारलीये.

*पर्णरेखाः कुल्फी?*

बत्तीस तोंड लपवून वळतो. गजानन घाबरुन तिच्याकडे पहातो. दोघांचा फोटो काढलेला दिसतो.

61. Ext/ Night/ under construction building

अंतरा कॉलींग असं दिसतं. गजानन मोबाईल सायलेंटवर करतो.

*गजाननः कधीपासनं चाललंय तुझं आणि पर्णरेखाचं हे भूमिगत अभियान?*

*बत्तीसः हां. म्हणजे हे सगळं झाल्यावर त्यांचा मेसेज आलेला, एवढी वाईट आहे का मी? मी म्हणलं नाही खूप चांगल्या आहात पण तुम्ही देवळातला देव कॉलेजमध्ये शोधला तर कसा मिळेल? मग आवडलं त्यांना माझं म्हणणं, आणि केलं मी त्यांना थोडी मदत!*

*गजाननः काय तिलाही सांगितलंस? वाय झेड ? हवा खवा धुव्वा? बरं एक मिनिटं, हे धुव्वा काये? दरवेळेला रहातं विचारायचं.*

*बत्तीसः तुम्हाला आता काही उपयोग नाही पण तरीही ज्ञान देतो.*

*धुव्वा म्हणजे असं कपल, जे कधीही कुठेही कशेही भेटली तरी आपल्याला वाटतं ही एकमेकांसाठीच धुरातनं चालत आलेत. त्यांचं हसणं धुव्वा,बोलणं धुव्वा, बघण धुव्वा, आज तुमच्या आणि पर्णरेखा वहीनींकडे बघून सेम वाटलं!*

*गजाननः माझं अजून ठरलं नाहीये!*

*बत्तीसः अजून! अहो किती वेळ!*

*गजाननः आठ वर्ष थांबलोय, पंधरा वीस दिवसांनी काही फरक पडत नाही.*

*बत्तीसः ओ, आधी लाईन लावलीत ना, आता नंबर आलाय तर कसला विचार करताय? एवढंच होतं तर नाही का नाही म्हणालात हो?*

*गजाननः कारण ती खरी वाटली मला पहिल्यांदा.*

*बत्तीसः मला तोंडावर पाडू नका हां. मी प्रॉमिस केलंय.*

*गजाननः तुझा काय संबंध आहे? मी ठरवेन. तूच म्हणला होतास ना, सगळयांचा विरुध्द जायला लागेल पण आपला डिसीजन हा आपल्यावर अवलंबून पाहीजे. तोच घेतोय मी.*

*त्याच्या आड कुणीही यायचं नाही. तू पण नाही.*

इकडे तिकडे पहातो. त्याला बंद खिडकीच्या आड ती लहान मुलगी आणि तिच्या वडलांची सावली दिसते. त्या मुलीला कडेवर घेतलंय. गजानन तिकडे पहात रहातो. पुन्हा फोन वाजतो. तो त्याकडे पहातो. अंतरा कॉलिंग असं दिसतं. तो उचलतो.

*गजाननः हां बोल गं! काय??*

62. Int/ Night/ Outhouse

दोन बॅग्ज ठेवल्या जातात. अंतरा एक सॅक काढते. गजानन समोर उभा आहे.

*अंतराः अफ्रिकेतन सर्कस आल्यासारखा बघू नकोस. मी ऑलरेडी म्हणलं होतं. एक्साम संपली की मी रहायला येणार. आले.*

*गजाननः घरी सांगितलंयस?*

*अंतराः नाही आणि मी नाही सांगणार. आणि मी रहाणारे.*

*माझे आई वडील मला नाही सांगत ते कधी येणार मी का सांगू त्यांना?*

*गजाननः तू वेडी आहेस का?*

*अंतराः मी तुझ्या डोक्यात घालीन हां बॅग, परत जर हे वाक्य बोललास तर. चल बाहेर जा,*

*गजाननः काय?*

*अंतराः मला चेंज करायचंय! बाहेर जा!*

62A. Ext/ Night/ Outhouse

गजानन एकटा बाहेर उभा दिसतो. इकडे तिकडे पहातो. हसून स्वतःच्या कपाळावर हात मारुन घेतो. कडी उघडल्याचा आवाज येतो.

62B.Int/ Night/ Outhouse

गजानन आत येतो. अंतरा त्याच्या समोर उभी आहे. शॉटर्स आणि टॉपमध्ये. तो बाजूला जाऊन बसतो.

*गजाननः आरतीला बोलवायचं का?*

*अंतराः (त्याच्याकडे रागाने पहाते.)*

*गजाननः सॉरी. कसा गेला पेपर?*

*अंतराः हं. आता तू शॉक होऊ नकोस. कारण हे असं काहीतरी मी पहिल्यांदा करणारे.*

उठते त्याच्या समोर येऊन बसते. गजानन पहात रहातो. त्याच्या समोर येते. बॅग काढते आणि त्यातून एक पेपर काढते. त्याला पेपर देते. तो उघडून पहातो. अवाक होतो. संस्कृत मध्ये लिहीलेलं पत्र आहे.

*अंतराः (एक्साईट होते.) रोज थोडं थोडं लिहीलं.*

*गजाननः (गोंधळलाय.) छान आहे. कोणासाठी?*

*अंतराः (हसते,) आय लाईक यू. आय लव्ह यू.*

*गजाननः हे हे थँकयू!*

*अंतराः एकतर तू मंद आहेस किंवा खूपच पोचलेला आहेस. एक मुलगी, घरी न सांगता, रात्री तुझ्याकडे येऊन, संस्कृत मध्ये लव्ह लेटर मध्ये देऊन सांगतीये आणि तरीही तुला कळत नाहीये? बरं आणि हे इनफॅच्युएशन नाहीये, त्याचं वय गेलं आता. आय एम २०.*

*गजाननः अगं हे काय चाललंय? तू सिरीयसली बोलतेयस हे?*

*अंतराः हो! मी तुला सांगते, मी वीस वर्षांची आहे. रिच, गुडलूकींग, इंडीपेंडट, एकुलती एक आहे. महिन्याला तीन मुलं तरी विचारतात मला. पन्नास एक मुलांच्या रि क्वेस्ट अशाच असतात माझ्या एफबी वर. आई वडलांशी मी फार कनेक्टेड नाहीये, कारण ते फक्त नावापुरते एकत्र रहातात. त्यांच्याबरोबर मला बोलता येत नाही, शेअरिंग करता येत नाही, काही मजाच येत नाही. या सगळयात ज्याला माझं म्हणण कळतं, ज्याचं म्हणण मला पटतं असा तू एकटा आहेस. सो प्लीज. से दॅट यू लाईक मी. प्लीज. प्लीज, मला तू हवायस, जसा आहेस तसा!*

त्याला मिठी मारते. तो तिला मिठीत घेतो. सोडायला जातो.

*अंतराः मला सोडू नकोस. बाहेरनं दाखवतो आपण ॲटीटयूड, बट वी ऑल आर फक्ड अप इनसाईड. अशावेळी कोणीतरी लागतं ना रे.*

*गजाननः हो लागतं आणि आवडण्यासारखीच आहेस तू अंतरा!*

ती आणखी घटट मिठी मारते. गजानन सोडवतो. तिला समोर बसवतो. स्वतः समोर खुर्चीवर जातो. तिच्याकडे अत्यंत प्रेमाने पहातो.

*गजाननः तू काय काय घेऊन आलीयेस गं माझ्या आयुष्यात. कमाल आहे. पहिली मुलगी आहेस जिनं माझ्या खांदयावर हनुवटी ठेवली. मला मिठी मारली. माझ्याकडे प्रेमानं पाहीलं. माझ्यातलं टॅलेंट ओळखलं. किती मजा आली तुला शिकवताना. आणि आज तर कमाल झाली. हे पत्र आणि ही रात्र जपून ठेवणार मी असेपर्यंत! पण मला काहीतरी सांगू दे, कॉलेजमधल्या मुलींना, एक्स्प्लॉईट करणारी मुलांची एक कॅटेगरी असते. असते ना? (ती मान डोलावते.) मी त्यातला नाही. आणि तूही नाहीस.*

*अंतराः करेक्ट! म्हणूनच मला वाटतं आपण लग्न करुया.*

*गजाननः (हबकून) काय? अगं काय बोलतेयस तू?*

*अंतराः खूप जेन्युइनली. अजून तीन चार वर्षांनी माझं नाव रजिस्टर करणार. मग मी लग्न करणार आणि आयुष्यातल्या सगळयात महत्वाच्या गोष्टीचा चॉईस आपल्याला करताच आला नाही या दुःखात घालवणार. त्या पेक्षा मी तुझ्यासाठी चार वर्ष थांबते.*

*गजाननः आणि?*

*अंतराः हे बघ मी २४ तू ३७ मग तर ठीके!*

*गजाननः हे ऑड आहे, असं नसतं होतं जगात. कधीच.*

*अंतराः आज्जी तर सांगायची दिलीप कुमार सायरा बानू पेक्षा पंधरा वर्षांनी मोठे आहेत. बरं सैफच्या लग्नात करीना फ्रॉकमध्ये गेली होती. जॉर्ज क्लुनी आणि अमल मध्ये एक वीस वर्षाचं अंतर आहे, मी अॅक्चुली लिस्टच डाऊनलोड के लीये.*

*गजाननः थांब, मला नाही जमणार हे.*

*अंतराः तू नाही म्हणतोयस. मला एक वॅलीड कारण दे.*

*अंतराः का तुला मी आवडतच नाही? नवरा बायकोत किती अंतर आहे हयाच्याशी लोकांना काय करायचंय? मग उंची, जाडी, हेही पॅरामीटर्स लावा फक्त वय कशाला? आणि एक सांगू, आपल्या वयाच्या जुनाट माणसाच्या बरोबर आयुष्य काढण्यापेक्षा आपल्यापेक्षा मोठया यंगस्टर बरोबर रहाणं किती जास्त हॅपनिंग आहे! (थांबून) अजूनही पटत नाहीये तुला?*

62C.Int/ Night/ Outhouse

दोघं आता वेगळया ठिकाणी आहेत. तो डोक्याला हात लावून बसलाय.

*अंतराः एका प्रश्नाचं उत्तर देशील? स्वप्नवासवदत्ता नाव का आहे नाटकाचं?*

*गजाननः सांगितलंय मी तुला.*

*अंतराः परत सांग. प्लीज.*

*गजाननः (तिच्याकडे पहात) समुद्रगृहात विश्राम करत असताना स्वप्नात उदयन 'वासवदत्ता' 'वासवदत्ता' अशी हाक मारत रहातो, तेव्हाच योगायोगानं वासवदत्ता तिथे येते. उदयनच्या बिछान्यावरुन खाली आलेला हात हलक्या हाताने वर ठेऊन ती निघून जाते. उदयनला शेवटपर्यंत कळत नाही की त्यानी स्वप्न पाहीलं होतं का ती खरचं आली होती. म्हणून नाटकाचं नाव... (अचानक थबकतो.) अंतरा... अंतरा, त्या दिवशी आउटहाऊसमध्ये तू खरचं आली होतीस ना? (आश्चर्यचकीत होतो.) आली होतीस ना तू?*

*अंतराः माहीत नाही! पण मला माझं उत्तर मिळालं.*

62D.Int/ Night/ Outhouse

गजाननला अचानक जाग येते. तो दचकून पहातो. ती त्याच्या शेजारी हातावर डोकं ठेऊन शांतपणे झोपून गेलीये. गजानन तिच्याकडे पहातो. हाताखाली उशी ठेवतो आणि उठून बसतो.

*गजाननः तसं बघायला गेलं तर ही मुलगी काहीच चुकीचं बोलत नाहीये. तिच्या आगाऊपणात एक जिवंतपणा आहे जो आमच्या दोघांनाही आयुष्यभर पुरेल.*

*हं. काय करावं? पर्णरेखा आणि अंतरा दोघींमधली एक निवडणं त्रासदायक आहे पण त्याहीपेक्षा वाईट आहे ते एकीला डावलणं. काय घ्यायचा डिसीजन? का परत जावं आधी?*

आवाज येतो नाही!

63. Int/Day/ Pricniple Cabin

गजानन दार उघडतो. अचानक त्याला वाईचे प्रिन्सीपल आणि रानडे मॅडम बसलेल्या दिसतात. तो दचकतोच.

*गजाननः सर तुम्ही?*

*वा. प्रिः या या, अहो एका सिनेमाचं शूटींग होतं, कमिशनरची भूमिका करतोय.*

*गजाननः अरे व्वा!*

त्यांना अभिनंदन करतो.

*गजाननः मॅडम मला का बोलवलंत?*

*प्रिः अहो कारण, आज माझ्या करीअरमध्ये पहिल्यांदा मुलांचं सहयांचं अप्लीकेशन आलंय की आम्हाला हेच सर हवेत. त्यामुळे आता तुम्हाला थांबावच लागेल. तुम्ही इथे पुन्हा जॉईन व्हा. तुमच्यासारख्या शिक्षकांची गरज आहे खूप!*

*वा. प्रिः तसंही या कॉलेजमध्ये खूप प्रेम मिळालंय म्हणे तुम्हाला.*

*आनंद झाला ऐकून!*

*प्रिः हो! अहो, काल तर त्यांच्या होणाऱ्या मिसेस पण आल्या होत्या लेक्चरला!*

*काय कुलकर्णी?*

*गजाननः (चक्रावून) मिसेस??*

## 63A. Ext/Day/ Corridor

गजानन कॉरीडॉरमध्ये उभा राहून बत्तीसला फोन लावतो.

*गजाननः कुठायस? रक्तदान शिबीरात? रक्त देतोयस? अच्छा भरवलंयस!*

*लगेच मीटींग पॉईंटला ये. हो, अर्ध्या तासात! खूप पॅनिक सिच्युएशन आहे. मी निघालोय.*

## 64. Ext/ Day/Under construction Building

सिमेंटच्या मिक्सरची घरघर ऐकू येते. गजानन गाडीवरुन उतरतो. आणि चालायला लागतो. झपाझप मजले चढताना दिसतो. बत्तीस खाली येतो. हाक मारतो.

*बत्तीसः ओ काका!!*

गजानन पहिल्यांदा लक्ष देत नाही. आणखी वर जातो. बत्तीस पुन्हा हाक मारतो.

*बत्तीसः ओ काका!!*

गजानन चौथा मजला ओलांडून वर जातो. बत्तीस पळत पळत जातो. गजानन दार उघडतो आणि पाचव्या मजल्यावर येतो. उसासा सोडून इकडे तिकडे पहातो. आता त्याला त्या मुलीचं घरं दिसतं. ती बाल्कनीत बसलीये. ती गजानन कडे पहाते त्याला हात करते. गजाननही तिला हात करतो. तिची आई मागून येते. हातात कपडे आहेत ते वाळत घालते. ग्रीलला हात लावून समोर कोणाकडे बघून हात करतेय ते पहाते. गजानन उभा आहे.

*बाईः काय कधी होणार कन्स्ट्रक्शन? करा पटापट!*

*गजाननः चालू आहे. चालू आहे. नाव काय आहे?*

*मुलगीः शलाका!*

*बाईः त्यांना विचार तुमचं?*

*मुलगीः तुमचं?*

*गजाननः गजानन कुलकर्णी!*

बाई चमकून थांबते. ग्रील ला लावलेला हात बाजूला घेते. तिच्या गालावरचं तुळशीचं पान दिसतं. गजानन उन्हातला तिचा चेहरा आणि त्यावरचं तुळशीचं पान पहात रहातो. पुढे चालत येतो.

*गजाननः सायली?*

*सायलीः हो! तुम्हाला...(थांबून) एक मिनिट?! गजानन? अबब! वाई?*

गजानन होकारार्थी मान डोलावतो.

*गजाननः वीस वर्ष झाली भेटून आपल्याला.*

*सायलीः ये ना, बी विंग, चौथा मजला, ४०३, खरे. ये ना.*

त्याच्याकडे बघून अप्रतिम हसते. गजाननच्या डोळयात पाणी.

*गजाननः तू अजूनही खूप छान हसतेस!*

*सायलीः (मुलीकडे पहात) म्हण त्याला तू पण!*

*दोघीः (एकदम) तू पण!*

तिघेही हसतात. बत्तीस वर पोचतो. त्याच्याकडे पहातो. गजानन त्याच्या खांदयावर हात ठेवतो.

*गजाननः आलोच!*

गजानन उत्साहाने वळतो. बत्तीस पहात रहातो.

इंजिनीअरींगच्या पुस्तकासारखी एक स्लेट येते. प्रकरण पाचवे डिसीजन अंडर कन्स्ट्रक्शन

65. Int/ Day/ Sayali Home

सायलीच्या घराचं दार उघडतं. सायली समोर उभी रहाते. तिच्या आजूबाजूला धूर आहे. त्याच्याही आजूबाजूला धूर आहे. गजानन तिच्याकडे पहात राहीलाय. ती त्याला भानावर आणते.

सायलीः काय रे?

*गजाननः वीस वर्ष वाटलं इकडं असशील, तिकडं असशील. पण तू तर नेहमीसारखी माझ्या शेजारीच बसली होतीस.*

65A. Int/ Day/ Sayali Home

सायली एका रुमचं दार बंद करते, आणि त्याला बाल्कनीचं दार उघडून बाग दाखवते.

*सायलीः ही बाग केलीये छोटीशी! काय मजा येते झाडं लावायला, जगवायला!*

गजानन त्या झाडांकडे पहातो.

65B. Int/ Day/ Sayali Home

सायली त्याला चहा आणून देते. समोर बसते. शलाका लॅपटॉपवर ‘डोक्यावर चांदोबा’ ऐकतेय. गजानन तिच्याकडे पहातोय.

*सायलीः कसा आहेस?*

*गजाननः छान.*

*सायलीः इंजिनिअर वगैरे झालायस का? इकडे काय साईट वगैरे?*

*गजाननः नाही नाही मी हिस्टरीचा प्रोफेसर आहे, एम बी कॉलेजमध्ये. तू आहेस कुठे?*

*सायलीः अरे आम्ही वाई सोडलं, मग पुणं. मग डेहराडून, दिल्ली, त्रिवेंद्रम बापरे कुठे कुठे गेलो नाही बाबांच्या बदल्यांमुळे. मध्ये केवढया सिनेमांमध्ये वाईचा तो काठ पाहिला. प्रत्येक वेळेला तुझी आठवण व्हायची. जातोस अजून?*

*गजाननः हां शूटींग नसेल तेव्हा देतात बसायला!*

*सायलीः मध्ये एका रेस्टॉरंटमध्ये गाडगीळ भेटली होती. कसली झालीये. बापरे.*

*गजाननः कोण गं?*

*सायलीः अरे! तिला तुझ्यावरनं चिडवायचे! मिंटी रे!*

*गजाननः हो, पण मला तुझ्यावरनं..*

तेवढयात दार वाजतं. गजानन थांबतो. ती दार उघडते. एक माणूस आत येतो.

*सायलीः ओ, हाय, शैलेश, हा गजानन. माय चाईल्डहूड फ्रेंड!*

*शैलेशः हाय!*

*गजाननः हाय! (थांबून) चला मी निघतो.*

*शैलेशः नाही नाही प्लीज बसा, मी नंतर येऊ का?*

तिघही हसतात.

*सायलीः त्याची दुबईची फ्लाईट आहे.*

*गजाननः मी खरंच जातो. बाय.*

## 65C. Int/ Day/ Sayali Home

सायली त्याचा नंबर घेते. दारात त्याचा हात हातात घेते. दोघे घटट शेकहँड करतात.

*सायलीः फोन करते मी उदया परवात. जरा निवांत भेटूया. आत्ता काही बोलता नाही येणार.*

गजानन वळतो. पायऱ्या उतरतो. उतरता उतरता डोळयातून पाणी येतं. त्याला प्रचंड भरुन आलंय. तो तिचा नंबर सेव करतो.

## 66. Int/Night/ Outhouse

व्हॉटसअॅपवर बत्तीस, पर्णरेखा, अंतरा यांच्यावर सायली नाव येतं. तिचा स्टेटस आहे, रिलीवींग लाईफ, रिबिल्डींग वर्ल्ड. गजानन स्क्रोल करत रहातो.

67. Int/Night/ Outhouse

तीन डबे उघडले जातात. त्यात गरम गरम आप्पे आहेत. एकात चटणी आहे, एकात सांबार.

पर्णरेखा आणि गजानन आउट हाऊस मध्ये आहेत. ती त्याच्याकडे खूश होऊन पहाते.

*पर्णरेखाः (घराकडे पहात) छान आहे हे घर! आपण अशाच एखादया ठिकाणी राहू!*

*गजाननः हां.*

*पर्णरेखाः मला लग्न रजिस्टरही चालेल हां, काही प्रॉब्लेम नाहीये!*

*गजाननः हो हो!*

*पर्णरेखाः काय मग? होतंय ना सगळं मनासारखं?*

*गजाननः हो, मनासारखंच करायचंय, म्हणून वेळ लागतोय.*

*पर्णरेखाः मी तुला घाई नाही करणार. आणि मी हे चिडून नाही तुला समजून घेऊन सांगतेय. म्हणून मी अजून घरीही सांगीतलं नाहीये. तू खा ना.*

गजाननचा फोन वाजतो. सायलीचा मेसेज आलाय. कुठायस? उदया भेटूयात?

68. Int/Afternoon/ Coffee Shop

कॉफी संपवून ठेवली जाते. सायलीच्या हातात लहान मुलीची बॅग दिसते. समोर गजानन बसलेला आहे.

*सायलीः तिला पाळणाघरात सोडलं की जरा दोन तास मोकळे मिळतात, म्हणून म्हणलं तुला इकडेच भेटावं.*

*गजाननः हां.*

*सायलीः मग, लग्न बिग्न केलसं की नाही?*

*गजाननः दोन मुली आहेत.*

*सायलीः काय??*

*गजाननः नाही, दोन खूप चांगल्या मैत्रिणी आहेत, त्यांच्यापैकी ठरवायचंय.*

दोघं जोरजोरात हसतात. हसायचा लूप लागतो.

*गजाननः शैलेश मस्त आहे.*

*सायलीः हं मला माहीत नाही अबब, एक सांगू? जाऊदे तुझं माझ्याबददलचं मत बदलेल.*

*गजाननः काय गं? सांग ना! आपण एकमेकांना काय काय सांगीतलं होतं. कॉमनसेन्सच्या गोष्टी सिक्रेटस वाटतात लहानपणी. पण तसं नंतर कोणीच भेटलं नाही गं.*

*सायलीः माझा डिव्होर्स झालाय.*

*गजाननः म्हणजे?*

*सायलीः राहुल आणि मी वेगळे झालो. एक वर्ष झालं.*

*गजाननः का गं?*

*सायलीः प्रेमच नाही राहीलं आमच्यात. त्याच्या प्रायोरिटीवरच नव्हतो मी आणि शलाका. ॲडर्वटायझिंग, प्रेशर, पाटर्या, आणि डेडलाईन्स एवढचं झालं होतं आयुष्य. आणि त्याबददल त्याला काहीच चुकीच वाटत नव्हतं. मी त्याला स्पष्ट सांगीतलं, तू आसपास नसतोस पण तू असणारेस याचं प्रेशर असतं, मला आता ते न घेता जगू दे!*

*गजाननः अच्छा!*

*सायलीः घेतला डिव्होर्स, डिस्टर्ब्ड होतो सगळेच. आई बाबांना क्ळेचना माझा प्रॉब्लेम काये! मला समजावताही आला नाही. (थांबून, हलके दुःखाने) बोलत नाहीत माझ्याशी तेव्हापासनं.*

*गजाननः हं. शैलेश?*

*सायलीः तो मित्र आहे माझा.*

*गजाननः अच्छा! मित्र?*

*सायलीः चांगला, जवळचा मित्र. (त्याच्याकडे पहात) बरं झालं तू भेटलास. आयुष्यात या स्टेजला कोणाचा ना कोणाचा तरी सपोर्ट हवाच होता मला. तू आहेस ना आता इथंच?*

*गजाननः वाईला जाईन पुढच्या आठवडयात.*

*सायलीः मग जायच्या आधी जेवायला घरी ये. बरं तू आलायस कसा? चल मी सोडते. माझं ड्रायविंग बघ!*

*गजाननः (आश्चर्याने) शिकलीस तू?*

*सायलीः केव्हाच!*

69. Ext/Road/Day

गाडी चाललीये. आत अंतरा आणि गजानन बसलेत. ती चालवतेय. तो शेजारी बसलाय.

*अंतराः बाय द वे आरतीला काहीच माहीत नाहीये हां, आपल्याबददल! आणि मला आज्जिबात आवड नाहीये रिलेशनशीप फ्लॉण्ट करायची!*

*गजाननः अगं तू काय बोलतेयस?*

*अंतराः आपण मस्त प्लॅन करु हां, चार वर्ष! मज्जा करु! एकत्र राहू. दाखवून देऊ सगळयांना वय बिय असं काही नसतं, मी तर इतकं ठरवलय ना, ते सगळं करणार आता! बघ, आपण कुठे घेऊन जाऊ ही रिलेशनशिप.*

*गजाननः आत्ता कुठे जायचंय?*

*अंतराः लाँग ड्राईव्ह, ऐ तू मेटालिका ऐकलंयस?*

*गजाननः नाही गं!*

*अंतराः हे ऐक, नथिंग एल्स मॅटर्स! काय गाणं आहे!*

*गाडी जाताना दिसते. म्युझिक वाढत जातं.*

70. Ext/Road/Day

गजानन आता मुलींच्या कपडयांच्या दुकानात उभा आहे. एक ड्रेस खरेदी करतो. शलाकासाठी एक बॉल घेतो.

71. Int/ Day/ Sayli Home

गजानन तिच्या घरी जेवताना दिसतो. दोन स्वीट डिश ठेवलेल्या दिसतात. ती केक खातेय.

*सायलीः त्या खोबरा केकची सर नाही याला. हां तू सांगत होतास, दोन मैत्रिणी आहेत.*

*गजाननः हां, पर्णरेखा म्हणून आहे, आणि अंतरा म्हणून. दोघींना मी आवडतो. एक वीस वर्षाची आहे आणि एक सत्तावीस.*

*सायलीः काय लाजतोयस तू? बाप रे! बघू?*

*गजाननः (हलका हसतो.) सायू... गपं हा!*

*सायलीः मग तुला कोण आवडतं? सिरीयसली!*

गजानन तिच्याकडे पहात रहातो.

*गजाननः माहीत नाही.*

*सायलीः पण दोघींपैकीच ना? मला वाटलं तुला कोणी तिसरीच आवडते का काय?*

हसून कॅज्युअली वळते. गजानन तिच्याकडे पहात रहातो.

*गजाननः तू! तू जेन्युइनली आवडायचीस मला. माझ्या मुलीच्या सगळया इमेजेस, डेफीनेशन्स तुझ्यापर्यंत येऊन थांबायच्या. प्लीज डोन्ट टेक इट अदरवाईज.*

71a. Int/ Day/ Sayli home bedroom

बेडरुममध्ये दारापाशी गजानन उभा आहे. ती एकेक गोष्ट आवरतेय. शलाकाचे कपडे आवरतेय. ती बाहेर बॉल खेळतीये. त्याचा आवाज येतोय.

*सायलीः शलाका म्हणजे धुडगूस आहे कम्प्लिट. एकटीला आवरता आवरत नाही. मधनंच रात्री बाबा करत दचकून उठते...*

*गजाननः सायली, तुझा परत लग्नाचा काही विचार आहे?*

*सायलीः (त्याच्याकडे पहाते.) अरे!! तुला सांगायचंच राहीलं, परवा स्कूल लिव्हींग सर्टेफिकीट हवं होतं म्हणून काय काय काढलं आणि त्यात काय वाटटेल ते सापडलंय! बघायचंय?*

71b. Int/ Day/ Sayli home bedroom

वरच्या कप्प्यातनं एक बॉक्स खाली काढला जातो. गजानन त्याकडे पहातोय.

ती तो बॉक्स उघडायला जाते. गजानन तिला थांबवतो.

*गजाननः मी काहीतरी विचारलं. (थांबून) तुझा परत लग्नाचा काही विचार?*

*सायलीः काय सांगू तुला? कळत नाहीये. शैलेश शेफ आहे. एका कॉमन रेफरन्सनी ओळख झाली, मग वाढली. त्यानी गेले सहा आठ महिने खूप सांभाळलंय. मध्ये ती आजारी होती तर राहीला घरी येऊन. आता दुबईत मोठया रेस्टॉरंटमध्ये जॉब मिळालाय. दोन आठवडयात शिफ्ट व्हायचंय. शलाकाला जाम आवडतो तो.*

*गजाननः आणि तुला?*

*सायलीः मलाही आवडतो. पण तो कधीच बोलला नाहीये. मला हे ही माहीतेय की मी विषय काढला नाही तर तो बोलणारही नाही. एवढंच म्हणेल, तू खूश आहेस ना ? बस्स! त्याला तेवढचं हवंय!*

गजानन तिच्याकडे तिच्या जवळ येतो.

*सायलीः त्यामुळे मी कन्फ्यूज्ड आहे. काय करु?*

गजानन ला मिठी मारते. गजानन आणि ती दोन क्षण त्या मिठीत आहेत.

बॉक्स उचलला जातो.

72. Int/ evening/ Outhouse

मोबाईल फ्लाईट मोड वर टाकतो. खिडकीच्या खाली प्रकाशात गजानन घरात एकटा बसतो. शांत आहे. त्याच्या समोर तो बॉक्स आहे. तो त्याकडे पहात रहातो. क्युरीओसिटी म्हणून उठतो. बॉक्स उघडतो. त्याला आत एक खेळणं दिसतं, तो ते बाहेर काढतो. त्याकडे पहातो. मग दोन काडेपेटया आणि त्याला लावलेला दोरा दिसतो तो बाहेर काढतो. भोवरा दिसतो. तो एकेक करुन स्वतःभोवती सगळया गोष्टी मांडायला लागतो. ब्रेडवरची चिंटूची स्टीकर्स, गोटया, भोवरे, कॅरमच्या सोंगटया, तुटलेले खडू, जुने फोटोग्राफ्स, असं सगळं मांडता मांडता त्याला एक चिठठी मिळते, तो त्याकडे पहातो. त्याच्या एका बाजूला अबब आणि दुसऱ्या बाजूला सायू असं लिहीलंय. तो प्रचंड कुतूहलानी त्यात्याच्याखाली एकेक लिस्ट लिहीलीये.

सायूः  महाबळेश्वरला जाऊन नाणं टाकणे. एकदा तरी पन्नास रुपयाचे केक खाणे. स्वतःची बाग तयार करणे. चारचाकी गाडी घेणं,  वाईच्या मंदीरात लग्न करणे.

गजानन हसतो. पाहून खुश होतो. वळून स्वतःची लिस्ट पहातो.

सात आश्चर्य पहाणे. तो थबकतो. पुढचं वाचतो.

स्वतःची शाळा सुरु करणं. तो हसतो.

धरमतर ते गेटवे ऑफ इंडीया पोहत जाणं. तो आणखी हसतो.

क्रिकेटची मॅच प्रत्यक्ष मैदानावर पहाणं. तो खिन्न होतो.

सायकलवर हिमालयात जाणं. तो आणखी खिन्न होतो.

तबल्याच्या चार परिक्षा देणं. तो सैरभैर होतो.

दोनशे रुपयाची चॉकलेट विकत घेणं.

तो त्याकडे पहात रहातो. त्याच्या डोळयात पाणी यायला लागतं. आपण यातलं काहीच करु शकलो नाही, या कल्पनेनी त्याला भरुन येतं.

*गजाननः जे मोठेपणी सहज शक्य होईल असं लहानपणी वाटतं, ते असं कसं विरुन जातं मध्येच! मला का सापडावं हे आत्ताच! का या एका कागदानं मला ओरडून सांगाव, हाच तू आहेस, खरा खुरा, वाईच्या शाळेत वर्ग चालू असताना मनानं कुठं कुठं जाऊन येणारा, रोज डायरी लिहीणारा, क्लासला जाताना केस ओले करुन शायनिंग मारणारा, फिरायला जाताना हरभऱ्याच्या गडडया संपवणारा, कॅसेट खराब होईपर्यंत एकच गाणं ऐकणारा, ते डोक्यात ठेवणारा, पहाटेपर्यंत चुळबुळत पुस्तकं वाचणारा, रोज नवं ठिकाण, नवी माणसं शोधायला निघणारा, पडण्याची चुकण्याची भिती नसणारा आणि खिसेभरुन अनुभव गोळा करुन आणणारा! मीच आहे तो. मीच आहे हा. मीच तो नवा. मीच हा जुना.*

## 73. Int/ Afternoon/ Wai Home

हाच वॉईस ओव्हर कंटीन्यू होतो. गजानन आई वडलांसमोर बसलाय.

*गजाननः त्यामुळे तुमचं नाराज असणं मी समजू शकतो. पण मी एक निर्णय घेतलाय तो सांगायला आलोय. ऐकायला ऑड वाटेल पण माझा निर्णय ठाम आहे. आई कदाचित तुला सगळयांसारखी हौसमौज करता येणार नाही, बाबा कदाचित तुम्हाला नाना तऱ्हेचे प्रश्न विचारतील. मित्र शंका काढतील, नातेवाईक टोमणे मारतील पण मला ही उडी मारायचीये. आणि त्यात तुमची साथ हवीये.*

*आईः काय ठरवलंयस तू?*

*गजाननः लग्नं!*

73a. Int/ Evening/ Wai Home

*गजाननः (फोनवर बाल्कनीत उभा आहे.) हो, वीस तारीख ठरलीये! मला माहीतेय पर्णरेखा आणि अंतरा नाराज झाल्यात पण मला हे पाऊल उचलायलाच लागणारे. त्यात तिच्या घरचे कोणी नसणारेत. आपल्यालाच तयारी करायचीये. तू ये त्यांना घेऊन ये.*

74. Ext/ Day/ Wai Mandir

वाईच्या मंदीरात सजावट केलेली दिसते. सनई वाजायला लागते. अक्षता वाटल्या जातात.

गजानन चे आई वडील छान कपडयात पण जराशा नाराजीनेच उभे आहेत.

गजानन आणि सायली उतरतात. शलाकाही उतरते.

सायली आंतरपाटाआड उभी आहे.

पलिकडे फेटा बांधलेला शैलेश उभा दिसतो.

गजानन शलाकाला उचलून घेतो. अक्षता टाकल्या जातात.

सायली त्याच्याकडे पाहून थँक्यू असं म्हणते.  गजानन दोन्ही हातांनी थम्सअप करतो.

गजानन शैलेश, सायली आणि स्वतःचा एक सेल्फी काढतो.

गजानन बत्तीस पर्णरेखा अंतरा यांचाही एक सेल्फी काढला जातो.

*गजाननचा व्हॉईस ओव्हर येतोः  या सगळया जणांनी काय काय दिलंय मला आयुष्यात. मावशीमुळं भान आलं, पर्णरेखामुळे जाणीव झाली, अंतरामुळे कॉन्फीडन्स आला. सायली मुळे स्वप्नांकडे  बघता आलं आणि बत्तीसमुळे जगण्याकडे!*

*आज सहा महिन्यानंतर मला जीवाभावाच्या चार मैत्रीणी आहेत आणि एक हॅवॉक मित्र आहे!*

74a. Ext/ Day/ Wai Mandir

त्या तिघांना गाडीत बसवलं जातं. गजानन बाय करतो. गाडी निघून जाते.

आता पर्णरेखा अंतरा समोर आहेत. अंतरा आपणहून बाजूला जाते.

पर्णरेखा आणि गजानन समोरासमोर आहेत.

74b. Ext/ Day/ Wai Mandir

*पर्णरेखाः मी चिडले होते तुझ्यावर, पण बत्तीस नी सायलीबददल सगळं सांगितलं मला. आधी राग आला, मग वाईट वाटलं, मग आदर. गटस पाहीजेत तू जे केलंयस ते करायला. (थांबून) तरीपण नको ना जाऊस! प्लीज!*

(त्याला मिठी मारते. गजानन पिशवीतनं एक गोष्ट काढून तिला देतो. ती बघते.)

*गजाननः अंगारा आहे, वाईच्या गणपती मंदीराचा!*

*पर्णरेखाः थँक यू!*

74c. Ext/ Day/ Wai Mandir

अंतरा एका चौथऱ्यावर बसलेली आहे. गजानन तिच्या जवळ येतो. गुडघ्यावर बसतो.

*अंतराः गेट लॉस्ट! प्लीज गेट लॉस्ट!*

*गजाननः तू चिडू नकोस.*

*अंतराः मला हे पटलेलं नाहीये. तुझं स्वप्न पूर्ण करण्यासाठी माझं प्रेम लाथाडून चाललायस, एवढं लक्षात ठेव. आणि आपण मित्र राहू वगैरे हया असल्या गोळया नको देऊस मला. नाही राहायचं मला मित्र बित्र हे असंच रहाणार!*

*गजाननः अंतरा, माझं नाव गजानन नसतं आणि मी इथे शिकवत नसतो तर काय करत असतो हा विचार मी फक्त तुझ्यामुळे केला. मला सिध्दार्थ नाव आवडतं, आणि मी शिकवत नसतो, तर मी तेच करत असतो जे मी आता करणारे.*

*अंतराः तरीही मी चिडलेय. गेट लॉस्ट!*

74d. Ext/ Day/ Wai Mandir

तो इकडे तिकडे पहातो. बत्तीस कुठेच नाहीये. तो चक्रावून पहातो.

बत्तीस काठावर पाय बुडवून बसलेला आहे. गजानन त्याच्या शेजारी जातो.

*गजाननः बत्तीस! तू रडतोयस?*

*बत्तीसः हॅवॉक केलात तुम्ही!*

(उठतो. खिशातनं पैसे काढतो.)

*बत्तीसः १०० परसेंट कॅशबॅक!*

*गजाननः झालो का पण मी वायझेड?*

*बत्तीसः ३०० टक्के!*

दोघं हसतात. बत्तीस त्याचा हात हातात घेतो.

*बत्तीसः आयदर आयवील मिस यू, ऑर आय विल जॉईन यू!*

गजानन हसतो. एकमेकांना तशीच घटट मिठी मारतात.

*बत्तीसः बाय हा शब्द तुम्हाला कधी म्हणायला लागेल याचा विचारच केला नव्हता मी.*

मागून एक गाडी आलेली दिसते. बत्तीस त्याला हात करतो.

गजानन वळतो. आता तो एकटा उभा आहे. हातात एक ट्रॅवलबॅग आहे. त्यावर एक सॅक आहे. बॅगेतनं एक फोल्डर काढतो. त्यावर माचूपिचू वर्ल्ड नंबर १ वंडर. असं फोल्ड र लिहीलंय. तो त्याकडे पहातो. गाडीच्या दिशेनी चार्ज होऊन कॉन्फीडन्टली चालत येतो. एका पॉईंटला अंतरा फोल्डरच्या मागे पडते, मग पर्णरेखा आणि शेवटी बत्तीस यांना ओलांडून पुढे आलेला गजानन दिसतो. त्याच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद, उत्साह आणि कुतूहल, समोर गाडी, तो चार्ज होऊन चालत येतो!

*गजाननः तर असा हा माझा गजानन पासून वाय झेड होण्यापर्यंतचा प्रवास. आजही मी सिंगलच आहे पण नाखूश नाही. वर्जिनच आहे पण डेस्परेट नाही. कोणीही बरोबर नाही, पण मला स्वतःची कंपनी जाम आवडतेय. मी जसा आहे तसा माझ्या बरोबर राहू शकतो, मला सहन करु शकतो, मला समजावू शकतो आणि मला आवडू शकतो, आणि मेन म्हणजे मला हवीतशी वायझेड गिरी करता येते. मनमोकळं आणि छान जगायला इतकं पुरेसं आहे नाही का?*

गाडीची डिक्की उघडली जाते. कॅमेऱ्यावर बॅग टाकली जाते. स्क्रीन ब्लॅकहोते आणि आवाज येतो. एअरपोर्ट! गजानन एका टोकावर उभा दिसतो. आपण त्याच्या मागून येतो, समोर अथांग पसरलेल्या माचूपिचूच्या पर्वतरांगा दिसत रहातात गाणं सुरु होतं आणि एन्डस्क्रोल सुरु होतो.

**क्षितिज पटवर्धन**

**२१ नोव्हेंबर २०१५, सकाळी ११.२१ मिनिटे**